साप्ताहिक

# माणूस

१ एप्रिल/८३
दोन रुपये




## पिंपरी चिंचवडमधले पँथर्स, DS4 रिपब्लिकन्स आणि मुक्तिसेनेवाले....

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : त्रेचाळीसावा

९ एप्रिल १९८३

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

। पत्ता ।

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४ ३४ ५९

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# इथून–तिथून

## दोघांची पंचाईत !

विश्वास बसत नाही ना ! पण या श्वापद-रक्षणकर्त्यांनी श्वापदांच्या रक्षणासाठी रामवट वागणूक केल्याचे उदाहरण न्यू जर्सी, अमेरिका येथे नुकतेच घडले.

जंगली श्वापदांचे संरक्षण आणि संवर्धनाचे कार्य करणाऱ्या न्यू जर्सी येथील एका संस्थेतील सभासद हा गोंधळ घालतात असे निदर्शनास आले. फलक आणि घोषणांनी शिकाऱ्यांची मने बदलत नाहीत हे पाहिल्यावर या श्वापदप्रेमींनी वेगवेगळ्या युक्त्या योजल्या. मोठ्या कर्कश आवाजात रेडिओ, कॅसेट प्लेअर्स जंगलात जेथे शिकार होते अशा ठिकाणी लावून श्वापदांना त्या जागेपासून दूर पळवून लावणे, ढोल वाजविणे, जंगलातून हिंडणे या प्रकारांबरोबरच शिकारी कुत्र्यांपासून कुत्र्यांचे जीव वाचवण्यासाठी त्यांना मुद्दाम उन्हात माळावर आणणे, जंगलातील वाटांवरून शेण, खराब झालेली अंडी फेकून, पसरवून ठेवणे वगैरे क्लृप्त्याही लढवल्या जातात. एवढेच नव्हे, तर हेलिकॉप्टरमधून घिरट्या घालून जंगली श्वापदांना जागृत करण्यासही या श्वापद-प्रेमींनी कमी केलेले नाही.

मात्र शिकारप्रेमींची त्यामुळे पंचाईत झाली आहे. न्यू जर्सीच्या एका शिकारप्रेमी आमदाराने आपल्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी एक प्रस्ताव विधिमंडळात मांडला आहे.

## पाकिस्तान : १९८३

जनाब भुट्टो यांनी त्यांच्या कारकीर्दीत देशातील गरिबी हटवण्याच्या दृष्टीने पोलाद, वनस्पति तूप, कृत्रिम रेशीम, ऑटोमोबाईल वगैरे महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले. तथापी धनवंतांचे, उद्योगपतींचे आणि राजघराण्यांचे वर्चस्व कमी झाले नाही.

आज झियांच्या कारकीर्दीत जुन्या पारंपारिक इस्लामधर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न चालू आहे. मात्र भुट्टोंचे राष्ट्रीयीकरण आणि झियांचे इस्लामिक पुनरुज्जीवन पाकिस्तानला स्वसमर्थ बनविण्यात अयशस्वी ठरले आहे येवढे निश्चित !

पाकिस्तानमध्ये उद्योगधंद्यांची वाढ होत आहे, तरीसुद्धा पाकिस्तानमध्ये परदेशांतून वस्तू आणि पैशाची आयात फार मोठी आहे. सुमारे २॥ अब्ज कोटी रुपये परदेशात स्थायिक झालेले पाकिस्तानी नागरिक आपल्या नातेवाइकांसाठी पाकिस्तानात दरवर्षी पाठवितात. पाकिस्तानातील बहुसंख्य कुटुंबांना अशा तऱ्हेने बाहेरून त्यांचे नातेवाईक पैसे पुरवतात.

केवळ पैसेच ते घरी पाठवतात असे नाही. आखाती प्रदेश, अमेरिका, ब्रिटनमधून दूध-पावडरच्या डब्यापासून दूरदर्शन आणि मोटारगाड्यांपर्यंत चैनी वस्तू पाकिस्तानी नागरिक नियमितपणे घरी भेट देण्याच्या वेळी स्वतःबरोबर आणतात. अशा तऱ्हेच्या परदेशी बनवटीच्या वस्तूंच्या आयातीसंबंधीचे नियम पाकिस्तानमध्ये भारतापेक्षा फारच शिथिल आहेत.

परदेशी भारी किंमतीच्या सौंदर्यप्रसाधनांचा वापर आणि खप पाकिस्तानी स्त्रियांमध्ये फार मोठा आहे. इस्लामिक पुनरुज्जीवनामुळे पाकिस्तानी स्त्रिया 'पर्दानशीन' रहात असल्या तरी त्या अशा परदेशी प्रसाधनांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर करतात. त्या स्वतःचे सौंदर्य कायम राखण्याबाबत अधिक जागरूक असतात असे पहाणीत आढळून आले आहे.

त्याचबरोबर पाकिस्तानी स्त्रिया खासकरून तरुणी आजच्या परिस्थितीबाबत नाराज आहेत. या तरुणी पाकिस्तानातील इस्लामिक कायद्यापेक्षा अमेरिकेतील स्वतंत्र जीवन जगण्यास जास्त उत्सुक आहेत.

इस्लामिक कायद्याने स्त्रियांची जशी कुचंबणा झाली आहे, तशीच पुरुषांचीसुद्धा झाली आहे.

' हम तुम एक कमरेमें बंद है
और.....................
.........और.........और

—जगदीश

## चंद्रशेखर–पदयात्रा

# हा प्रवाह आला कोठून ? आणला कोणी ?

श्री. ग. मा.

जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांची कन्याकुमारी ते दिल्ली ही भारतयात्रा महाराष्ट्रात पोचली आहे. येत्या आठवड्यात ती पुण्यात येत आहे. यात्रेकरूंचे स्वागत मोठ्या प्रमाणावर करण्याची पूर्वतयारी सुरू आहे. निवडणुका जवळ येत असल्याने जो तो पक्ष लोकांच्या डोळ्यांसमोर राहण्याचा प्रयत्न करणार हे उघड आहे. जनता पक्षाजवळ संघटना नसल्याने या पक्षाने या चंद्रशेखर–यात्रेचा असा उपयोग करून घेतला तर त्यात वावगे काहीच नाही. यात्रेतून पक्ष जरी बलवान झाला नाही तरी चंद्रशेखरांचे व्यक्तिमत्त्व एका अखिल भारतीय पातळीवर यामुळे पोचू शकते. जयप्रकाशांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून हे व्यक्तिमत्त्व आजवर वाटचाल करीत आलेले आहे. ७७ मध्ये पक्ष नसला, संघटना नसली तरी जयप्रकाशांच्या व्यक्तिमत्त्वामुळे व आणीबाणीविरोधी वातावरणामुळे जनता पक्ष विजयी झाला, इंदिरा गांधींचा पराभव होऊ शकला. असे व्यक्तिमत्त्व आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी उपलब्ध नाही. ही उणीव भरून काढण्याचा चंद्रशेखरांचा व त्यांच्या अनुयायांचा–सहकाऱ्यांचा प्रयत्न आहे. केवळ इंदिरा गांधीच व्यक्तिनिष्ठ राजकारण करतात असे नाही. एकूण भारतीय राजकारणाची प्रकृतीच व्यक्तिनिष्ठ आहे. पूर्वीही. काँग्रेसमध्ये टिळकयुग, गांधीयुग, नेहरूयुग अशी व्यक्तिनामांकित युगेच होती. हिंदूसभा म्हणजे सावरकर हे समीकरण होते. भाजपजवळ अटलबिहारींसारखा अखिल भारतीय मान्यता व लोकप्रियता असलेला नेता आहे. शिवाय संघटना बांधणीसाठीही हा पक्ष प्रयत्नशील असतो. असे काही ठोस भांडवल जनतापक्षाजवळ म्हणजेच पूर्वाश्रमीच्या समाजवादी पक्षाजवळ नाही. ही उणीव लाटांनी भरून निघते असा आजवरचा अनुभव आहे. अशी एखादी लोकोत्साहाची लाट निर्माण करण्याचाही हा प्रयत्न असण्याची शक्यता आहे. या यात्रेसोबत असलेले पुण्याचे भाई वैद्य यांची या यात्रेसंबंधीची वार्तापत्रे साधना–मराठवाडा या वृत्तपत्रातून आलेली आहेत. तामिळनाडूतील एका घोषणेचा उल्लेख एका वार्तापत्रात करण्यास ते विसरलेले नाहीत. वैद्यांनी लिहिले आहे : "भारत–यात्रेत घोषणा देताना तमिळ तरुण एम्. जी. आर्. ला कोपरखळी मारत असत. 'ट्विंकल, ट्विंकल लिटल स्टार...चंद्रशेखर सुपरस्टार !" अशा उल्लेखांवरून तरी वाटते की 'भारताचा शोध' एवढाच काही या यात्रेचा आंतरहेतू नसावा ! वाट दिल्लीला जाणारी आहे. वाटसरू पुण्यात येत आहेत. त्यांचे स्वागत असो !

¤

प्रांतभेद, भाषाभेद, उत्तर–दक्षिण वाद, पक्षभेद वगैरे असले तरी भारतीय एकात्मतेचा अनुभवही यात्रिकांना ठिकठिकाणी येतो आहे. भाई वैद्यांनी आपल्या वार्तापत्रात लिहिले आहे : "तरीही भारत यात्रेच्या काळात या गोष्टीची पक्की खात्री झाली की, प्रादेशिक अभिमानाच्या आड राष्ट्रीय अभिमानाचा निर्मळ प्रवाह झुळझुळ वाहत आहे. त्याची कित्येक प्रत्यंतरे मिळाली." ही प्रत्यंतरे पाहता यातील एकही न-हिंदू नाही हे वार्तापत्रांवरूनच दिसते आहे. हा राष्ट्रीय अभिमानाचा वारसा मग आला कुठून ? भारतीय एकात्मता जर आज अस्तित्वात असेल तर नक्कीच ती गेल्या शे।दोनशे वर्षांपूर्वीही होती – तत्पूर्वीपासूनही चालत आलेली असणार; पण हे मान्य केले तर राष्ट्रवादाचा काँग्रेसी व डावा साम्यवादी सिद्धान्त सोडून द्यावा लागतो, त्याचं काय ? काँग्रेसच्या प्रारंभीच्या काळात तिच्यावर मवाळांचे-नेमस्तांचे वर्चस्व होते. रेल्वेमुळे, पोस्टामुळे, इंग्रजी शिक्षणामुळे आणि एकछत्री अंमलामुळे येथे राष्ट्रभावना निर्माण झाली, इंग्रजी राज्यामुळे भारतात राष्ट्रवाद आला, हा देश इंग्रजांमुळे एक झाला असे या मवाळाग्रणींचे मत होते व हेच मत पुढे गांधी-नेहरूंच्या काळापर्यंत व आजही, न तपासता सर्वत्र रूढ झाले. उलट, येथील डावे व विशेषत: साम्यवादी, भारत हा एक उपखंड आहे, हा एक देश – हे एक

राष्ट्र नाहीच, येथे अनेक भाषिक राष्ट्रे आहेत असे प्रतिपादन करीत असतात. ही दोन्ही टोके अनैतिहासिक ठरवून येथील हिंदुत्ववाद्यांनी प्रथमच असे ठामपणे सांगितले की, इंग्रज येथे येण्यापूर्वीही, गेली सुमारे पाच हजार वर्षे तरी या देशात एक राष्ट्रीय समाज अस्तित्वात आहे, एक राष्ट्रजीवन येथे विकसित होत आहे, येथे एकात्मतेचा अंत:प्रवाह कधी प्रकटपणे, कधी सुप्तपणे वाहत आलेला आहे. हा अंत:प्रवाह कधी खंडित झाला असेल, पराभूतही ठरला असेल; पण इजिप्त किंवा ग्रीस-प्रमाणे पूर्ण नामशेष असा कधीही झालेला नाही. हा प्रवाह मुख्यत: आणि मूलत: हिंदू प्रवाह आहे आणि हाच येथील एकात्मतेचा, राष्ट्रीयत्वाचा मूलाधार आहे. इंग्रजांनी प्रादेशिक–भौगोलिक ऐक्य आणले हे हिंदुत्ववादी नाकारीत नाहीत. या मुख्य प्रवाहाला अनेक उपप्रवाह येऊन मिळाले आहेत हीही वस्तुस्थिती आहे; पण गंगा–यमुनांचा संगम झाला तर पुढे वाहत जाणाऱ्या प्रवाहाला गंगानदीच म्हणतात. तसे इतर भिन्नभिन्न प्रवाह मुख्य प्रवाहाला मिळाले तरी प्रवाहाचे मूळ हिंदूस्वरूप बदलत नाही. चंद्रशेखरांना व इतर भारतयात्रिकांना आढळून आलेला राष्ट्रीय एकात्मतेचा प्रवाह ही काही अचानक उद्भवलेली राजापूरची गंगा नाही. तो असलाच तर भगीरथाच्या काळापासून वाहत आलेला आहे, हिंदू म्हणवणाऱ्यांनी तो वाहत राहावा, नामशेष होऊ नये म्हणून आपली जीवने यासाठी सांडलेली आहेत, वेचलेली आहेत. म्हणून मवाळाग्रणींचा केवळ प्रादेशिकतेवर आधारित हिंदी राष्ट्रवाद व डाव्यांचा–साम्यवाद्यांचा उपखंडवाद हे दोन्हीही अनैतिहासिक राष्ट्रवाद आहेत. हिंदुत्व हेच येथील राष्ट्रजीवनाचे पर्याप्त वर्णन आहे. ख्रिस्ती धर्ममार्तंडांनी गॅलिलियोचा खूप छळ केला. छळाला कंटाळून त्याने पृथ्वी ही बायबलमध्ये सांगितल्याप्रमाणे स्थिर आहे अशी कबुलीही दिली; पण शेवटी हळू आवाजात तो म्हणालाच– ' मी काय करू ? ती फिरतेच आहे. ' तसे निवडणूक-मार्तंडांनी आपल्याकडे चालवले आहे. ख्रिश्चनांची आणि मुस्लिमांची मते मिळावीत म्हणून 'लब्धप्रकाश–इतिहास–निसर्गमाना'वर आधारलेला राष्ट्रवादाचा मूळ सिद्धांतच ते नाकारीत आहेत. तिकडे धर्ममार्तंडांचे जे झाले तेच इकडे या निवडणूकमार्तंडांचे होणार आहे. काळच त्यांना खोटे ठरवणार आहे. भारत-यात्रिकांना एकात्मतेचा अनुभव जर खरोखरच येत असेल तर या अनुभवाच्या मुळाशी, तळाशी जाण्याचा त्यांनी शक्यतो लवकर व प्रामाणिकपणे अवश्य प्रयत्न करावा. भारत म्हणा, राष्ट्रीय एकात्मता म्हणा, हिंदुत्व म्हणा–मूळ एकच आहे. इंग्रज आणि मुसलमान या देशात येण्यापूर्वीही जे होते ते. देवाण-घेवाण, सरमिसळ झाली हे नक्कीच; पण गाभा-बीजस्वरूप टिकले, ते टिकवून ठेवण्यासाठी पिढ्यानुपिढ्यांनी आपले रक्त सांडले म्हणून ! असे रक्त वाहिले नसते तर चंद्रशेखरादी यात्रिकांना जो भारतीय एकात्मतेचा अनुभव आला तो आलाच नसता ! चंद्रशेखर ज्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालले आहेत त्या जयप्रकाशांनाही शेवटी शेवटी हे सत्य जाणवले. ' कुछ बात है ऐसी '– जी आम्हाला एकत्र बांधून ठेवते आहे असे त्यांनी बिहारमधील, अगदी एका रा. स्व. संघ कार्यक्रमात उघडपणे सांगितलेले आहे. ही ' बात ' कोणती ? अवश्य सर्वांनी शोध घ्यावा. सत्ता मिळाली न मिळाली, सुपरस्टारकी लाभली न लाभली तरी भांडणे तरी कमी होतील, प्रसिद्धीला सिद्धीची जोड देता येईल. नाही तर आहेच–

आले वारे, गेले वारे
लाटांकडून लाटांकडे

□

## दिल्ली ते धारावी

# राजीव गांधी

रविवार दिनांक सत्तावीस मार्च. विमानातला राजपुत्र त्या दिवशी आशियातल्या सर्वांत मोठ्या झोपडवस्तीतून पायी चालत होता. राजपुत्राच्या स्वागतासाठी आशियातला सर्वांत मोठा ' उकिरडा ' असलेलं धारावी कसं लख्ख झालं होतं. तर न लपणाऱ्या घाणीवर गर्दीचं पांघरूण होतं.

राजीवच्या स्वागतासाठी धारावीचे रस्ते लोकांनी भरून गेले होते. त्यांच्या पावला–पावलागणिक हारांचा खच पडत होता. दर पन्नास फुटांवर, गल्लोगल्लीतल्या सुशोभित उंच कमानी स्वागताला उभ्या होत्या. आरत्या ओवाळणं, राख्या बांधणं–प्रत्येक नव्या गल्लीत ही नाटकं पुन्हा पुन्हा होत होती.

' लोकांच्या समस्या समजावून घेण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी ' गरिबांच्या धारावीतून सुरू झालेल्या राजीव गांधी यांच्या देशव्यापी पदयात्रेचं हे श्रीमंती स्वागत होतं. १९८५ च्या सार्वत्रिक निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर ' राजीवयात्रा ' रीतसर सुरू झाली आहे !

' इंदिरा गांधी आयी है। नयी रोशनी लायी है। ' ही एके काळची जादूई घोषणा होती. नवी घोषणा आहे, ' राजीव हमारा नेता–भारतभाग्यविधाता ' या नव्या घोषणेत किती जादू आहे हे लवकरच ठरेल; पण त्यात जादू भरण्याचा आटापिटा पुन्हा एकदा सुरू झालाय. वर्षभरापूर्वी कर्नाटकात झालेल्या युवक इंदिरा काँग्रेसच्या अधिवेशनाच्या निमित्ताने राजीव गांधींची राष्ट्रीय नेता म्हणून प्रतिष्ठापना करण्यात आली. कर्नाटकचे तत्कालीन मुख्यमंत्री गुंडूराव यांनी राजीव गांधींची भव्य शोभायात्रा त्या वेळी घडवून आणली होती; पण लवकरच कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत त्या यात्रेची शोभा झाली ! राजीव नावाची जादू काही चालली नाही आणि तिथे

विरोधी पक्ष सत्तेवर आला ! मुंबईतील पदयात्रा हा नवा प्रयत्न आहे.

मुंबई इंदिरा कॉंग्रेसने राजीवच्या या पहिल्या पदयात्रेची तयारी मोठी जय्यत केली होती. माणसांची अलोट गर्दी जमविण्यात त्यांना यश आलं. हजारो रंगीत भितीपत्रके, सुशोभित कमानी, स्वच्छ रस्ते प्रचंड खर्चाची साक्ष देत होते. राजीवची पदयात्रा होणार असल्याने धारावीत थोडी का होईना सफाई झाली पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या भागात पाण्याचे नवे नळ आले. पाणी नसलेल्या नळांना पाणी आलं दिवसांतून विशिष्ट वेळी येणारं पाणी त्या दिवशी दिवसभर होतं. अशा पदयात्रेने धारावीचं भलं होणार असेल तर वारंवार अशा पदयात्रा व्हाव्यात ही लोकांची प्रतिक्रिया होती.

राजीव–पदयात्रेच्या निमित्ताने आठ–दहा लाख रुपये सहज उडाले असावेत ! पदयात्रेसाठी केवळ नळांना पाणी देऊन किंवा रस्ते झाडून चालणार नव्हतं. राजीव गांधी यांच्या भोवती–पाठी सतत राहाणारी हुकमी गर्दीही हवी होती आणि ती आघाडी सांभाळली राज्यमंत्री चंद्रकांत त्रिपाठी यांनी. संजयदोस्त चंद्रकांत त्रिपाठी यांनी राजीव गांधी यांच्यावरही एक पुस्तक लिहिलंय. त्यामुळंच राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांचा दिल्लीमार्फत प्रवेश झाला होता. साहजिकच राजीव गांधींच्या स्वागताची जबाबदारी त्यांनी आपल्या शिरावर घेतली. ट्रक नसतील तर इंदिरा कॉंग्रेसच्या सभांना प्रचंड गर्दी होणं कठीण. चंद्रकांत त्रिपाठींनी ती कामगिरी चोख बजावली. आपल्याच एका दोस्ताला (जातभाईला) त्यांनी हे कंत्राट दिलं. गोरेगावच्या एका ट्रान्सपोर्ट कंपनीकडून २०० ट्रक्स आणि टेम्पो मिळविले होते, तर १०० इतरांकडून गोळा करण्यात आले.

प्रत्येक ट्रकमागे २५० / – रुपये असा व्यवहार होता. गोरेगावच्या कंपनीचं बिल प्रत्यक्षात ३५००० रु./– झाल्याचं समजतं; तर या कंत्राटदाराला १२००० रुपयांचा नगद नफा झाल्याचं सांगण्यात येतं. म्हणजे इतर 'मध्यस्थां'च्या खिशात एकंदर २५००० रुपये गेले असावेत असा अंदाज विश्वसनीय सूत्रांनी सांगितला. या ट्रक व टेम्पोमधून आलेल्या माणसांचा जेवणाखाण्याचा आणि इतर मोबदल्याचा खर्च वेगळाच !

राजीव–यात्रेची संपूर्ण तयारी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत करण्यात आल्याचे समजते. सरकारी यंत्रणेच्या वापरही लपत नव्हता. अर्थात या सार्‍या नेहमीच्याच गोष्टी अलिखित नियमानुसार कराव्या लागणार्‍या. त्रिपाठींनी इमानेइतबारे गर्दी जमविली खरी; पण तिला नव्हती शिस्त ना नियंत्रण. त्यामुळे रेटारेटी, गोंधळ यांचंच दर्शन सतत होत होतं. त्या रेटारेटीत आपल्या नेत्यालाही चालता येत नाहीये याचीही जाण त्यांना नव्हती. असणे शक्यच नव्हतं. अखेर राजीवना पायी चालण्याऐवजी जीपचा आश्रय घ्यावा लागला.

सबंध पदयात्रेत मंत्री, आमदार, नगरसेवक आणि पदाधिकारी यांच्या निष्ठाप्रदर्शनाची जणू स्पर्धाच लागली होती. राजीव गांधींच्या स्वागताला विमानतळावर राज्याचं अख्खं मंत्रिमंडळ हजर होतं. सबंध पदयात्रेत मात्र ते सामील होऊ शकले नाहीत. धारावीच्या गल्ल्यांमध्ये शिरण्यापूर्वी मुख्य रस्त्यावरून जेव्हा पदयात्रा सुरू होती तेव्हा लोकांच्या गर्दीमागून लाल दिव्यांच्या गाड्यांतूनही मंत्री पदयात्रेला सोबत करीत होते. प्रत्यक्ष धारावीत पदयात्रा घुसल्यानंतर बरेच मंत्री कटले. टी. एन् कांबळे, अजहर हुसेन, सतीश पेडणेकर यांचा तेवढा अपवाद. या तिघांनीही पायी यात्रा केली. प्रेमानंद आवळे आणि भाऊराव पाटील हे इंदिरा कॉंग्रेसमधून निलंबित झालेले आमदारही पदयात्रेत सामील होते; परंतु त्यांच्याजवळ इतर मंत्री किंवा आमदार फिरकताना दिसत नव्हते. उगाच राजीवसमोर बंडखोरांशी सोबत कशाला, अशी भीती असावी. त्यामुळे प्रेमानंद आवळे पदयात्रेच्या अगदी पुढे एकटे चालत होते, तर भाऊराव गर्दीत हरवले होते. या दोघांवरील शिस्तभंगाची कारवाई मागे घेण्यात येणार असल्याची चर्चा दोन्ही गोटातून ऐकू येत होती.

पदयात्रा कुर्ल्याला पोचली तेव्हा माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी राजीव गांधींचं स्वागत केलं. कुर्ला–नेहरूनगर हा माजी मुख्यमंत्र्यांचा मतदार संघ; पण आपल्या या मतदारसंघात भोसले राजीवबरोबर पदयात्रेत सामील होऊ शकले नाहीत. बहुसंख्य गिरणीकामगार या भागात रहातात. भोसलेंना पाहताच गिरणीकामगारांचा एक संतप्त जमाव पुढे आला आणि भोसलेविरोधी घोषणा देऊ लागला. भोसलेंच्या दिशेने दगडफेकही झाली. पदयात्रेचा नूर बिघडू नये याची खबरदारी म्हणून पोलिसांच्या संरक्षणात इंदिरा कॉंग्रेसच्या एका स्थानिक कार्यालयात भोसलेंना नेण्यात आलं. त्या कार्यालयावरही काहींनी दगडफेक केली. गिरणीकामगारांमधला असंतोषाचा इंगा जसा भोसलेंना बसला तसाच तो धारावीतही व्यक्त झाला. गणेशगल्लीजवळ उभारलेल्या व्यासपीठावर राजीव गांधी भाषणाला उभे राहिले तेव्हा गिरणीकामगारांचा एक जमाव 'गिरणी कामगारांना न्याय द्या' अशा घोषणा देऊ लागला. ते घोषणाही चलाखपणे देत होते. राजीव गांधींच्या झिंदाबादनंतर वसंतदादा मुर्दाबाद, डॉ. सामंत झिंदाबाद अशा घोषणा ते देत. त्यामुळे इतर समुदायही नकळत त्या घोषणा देऊ लागला; पण लगेचच इतरांच्या घोषणाच थांबल्या. पोलिसांना या जमावाला बाहेर काढण्यास बराच वेळ लागला. तोवर त्यांच्याच घोषणा राजीव गांधी यांच्या पाठीमागून ऐकू येत होत्या. इंदिरा कॉंग्रेसमधील सत्तास्पर्धा आणि लोकांच्या भावना यांचं दर्शन या पदयात्रेच्या निमित्तानं पुन्हा झालं

प्रतिकूल वातावरणात राजीव गांधींना राष्ट्रीय नेता बनविण्याची धडपड इंदिराबाईंनी चालविली आहे. राजीवची पदयात्रा हा त्याचा एक भाग जसा आहे, तसाच निवडणुका जवळ येताहेत याचा इशारकही आहे निवडणुका घ्यायच्या असल्या की, लोकांच्या भावनांना हात घालणारे दौरे सुरू करायचे आणि प्रचाराचा धुरळा उडवून द्यायचा. शिमग्याच्या मुहूर्तावर राजीव नावाची धुळवड सुरू झाली आहे. १९८५ मध्ये होणाऱ्या निवडणुका १९८४ च्या मध्यासच घेतल्या जातील किंवा त्यापूर्वीही याची चिन्हे पदयात्रेने दिसायला सुरुवात झाली आहे.

पूर्वी इंदिरा गांधींच्या पदयात्रा निघत असत आणि जादू करून जात असत. ती जादू आता संपत चालली आहे. राजीवच्या पदयात्रा तरी कितपत साथ देतात हे लवकरच कळेल. तोवर कर्नाटकातील शोभायात्रेचा आणि पराभवाचा अनुभव ताजा आहे.

—कपिल पाटील

# मुंबापुरी....

इकडे 'गांधी' तिकिटखिडकीवर तडाखेबंद गल्ला करतोय अन् तिथे हिंदी सिनेमावाल्यांवर हरिनाम-सप्ताह काढण्याची पाळी आली आहे. सिनेमे चालतायेत कुठे ?

'मासूम' 'कामचोर' सारखा एखाद-दुसरा अपवाद वगळता हिंदी सिनेमाला अवकळा आलीये की काय अशी दाट शका येते. जुनेपुराणे पिक्चर एकदम तोबा गर्दीत चालू आहेत. नव्यांना एक शनिवार-रविवार वगळता काही विशेष भाव नाहीये.

आता 'नास्तिक'चंच पहा ना. अमिताभ बच्चन ठणठणीत बरा झाल्यानंतरचा हा पहिलाच चित्रपट. म्हणजे किती चालायला हवा ? पण छे ! सुट्टीच्या दिवशीही 'हाउस फुल्ल'ची पाटी मांडमांड लागते. एरवी सगळा उल्लासच. अमिताभचे 'शोले' 'डॉन' 'मुकद्दर का सिकंदर' वगैरेचे दिवस आठवा ! त्यामानाने 'नास्तिक'ला काहीच गल्ला नाहीये !

पब्लिकच्या लेखी राजेश खन्नाचं अवतार-कार्य जवळजवळ दहा वर्षांपूर्वीच संपल्याने त्याच्या लेटेस्ट 'अवतार'ला गर्दी ती किती होणार ? नाही म्हणायला 'नमकहलाल' 'हिंमतवाला' 'विजेता' वगैरे ठाकठीक चाललेत.

सगळ्यात आश्चर्य वाटतंय ते जुन्या-चित्रपटांचं. सध्या मुंबईत आठ ते दहा जुने सिनेमे दे धमाल धंदा करतायेत. खास करून मीनाकुमारीच्या 'काजल' आणि 'फूल और पत्थर'वर तर लोकांच्या टुणटुण उड्या पडतायेत. मीनाकुमारीच्या सिनेमांना बायकांचा प्रचंड लोंढा असतो. दुपारभर थेटरात रडून रडून आकांत करतात !

'कटी पतंग', 'आराधना' 'गुमनाम' 'तीन देवियाँ' वगैरे सिनेमांना विशेष गर्दी असते. अगदी आडवारीसुद्धा !

### ओ गॉड !

काय विसंगती आहे पहा. उत्तम जाहिरातबाजी आणि हाय ब्राऊवाल्यांमुळे 'गांधी' जोरात चालू आहे. पिक्चरबरोबरच गांधीवादाचा प्रसारही बऱ्यापैकी होतोय. रीगलबाहेर सेवाभावी गांधीवादी कार्यकर्ते महात्मा साहित्याचा प्रसार करत असतात. लोकही कुतूहलाने विकत घेतात. आपल्याच देशात एका परकीयाच्या दुर्बिणीतनं आपल्याच माणसाला पाहायचं, कसं वाटतं नाही ?

'गांधी'वरच्या तीन प्रतिक्रिया देत आहे.

बी. मेरवाण या ग्रँटरोड स्टेशनसमोरच्या इराण्याच्या हॉटेलात दोन पारशी बोलतायेत— 'आ घाण्डी पिक्चर टडुन फॉल्स छे. जेवण्णे घाण्डी साऊथ आफ्रिका गया ठा टेवण्णे तेमणे पट्रावाला आ आपरा पारशीये अेमणे बचावेलू. आ पट्रावालानू कशूं बटाव्यूज नठी. स्टचूपिड छे ने ?' (गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत पत्रावाला या पारश्याने एकदा मारहाणीतनं बचावलं होतं. त्या पारश्याचा उल्लेख 'गांधी'त नाही यचा हा विषाद.)

रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातली ही प्रतिक्रिया. 'च्यायला, तो मोर्लिंग खात्यातला केणी म्हणाला गांधीचा पिक्चर असली आहे बघून या. आपण वाइफला घेऊन गेलो तो बागेतील सीन फेमस आहे म्हणून खास गेलो. सगळी गोची आहे यार. त्या बागेतल्या सीनमध्ये एक गोरा इंग्रज सगळ्या इंडियन्सना शूट करतो. मला वाटलं की, बाग आहे म्हणजे गांधी आणि त्याच्या मालचं ड्यूएट साँग असेल तर च्यायला इकडे किलिंग दाखवतात.

आणि ही शेवटची कारमायकेल रोडवरची प्रतिक्रिया :— ओ गॉड, कस्तुर्बाच ज्यूलरी वॉज सोऽऽऽ एथ्निक'

गांधीबाबाकी जय !

### सवय !

गेल्या शनिवारी युनिव्हर्सिटी एक्झीक्युटिव्ह कॉन्सिल मेंबर एस्. व्ही. घाटालिया ह्यांनी सेनेटला अंदाजपत्रक सादर केले. घाटालियांचे तसेच कुलगुरु राम जोशींचेही हे शेवटचे अंदाजपत्रक. (ह्यापुढे राम जोशी राजदूतपद मिळविण्याच्या खटपटीत आहेत असा बोलवा आहे. असो.)

अंदापत्रक मांडताना घाटलियांनी राज्य-सरकारच्या 'सॅलरी' पेमेंट स्कीमवर जोरदार टीका केली. जुन्या ग्रँट-इन-एड पॅटर्नऐवजी आता ही नवी योजना आल्यामुळे युनिव्हर्सिटीला दरवर्षी १५ लाख रुपये कमी मिळतील असे ते म्हणाले.

'गेली १४ वर्षे सरकारकडे पैसा मागून मी थकलो. वाढत्या खर्चानुसार ग्रँट वाढवायाचे तर सोडाच; पण उलट ती कमी होत आहे.'

युनिव्हर्सिटीच्या हलाखीचे वर्णन करताना त्यांनी सांगितलेला किस्सा मजेशीर आहे.

आयुष्यभर दारिद्र्याने पीडलेली म्हातारी एका ज्योतिषाकडे गेली.

'बाबा रे, पुढे तरी आशा करण्यासारखे काही आहे का ?'

तिचा हात पाहून ज्योतिषी म्हणाला, 'बाई, पुढची दोन वर्षे तरी कठीण दिसताहेत.'

'आणि त्यानंतर रे ?'

'नंतर सवय होईल त्याची !'

जाता जाता आणखीन एक सांगितले पाहिजे. ह्या वर्षीपासून मुंबई विद्यापीठाने आर्टस्, सायन्स, कॉमर्स, मेडिसिन, लॉ ह्या सर्व फॅकल्टीजमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांची फी दुप्पट केली आहे. ह्याच्या भरीला म्हणून मार्क्सलिस्ट, मायग्रेशन सर्टिफिकेट, कॅन्व्होकेशन फी आणि वसतिगृहाचे दर दीड पटीने वाढविले आहेत. ह्यावरून ह्या विद्यापीठात उच्च शिक्षणाला आळा बसण्याची किती गरज आहे हे समजू शकेल.

—विष्णु जयदेव

मुंबई वार्ता

## दहा हजार प्यादी एक राजा

काळ्या घोड्यापाशी अडवल्या जाणाऱ्या आणि विधानसभा नाही तर मंत्रालयावर चालून जाणाऱ्या मोर्चांची तशी काही कमतरता नाही.

तरी पण बुधवारी निघणारा एक मोर्चा आता निघणार नाही, निदान सहा महिने तरी नाहीच या गोष्टीचं मला विशेष वाटलं.

सिमलानगर झोपडपट्टी संघाची माणसं

हा मोर्चा काढणार नाहीत. कारण अजून सहा महिने तरी त्यांच्या डोक्यावरचं छप्पर कुणी हिरावून घेणार नाहीये.

आपण नेपियन सी रोडवर रहातो आणि आपल्या घरातून समुद्राचा सुंदर देखावाही दिसतो असं कुणी सांगितलं तर तुम्ही काय म्हणाल ?

नक्कीच बऱ्यापैकी माया बाळगून असावा!

मुंबईच्या इमारतींमधले आणि निरनिराळ्या विभागातले 'वर्गभेद आणि जातिभेद' आता बरेच मावळत चालले आहेत ! म्हणजे अमुक एक भाग फक्त उत्तुंग इमारतींसाठी आणि अमुक फक्त झोपडीवाल्यांसाठी किंवा अमुक फूटपाथ—पाइपमध्ये रहाणाऱ्यांसाठी असे हवाबंद कप्पे आता राहिलेले नाहीत ! हे सर्व प्रकार गुण्यागोविंदानं एकत्र नांदताना दिसतील !

मलबारहिलची मागची बाजू. डाव्या बाजूला मलबारहिलचा उतार आणि उजव्या बाजूला समुद्र यामध्ये पळणारा नेपियन-सी-रोड.

नेपियन-सी-रोडचा भाग बोरीबंदर किंवा मरीनड्राइवसारखा कधी 'मुंबईचं चित्र' वगैरे सदरात येत नाही.

पण तोही तसाच आहे. तुकतुकीत रुंद रस्ते. सुळकन पळणारी, परदेशी बनावटीची वाहनं. मधूनच गर्द झाडी, गर्भश्रीमंतीचा साज असणारी नितांत शांतता.

कुठे-कुठे अजूनही टिकून असणारे जुन्या इमारतींचे पांढरे हत्ती. पुढे पोर्च असणाऱ्या विक्टोरियन बांधणीचे खानदानी पारशी बंगले.

सरळ आभाळात घुसणारे स्कायस्क्रेपर्स आणि उद्धटपणे पाट्या चमकावणारी डिपार्टमेंटल स्टोअर्स.

हे एकूण चित्र.

अचानक दोन उंच इमारतींमध्ये एक फट पडल्यासारखी वाटते पॅगोडासारखी खूपशी उतरती कौलारू छपरं एकाखालोखाल एक मांडलेली दिसतात. पावसाळ्यात कावळ्याच्या छत्र्या जशा झुंडीझुंडीनं दिसतात, तशीच दिसतात ही छपरं. खुरटी आणि मळकट.

आणि मग परत परत तेच दृश्य दिसत रहातं.

एव्हाना नेपियन-सी-रोडचा कडक रुबाब थोडा कमी झालेला असतो. मधूनच फाटकी कळकी पोरं, उग्र वासाच्या वडा-पावाच्या गाड्या वगैरे दिसू लागतात.

समुद्राच्या काठानं मुख्य रस्ता पुढं जातो आणि एका अनेक मजली इमारतीला वळसा घालून डाव्या हाताला वळलं की, तुम्हाला कल्पनाही नसताना एक फलक सामोरा येतो. सिमलानगर झोपडपट्टी रहिवासी संघ.

नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा, अशी म्हण सार्थ करणारी ही झोपडपट्टी. नाव मात्र सिमलानगर !

बडोद्याचे माजी नरेश सयाजीराव गायकवाडांची ही जमीन. लहान-सहान नाही, मलबार-हिल भागातली एवढी मोठी जमीन म्हणजे अक्षरशः सोन्याची खाण !

रिकाम्या पडलेल्या आणि मालक परदेशात असणाऱ्या या अनाथ जमिनीवर झोपडपट्टी उभी राहिली. तीही अगदीच आजकालची नव्हे, पाव शतकाचा इतिहास असलेली.

राजेसाहेबांनी कर चुकवला आणि अनेक वर्षांनंतर आयकरखात्याला त्याबद्दल जाग आली. सिमलाहाउस जमिनीचा लिलाव करून त्यातून कराची थकबाकी वसूल करण्याची घोषणा झाली.

आणि एका रात्रीत दहा हजार जणांचा निवारा धोक्यात आला. कांग्रेस गवत आणि झोपडपट्टी वाढायला वेळ लागत नाही. सिमलाहाउसच्या मर्यादित जमिनीवर हा हा म्हणता हजारभर झोपड्या उभारल्या गेल्या.

हे एक मोठं 'सरकारी स्कॅंडल'च झालं म्हणायचं. सिमलाहाउस मात्र एका रात्रीत प्रसिद्धीच्या झोतात आलं. त्यामुळं झालंच काय की इथल्या सगळ्या माणसांना माहिती आणि आपण म्हणायचे संवाद पाठ झाले आहेत.

सुरुवातीलाच वेल्फेअर असोसिएशनचं ऑफिस होतं. तिथलं अर्धवट उघडं दार लोटलं; पण पिठाच्या चक्कीखेरीज, माहिती सांगेल असं कोणी दिसेना.

पण एव्हाना समोरचा हॉटेलवाला, बाजूचा दुकानवाला, खेळणारी पोरं, पाणी आणणाऱ्या बाया जमा होऊन चौकशीला आल्याच.

कुणी तरी खुर्ची आणून दिली, कुणी चहा घेतला का विचारलं.

ज्यांच्या स्वतःच्याच निवाऱ्याचा उद्या प्रश्न उद्‌भवणार आहे त्यांच्याकडून मिळालेलं अगत्य आणि पाहुणचार खरंच हृदयस्पर्शी वाटलं.

सिमलानगरवासीयांना मी भेटले. तोपर्यंत त्यांच्या डोक्यावर तलवार टांगती होती. लिलावाला मनाई हुकुम तोपर्यंत आला नव्हता आणि येण्याची चिन्हंही नव्हती. एका प्रलयंकर अवस्थेतून जात असलेला तो एक छोटासा समाज होता.

त्यांच्यासाठी प्रत्यक्ष काही करण्याची साधनं किंवा मार्ग माझ्याकडे नव्हते, मी फक्त त्यांचं निरीक्षण केलं. या परिस्थितीला ते कसा प्रतिसाद देताहेत, त्यांचे विचार आणि भावना काय आहेत—

एकूण वातावरण घबराटीचं. थोडं अविश्वासाच, थोडं दुखावलं गेल्याचं, थोडंसेच काही आक्रमक पवित्र्यात.

झोपडपट्टी असली तरी सिमलानगरमध्ये अगदी तळागाळाचे लोक रहात नाहीत. झोपड्याही फूटपाथवरल्यासारख्या चटयाकागदाच्या नाहीत, विटांच्या पक्क्या आहेत!

## सगळं केविलवाणंच

प्रत्यक्ष वस्तीतून फिरताना आणखीही एकेक गोष्ट ध्यानात येऊ लागली. गोरज मुहूर्तावर कॉर्पोरेशनचे नळ पाणावत होते आणि वस्तीतल्या बाया बादल्या—घागरी घेऊन तिथे झुम्मड करून होत्या.

बेकायदेशीरपणे झालेल्या या वस्तीला पाणी मिळालंच कसं ?

मात्र बी. इ. एस. टी. ची दिवाबत्ती वस्तीच्या दारापर्यंतच येऊन थांबलेली आहे. उंबरठ्यावरच थबकलेला हा प्रकाश वस्तीच्या संदर्भात ठळकपणे प्रतीकात्मक वाटतो.

तरीही इथे बॅटरीवर चालणारे ट्रान्झिस्टर रेडिओ आहेत. शेजारच्या इमारतीतून विजेचं कनेक्शन घेऊन चालणारे टीव्हीसुद्धा आहेत!

बाहेरच्या खोलीला लावलेले भडक चकचकीत ऑइलपेन्ट आहेत. दारांवर क्वचित नावाच्या पाट्या आहेत.

स्वयंपाकघरातून गंजलेले, पण एके काळचे रंगीत आणि फॅशनबाज असे पत्र्याचे डबे आहेत— (बहुधा मालकिणीनं उदारपणे दिलेले)

जुन्या साड्यांचे हौशीनं शिवलेले पडदे आहेत.

नळावरच्या पितळी घागरी लखलखीत आहेत.

थोडक्यात ही एक नियमित वस्ती आहे. तुमच्याआमच्यासारखी. स्थिरावलेली, स्वतःची म्हणून काही तरी संस्कृती असलेली.

हा लमाणाचा भटकता तांडा नाही. की जो आज इथे तर उद्या तिथे असू शकतो.

इथली माणसं मुंबईची रहिवासी आहेत. आणि अधिकृत.

ती बेकार नाहीत. चोऱ्यामाऱ्या हा (निदान सर्वांचा) अधिकृत धंदा नाही.

ही माणसं नोकऱ्या करतात. कुणी मुंबई महापालिकेत, कुणी खासगी. काहींचे टॅक्सी ट्रक आहेत. कुणी मजूर आहे, तर कुणी गवंडी.

कसेल त्याची जमीन असते, त्याच न्यायानं राहील त्याची जागाही असते यावर या सर्वांचा विश्वास आहे.

सुशिक्षित आणि अशिक्षितपणाचं एक अजब मिश्रण आहे हे. 'ती झोपडी बांधलीये ना, ती चुकीची आहे. कायद्याला धरून नाही झोपडी पंचवीस फुटांहून उंच असता कामा नये; पण ही दुमजली आहे. उंच झालीये' माझ्याबरोबरचा तरुण माणूस मला सांगत होता. मुंबई महापालिकेत काम करणारा हा तरुण इथेच रहातो. कायद्याबद्दलची त्याची ही आस्था पाहून मी त्याला विचारलं.

गेली पंचवीस वर्षं तुम्ही इथे रहाताय, काही भाडं, सरकारला काही कर वगैरे भरता का ?

'आम्ही काय म्हणून भरू ? जागा काय आमच्या मालकीची आहे ?' तो उसळून म्हणतो.

'या समोरच्या बिल्डिंगवाल्याचा आणि आमचा झगडा असतो.' पंचवीस-तीस मजल्याच्या एका इमारतीकडे बोट दाखवत तो म्हणतो. 'आमच्या गटाराचं पाणी त्यांच्या कंपाउंडमध्ये जातं म्हणून. पण त्यांनी नाही का घेतली आमची पंधरा चौरस फुटांची जागा ? असं काही तरी होणारच !'

सिमलानगर झोपडपट्टीची माणसं बऱ्याच राजकीय पक्षात विभागली गेली आहेत. दहा हजार वस्तीचा, एवढा मोठा माणसांचा कळप म्हणजे राजकीय पक्षांच्या हातातली हमखास हत्यारं.

हे राजकीय नेते उगीच आम्हाला भडकवतात. माणसांची डोकी तापतात. त्यातूनच हा मोर्चा निघणार आहे आता–एक मत.

आम्ही कुठल्याही पक्षांचे असलो, तरी झोपडी न पाडण्याबाबत हम सब एक हैं. –दुसरं मत.

या माणसांमधलं माणूसपण हरवलेलं नाही' त्यांना अर्धवट का होईना विचार आहेत. भडक असल्या तरी भावना आहेत.

आणि त्यांच्यावर येऊन गुदरलेला प्रसंग भडक भावनांनाच आव्हान करणारा आहे.

त्यांच्या स्थितीबद्दलचे शांत आणि समतोल विचार सांगणारी आर्मचेअर फिलॉसफी विसाव्या मजल्यावरच्या प्रेक्षकाला जमू शकेल; पण यांच्याकडून ती अपेक्षा चुकीची ठरते.

सुशिक्षित होऊन त्यांच्या प्रश्नात भरच पडली आहे. कुठे तरी कायद्यानं हे बरोबर नाही असं कळतं आहे; पण न उलगडणाऱ्या एका तर्कशास्त्रानं ही जागा आपलीच असंही वाटतं आहे आणि या सर्वांवर ताण करणारी आहे असहायता. कुठे जायचं आम्ही इथून घालवलं तर ! आम्हाला घर नको ? आमच्या मुलाबाळांना आसरा नको ? समजा, उद्या ही जागा घेणाऱ्यानं आम्हाला कुठं तरी लांब पर्यायी जागा दिल्या, तर इथल्या नोकऱ्या, धंदे सोडून आम्ही कुठं जायचं ?

आलटून–पालटून व्यक्त होणारी त्यांची मग्रुरी आणि असहायता दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू एकूण चित्र केविलवाणंच.

केवळ नोकरी असून चालत नाही.

केवळ रहायला जागा असूनही भागत नाही.

हे भाकरीवर लोणी घेण्यासारखं वाटतंय का ?

पण ही वस्तुस्थिती आहे.

अर्थव्यवस्थेच्या तळाला खितपत पडलेल्यांचे प्रश्न तर बिकट आहेतच.

पण नुकतंच कनिष्ठवर्ग–कनिष्ठ मध्यमवर्गात येणाऱ्यांच्या पायाखालची जमीन अशी हिसकून घेतली तर त्यांनाही त्याच गाळात रुतायला वेळ लागणार नाही.

मूळ धरू पहाणाऱ्या झाडाला अचानक उपटून फेकून देण्यासारखं क्रूर आहे हे !

सिमलाहाउस झोपडपट्टी चांगलीच प्रस्थापित झाली आहे. धारावीसारख्या झोपडपट्टीत दिसतो तसा बकालपणा इथे वाटत नाही.

फार काय, अगदी वस्तीच्या सीमरेषेवर डॉक्टर आंबेडकरांच्या नावानं प्राथमिक शाळादेखील उघडली गेली आहे.

'ओ बाई, माझं नाव लामतुरे. मी शाळेचा प्रेसिडेंट आहे, प्रिन्सिपल नाही. तुम्ही तरी नीट लिहा. त्या इंग्रजी पेपरवाल्यानं चुकीचं लिहिलं.' गर्दीतून आलेला आवाज. कुणाला कसली चिंता असेल सांगता येत नाही, मला वाटून जातं.

या लोकांकडे पहाताना स्थैर्य, सुरक्षितता असल्या साऱ्या मानवी आणि खास करून मध्यमवर्गीय अशा अपेक्षांच्या व्याख्याच बदलाव्याशा वाटतात.

पाठीवर घर घेऊन फिरणाऱ्या गोगलगायीपासून ते एके जागी स्थिर होणाऱ्या माणसापर्यंत म्हणजे जीवसृष्टीची बरीच प्रगती झाली म्हणायची आणि कुणी दिलं हे स्थैर्य माणसाला ?

सिमलानगरच्या रहिवाशांना शासनानं स्थिर व्हायला मदत केली. जागेवरचं त्यांचं आक्रमण बेकायदेशीर होतं तरीही त्यांना पाणी मिळालं. दारापर्यंत का होईना, प्रकाश आला. झोपडपट्टी म्हणून त्यांची अधिकृत नोंदणी झाली. सत्तेवर असलेल्या आणि नसलेल्या अनेक नेत्यांनी त्यांना वेळोवेळी भेटी दिल्या.

या सर्वांनी दिलं स्थैर्य त्यांना. या सर्वांनी सांगितलं त्यांना की तुम्ही इथेच रहा !

त्यांच्यावर विसंबून ही माणसं राहिली आणि आता ही अशी वेळ आली !

तरीही ते मोर्चा काढणार नाहीत, निदान सहा महिने तरी नाही. कारण कोर्टाच्या लिलावावर बंदी हुकूम तेवढा काळ आहे.

त्यानंतर काय ?

ते कोणी पाहिलंय ?

कदाचित सरकार जमीन ताब्यात घेईल.

कदाचित ही माणसं इथंच राहू शकतील कदाचित ?

जमीन कुणाची, तिथे तंबू ठोकून उतरलाय कोण ?

जागा कुणाची आणि त्यासाठी भांडतंय कोण ?

बुद्धिबळाच्या खेळातला राजा स्वतःचं रक्षण करत एका जागी बसून रहातो. पटापटा मरतात, ती बिनीची बेवारशी प्यादी !

उद्या जमिनीचा लिलाव होईल. भरपूर भावात जमीन विकली जाईल.

सरकारला कराची थकबाकी मिळेल.

विक्रीतून मिळालेली थकबाकीहून अधिक असलेली रक्कम न्यायानं, कायद्यानं चालणारं सरकार परदेशस्थ राजाला पोचती करेल.

दहा हजार प्यादी मात्र उगीचच मधल्यामध्ये मरतील !

आणि तेही सर्व कायद्याच्या नावाखाली !

न्यायदेवतेला सुद्धा आंधळं असण्याबद्दल पश्चात्ताप व्हावा अशा वेळी !

–ललिता बर्वे

## पिंपरी–चिंचवड दलित चळवळ

# सरपे बांधे कफन् हम कातिल को ढूँढते हैं !

## सुभाष काळे

मुक्काम पिंपरी–चिंचवड. पिंपरीतील डिलक्स सिनेमा टॉकीजसमोरचे एक प्रशस्त हॉटेल. वार रविवार. सकाळची दहा–साडेदहाची वेळ. वीस–पंचवीस तरुण दलित कार्यकर्त्यांच्या घोळक्यात मी गप्पा मारीत बसलेलो. चहापाठोपाठ पनामाची दोन–चार पाकिटंही येतात. कोणी तरी एक सिगारेट माझ्या दिशेने फेकतो. माझ्याबरोबर आलेले गृहस्थ वयस्क आणि समोरच बसलेले. सिगारेट उचलावी की नाही या विचारात असतानाच ते माझ्याकडे काडयाची पेटी सरकवतात व स्वतःही सिगारेट पेटवितात. हसत मीही इतरांबरोबर सिगारेट पेटवितो. धुराच्या वलयाबरोबर टेपवरील 'ये जिंदगी उसकी है जो किसीका हो गया' या अनारकलीच्या गाण्याचे ध्वनी हवेत विरघळत असतात. सर्व वातावरण कसे उत्साह, तारुण्याने भारलेले. गप्पा ऐन रंगात आलेल्या. तेवढयात पोलिसांची वायरलेस गाडी हॉटेलसमोर येऊन थांबते. दोन–चार पोलीस आमच्या दिशेने येतात.

...'या ! या साहेब' ! आम्ही सकाळपासून वाट पहात आहोत. म्हटलं साहेब आम्हाला विसरले की काय ? भलताच उशीर केलात आज तुम्ही, आदिकांचा दौरा तर रद्द झाला नाही ना ?' एक कार्यकर्ता.

'असं कसं होईल ? चला, वेळ नका घालवू. आताच ते येणार आहेत !'...पोलीस.

आज्ञाधारक विद्यार्थ्यांनी मास्तरांचे निमूटपणे ऐकावे तसे हे सर्व तरुण पोलीस गाडीत जाऊन बसतात. सर्वांच्या मागे राहिलेल्या कार्यकर्त्याबरोबर बोलत मीही पोलीस-गाडीजवळ येतो. जणू काही घडलेच नाही अशा थाटात. कार्यकर्ता सांगत असतो,

'साहेब, हे आमचं रोजचंच आहे. कोणताही मंत्री पुण्यात अगर पिंपरी–चिंचवडमध्ये आला की, पोलीस प्रथम आम्हाला उचलतात. आज रामराव आदिकांचा दौरा आहे ना ! म्हणून ही धरपकड. दर वेळी कपडे बरोबर नेण्या–आणण्याची झगझग नको म्हणून मी तर माझे अंथरूण–पांघरूण तिथेच ठेवून टाकले आहे. काय, खरे आहे ना साहेब ! आमचा बाडबिस्तरा जागेवर आहे की हाणला कोणा पोलिसाने ?'

त्याच्या या बोलण्याला पोलीसही हसतात.

'बरे आहे काळेसाहेब. संध्याकाळी येऊ. बघा जमले तर भेटा !' म्हणत तोही कार्यकर्ता गाडीत जाऊन बसतो. गाडी सुरू होते. गाडीत बसलेले तरुण घोषणा देऊ लागतात. गाडी वेगाने निघून जाते.

¤

रस्ता चुकलेला पोलीस पत्ता विचारायला दारात थांबला तर घाबरणारा, वीस–पंचवीस वर्षांपूर्वीचा दलित समाज कुठे आणि तुरुंग व पोलीस हा ज्यांच्या टिंगलीचा विषय झालेला आहे ती आजची ही तरुण पोरं कुठे ? भीती सोडून देऊन निर्भयपणे शोषणाविरुद्ध लढण्याचा बाबासाहेबांनी जो मंत्र दिला त्या मंत्राचा हा आविष्कार !

¤

पिंपरी–चिंचवड हे दलित चळवळीचे एक अतिशय जागरूक असलेले युनिट. मोर्चे, संप, निषेध, हरताळ, घेराव आणि त्या निमित्ताने दंगेधोपे यापैकी काही ना काही नेहमी येथे चालूच असते. सदैव लढाईच्या पवित्र्यात उभ्या ठाकलेल्या पिंपरी–चिंचवड भागातील दलित चळवळीची माहिती करून घेण्यासाठी मी प्रथम भेट घेतली ती प्रभाकर विठ्ठल मसुरे यांची.

पत्र्याच्या दोन खोल्या. जागा तशी लहानच; पण सर्वत्र टापटीप व स्वच्छता. मसुरे भारतीय रिपब्लिकन पार्टीच्या खोब्रागडे गटाचे पिंपरी–चिंचवड भागातील प्रमुख नेते. सोलापुरात बाबासाहेबांच्या पुतळयाची विटंबना होण्याचा जो प्रकार गेल्या फेब्रुवारीत घडला, त्याची जोरदार प्रतिक्रिया पिंपरीत उमटली. त्या निमित्ताने झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व मसुरे यांच्याकडे होते. संपूर्ण नाव प्रभाकर विठ्ठल मसुरे, वय ४७. मूळ गाव 'हळी', ता. उदगीर. सध्या जिल्हा लातूर. शिक्षण विशेष नाही, फक्त पाचवी. धंदा गवंडीकाम. दिवसभर काम करून पाच वर्षे रात्रीच्या प्रौढ शिक्षणवर्गात काढली. हक्कासाठी संघर्ष करायचा तर शिक्षण हे हवेच, या जाणिवेपोटी शिक्षण घेतलेले.

'मसुरे, आपण राजकारणात कधीपासून आहात ?'......माझा प्रश्न.

'कधीपासून ? साहेब, गवयाचं पोर जसं सुरात रडतं तसं संघर्ष आमच्या रक्तातच भिनलेला आहे. मी बाबासाहेबांचा अनुयायी. त्यांचं दर्शन घडावं म्हणून त्या काळी म्हणजे १९५६ च्या पूर्वी औरंगाबादला अनेक चकरा मारल्या !'

'काय उदगीर ते औरंगाबाद ?'

मी ताडकन उडालो. कुठे औरंगाबाद व कुठे उदगीर ! मराठवाडयाच्या पूर्व–पश्चिमेला असलेली ही दोन गावं. त्या काळात, कोणतीही फारशी प्रवासाची साधनं उपलब्ध नसताना दीड–दोन रुपये मिळवणाऱ्या गवंडयानं, केवळ बाबासाहेबांसाठी एवढा

प्रवास करावा ही काही साधी गोष्ट नव्हे. बाकी हा मसुरे खरोखरच ग्रेट माणूस !–

...' दुर्दैवानं दर्शन मात्र कधीच झालं नाही. बाबासाहेब महिन्यातून कधी तरी औरंगाबादला यायचे. अशा वेळी मी औरंगाबादेत असलो तर बाबासाहेब मुंबईत असायचे व आम्ही उदगीरला परतलो की, बाबाहेब औरंगाबादेत. अशी नेहमी चुकामूक व्हायची. १९५७ नंतर रिपब्लिकन पक्षाचे दोन तुकडे झाले. आम्ही गायकवाडांच्या गटात काम सुरू केले.'

' आपला खा. दादासाहेब गायकवाडांशी कधी संबंध आला का ? म्हणजे गप्पा-बोलणे वगैरे. –"

" होय ! बराच वेळा. ते आजारीपणात काही काळ पुण्यातच होते. त्या वेळी रोजच बोलणे–बसणे व्हायचे. "

" मसुरे, आपण गाव कधी सोडलेत ?"

" मी १९६१ ला गाव सोडले. ६१ ते ६६ आंध्र प्रांतातील 'कोचम्पाड ' या ठिकाणी धरणाचे काम चालू होते. तिथे एक लहानसे कॉंट्रॅक्ट मिळाले. 'कोचम्पाड ' धरणावर महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतून सुमारे १०–१२ हजार मजूर कामाला आले होते. पंधरा–वीस वर्षांचे हे काम असल्याने मुलाबाळांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. मुलांच्या मराठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आम्ही प्रयत्न चालविले; पण आंध्र सरकार दाद देईना. साहेब, आपण महाराष्ट्रीयन माणसं किती सरळ बघा ! इथे, या मराठीचे माहेरघर असलेल्या पुण्यातदेखील इंग्रजी, उर्दू, कानडी, तेलगू अशा किती तरी बिगरमराठी शाळा गुण्यागोविंदाने नांदत आहेत. त्या वेळी आंध्र सरकारने आम्हाला स्पष्टपणे सांगितले, ' उर्दू, इंग्रजी, तेलगू यापैकी कोणत्याही भाषेतील शिक्षणाची सोय आम्ही करू; पण मराठीची मात्र सोय होणार नाही !'

'मग तुम्ही काय केलेत ?'

' संघर्ष ! त्यासाठी दुसरे काय करणार ?'

' हा प्रश्न तुम्ही फक्त दलितांच्या मुलांसाठी हाताळलात की सर्वांसाठी ?'

' साहेब, मुलं ती मुलं ! दलितांची काय किंवा सवर्णांची काय ! मुलांना शिक्षण मिळाले नाही तर त्यांच्या जीवनातला अंधार सर्वांपुढेच राहणार होता. हा लढा सर्वच मुलांसाठी होता. मी तहसीलदार तसेच निजामाबादचे कलेक्टरांची भेट घेतली; पण कोणीच दाद देईना. शेवटी हैदराबादला जाऊन 'जय ईश्वरी' यांची भेट घेतली. त्या रिपब्लिकन पार्टीच्या आंध्र विधानसभेच्या सभासद होत्या. त्यांची भेट घेऊन मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्यापुढे मांडला व लगेच सूत्रे हलली. मराठी शाळा सुरू झाली. साहेब, माझ्या जीवनातला हा पहिला लढा ! मेव्हण्याच्या मृत्यूनंतर पत्नी गावी परतली. त्यानंतर धंदाही विस्कळित झाला. १९६७ साली पुण्याला आलो. गवंडीकाम करीत राजकारण–समाजकारण दोन्ही चालूच होते. १९६७ ला पिंपरीत येऊन या ठिकाणावर जे बिऱ्हाड थाटले ते आजही कायम आहे. सध्या धंदा–बिंदा काही करीत नाही. पोरगा सर्व बघतो. '

'आपण हे सर्व करता तेव्हा तुरुंगात वगैरे जाण्याची पाळी...?'

' काय विचारता काळेसाहेब ? तुरुंग तर आमच्या पाचवीलाच पुजलेला ! ७२ ला सर्व पक्षीय महागाईविरोधी कृतिसमितीच्या आंदोलनात ५ महिने सक्तमजुरीची शिक्षा भोगली. त्यानंतर सवलती, नामांतर-वगैरे वेळीही तुरुंगाच्या वाऱ्या झाल्याच. आतापर्यंत १० ते १५ वेळा तुरुंगाची हवा खाल्लेली आहे, नव्हे मारही खाल्लेला आहे ! ... पण तुम्ही हे सर्व छापणार का ?' मसुरीचा प्रश्न.

' का नाही ? शंका वाटते का ?'

' तसे नव्हे काळेसाहेब, राग येऊ देऊ नका. तुमचे पुण्यातले पत्रकार–सदाशिवपेठी संस्कृतीतले. भरल्या पोटाने तोलून–मापून क्रांतीची भाषा करणारे, साडेतीन टक्केवाले ! आता हे पहा, १८–२–८३ रोजी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना केली म्हणून आम्ही मोर्चा काढला. त्यात मला अटक केली. पुण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांनी अर्वाच्य शिवीगाळ करून मारहाण केली. शिवाय माझ्यावर पिस्तोल रोखून 'या भडव्याला गोळी घालून ठार मारले पाहिजे !' असे शब्द वापरले; पण पुण्याच्या एकाही पेपरवाल्यांनी ते छापले नाहीत !'

'हे पहा मसुरे, ही घटना तुम्ही पत्रकारांच्या नजरेला आणून दिलीत का ?'

' आम्ही त्यांच्या नजरेला आणून द्यायची ? कुठे काय घडते हे पाहण्याचे काम पेपरवाल्यांचे की आमचे ? एअरकंडिशण्ड खोल्यांत बसून बातम्या खरडणाऱ्या, बिअरबारमध्ये बसून सामाजिक विषमतेवर बोलणाऱ्या मंत्र्यांच्या पुढे पुढे करणाऱ्या या लोकांना आम्ही जाऊन बातम्या पुरवायच्या हा कुठला न्याय ? ते जाऊ द्यात. पो. अधिकाऱ्यांनी केलेला प्रकार मी शनिवारवाड्याच्या जाहीर सभेत सांगितला. या प्रकाराबाबत पार्टीचे सेक्रेटरी व्ही. एस. माने यांनी मा. पोलीस कमिशनरांना दि. २२–२–८३ रोजी निवेदनही दिले. त्याची एकेक प्रत सर्व पत्रकारांनाही दिली; पण त्यांनी चार ओळी काही त्याबाबत दिल्या नाहीत ! ही घरा त्याची प्रत तुम्हाला. बघू तुम्ही काय करता ते. काळे, यात प्रसिद्धीचा कोणताही भाग नाही. मी कोणी स्मगलर–गुन्हेगार नाही. एका मान्यवर पक्षाचा राजकीय कार्यकर्ता आहे. पोलीसअधिकाऱ्यांनी गुन्हेगारांच्या कोठडीत डांबून मला जी दमदाटी केली ती योग्य आहे का ? अन्यायाला पत्रकारांनी वाचा फोडायची नाही तर कोणी ?'

हा प्रकार घडल्यानंतर, मसुरे, तुम्ही कोणाकडे गेला नाहीत का? म्हणजे समाजवादी नेत्यांकडे वगैरे ?' ... मी.

...' साहेब, हे समाजवादी सगळे सदाशिवपेठी ब्राह्मण ! आम्हांला त्यांच्या जातीशी काही कर्तव्य नाही. समाजवाद्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी दलित चळवळ वापरली असा आमचा स्पष्ट आरोप आहे. समाजवाद्यांसारखी लबाड, स्टंटबाज, खोटारडी माणसं तीच. दलितांच्या उद्धारापेक्षा दलित चळवळीचे नाव घेऊन समाजवादी पक्ष हा तळागाळातला पक्ष आहे, दलितांवर प्रेम करणारा आहे. हो, त्यांची नाटकंच फार ! एक वेळ संघ–जनसंघवाले परवडले. ते निदान नाटकं तरी करीत नाहीत. जे करतात ते उघडपणे; पण हे समाजवादी नकोत ! प्रसिद्धीची माध्यमं सर्वांत जास्त त्यांच्याच हातात असल्याने ते स्वतःची टिमकी वाजविण्यात वाकबगार बनले आहेत. नामांतरात मात्र ते उघडे पडले. '

... ' मला यात गैरसमजाचा भाग अधिक वाटतो.'

'गैरसमज? नामांतराला विरोध करणारे गोविंदभाई श्रॉफ, नरहरी कुरुंदकर वगैरे सर्व समाजवादीच नव्हे तर कोण ?'

'दलित मुक्तिसेनेतर्फे 'दलितस्थान'ची मागणी केली जात आहे. आपण त्यात सहभागी आहात काय ?'

'छे ! छे ! आम्ही भारतीय आहोत. गेल्या कित्येक शतकांपासून आमचे पूर्वज याच मायभूमीवर राहत आले आहेत. आमच्या बाबासाहेबांनी ज्या देशाची घटना लिहिली तो देश सोडणे म्हणजे मी देशद्रोह समजतो ! असे केले तर चिनी, पाकिस्तानी लोकांत आणि आमच्यात फरक तो काय ? समाजातल्या लोकांनी अन्याय केला हे खरे आहे. न्याय मिळेपर्यंत आम्ही त्यांच्याशी जरूर संघर्ष करू; पण 'भारतभूमी' सोडून देण्याची कल्पनादेखील आम्ही सहन करणार नाही ! हा तिरंगा ध्वज आमचा राष्ट्रध्वज आहे. ज्यासाठी आमच्या हुतात्म्यांनी बलिदान केले त्या राष्ट्रध्वजाच्या रक्षणासाठी आम्ही प्राणार्पण करायलादेखील मागे-पुढे पाहणार नाही ! 'दलित मुक्ति सेनावाले' खरोखरच वेडे आहेत. आपण काय करीत आहोत हे देखील त्यांना समजेनासे झाले आहे.'

'मसुरे, सवलतींबाबतीत आपले मत काय ?'

'सवलती या आर्थिक निकषावर असाव्यात. जे कोणी आर्थिकदृष्ट्या दुबळे आहेत ते सर्व दलित. जात पाहण्याचे कारण नाही. मग त्यात एखादे कुटुंब मराठ्याचे असेल, एखादे ब्राह्मणाचे असेल. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतील त्या सर्वांनाच मदत मिळायला हवी. मग ते कोणीही असोत. मदतीची क्रमवारी गरजेनुसार असावी. दहा माणसे जखमी झाली असतील तर सर्वांवर औषधोपचार होणे गरजेचे असले तरी सर्वांत प्रथम जो सिरीयस आहे, त्याच्यावर औषधोपचार व्हावा. त्यानंतर मग हातपाय मोडलेला, पायाला किरकोळ जखम झालेला, यावर उपचार व्हावेत. आम्ही गेल्या कित्येक शतकांपासून पशूंपेक्षाही खालच्या दर्जाचे जीवन जगत आहोत. तेव्हा पिढ्यानपिढ्या झालेल्या अन्यायातून 'माणसाच्या' पातळीवर येईपर्यंत मदत मिळणे गरजेचे आहे, इतकेच मला म्हणावयाचे आहे. आले ना लक्षात ?'

'हे झाले तुमचे राजकीय कार्य. सामाजिक कार्य म्हणून आपण काय काय करता ?'...मी.

'त्याचे काय आहे साहेब, मी काही फार शिकलेला नाही; पण माझ्या कुवतीनुसार मी करीत असतो. कर्ज मिळवून देणे, नडल्या–अडल्यांना मदत करणे. एक सांगायचे राहून गेले...आमचा संघर्ष अन्यायाविरुद्ध आहे. आम्ही कोणत्याही जाती–धर्माच्याविरुद्ध नाही. आमच्या पूर्वजांवर समाजाने अन्याय केला म्हणून आम्हाला कोणावर सूड उगवायचा नाही. समाजाने आम्हाला सन्मानाने वागवावे ही आमची रास्त मागणी आहे.'

बराच वेळ झालेला होता. चहा आला. मसुरे यांनी जेवण घेण्याचा आग्रह केला; पण अनेकांना भेटायचे असल्याने मी टाळले. लॉजचा रस्ता धरला.

## डीएस्फोर–४१० शाखा

दलितचळवळीत नव्याने अस्तित्वात आलेली 'DS4' ही नवी संघटना. दलित 'शोषित समाज संघर्ष समिती' याचे DS4 हे संक्षिप्त रूप. स्थापना ?७ डिसेंबर १९८१. या संघटनेचे अखिल भारतीय अध्यक्ष आहेत, 'कान्शीरामजी'. 'कान्शीरामजी' हे पंजाबचे राहणारे. पूर्वी ते 'बामसेफ' नावाची कर्मचारी संघटना चालवीत होते. 'बामसेफ'चेच DS4 हे नवे रूप. अशा या DS4 चे पिंपरीत डॉ. रंगारी हे काम पाहतात.



आम्ही भारतीय आहोत
श्री. मसुरे

भारतातील ४२५ जिल्ह्यांपैकी ४१० जिल्ह्यांत संघटनेच्या शाखा असल्याची माहिती डॉक्टर रंगारी यांनी दिली.

'डॉक्टर, आपल्या DS4 चे ध्येय कोणते ?' पूर्वपरिचय व येण्याचा हेतू स्पष्ट करून डॉक्टरांच्या दवाखान्यातच बैठक मारीत मी प्रश्न केला.

...'जातीयवादी ब्राह्मण, भांडवलदार, जमीनदार यांची अपवित्र युती मोडून काढून दलितांचे शोषण थांबविणे. या तिन्ही घटकांनी मजबूत केलेली अन्याय्यव्यवस्था टिकवून ठेवणारी यंत्रणा, त्यांची साधनं, माध्यमं उध्वस्त करण्यासाठी संघर्ष देणे. स्वातंत्र्य–समता– बंधुता आणणे.'

'हे ठीक आहे; पण त्यासाठी मार्ग कोणता ?'

'कोणता म्हणजे ? डॉ. आंबेडकर आणि फुले यांचा !'

'आपण DS4 कडे कसे काय वळलात ?'

'मी प्रथम ७०–७२ च्या काळात रिपब्लिकन पार्टीचे काम केले. ७३ ते ७७ मध्ये दलित पँथरमध्ये काम केले आणि गेल्या वर्षी इकडे वळलो.'

'आपण दलित पँथरमध्ये होता तेव्हा दलित पँथर स्थापनेमागचा हेतू सांगता येईल का ?'

'हो, सांगू शकतो. दलित पँथर माझ्या माहितीप्रमाणे अस्तित्वात आली ती रिपब्लिकन पक्षातील निरनिराळ्या गटांना म्हणजे गवई, खोब्रागडे, कांबळे या सर्वांना एकत्रित आणण्यासाठी; पण दुर्दैवाने पँथरच फुटली !'

'पँथर फुटण्याचे आपल्या दृष्टिकोनातून कारण ?'

'संघटनेची बांधणी विशिष्ट तत्त्वावर व्हायला हवी, तरच ती मूळ धरू शकते. एखाद्या विवक्षित प्रश्नावर संघटना उभी राहिल्यास ती तो प्रश्न निकालात निघाल्यास वा जुना झाला की फुटते. कारण कोणतीही संघटना सर्वस्पर्शी कार्यक्रम असेल तरच टिकते.'

'आपल्या संघटनेच्या कार्यक्रमाचे स्वरूप म्हणजे ?'

'म्हणजे– मोर्चा, निदर्शने, निवेदने, घेरावो को अन्य काही ?'

पृष्ठ २१ वर




# पोलंडचा पुरुषोत्तम लेक वालेसा

सॉलिडॅरिटीची म्हणजे पर्यायानं वालेसाची सर्वांत मोठी कमाई कोणती असेल तर ती म्हणजे मतप्रदर्शनाचं स्वातंत्र्य ! सॉलिडॅरिटीची बुलेटिन्स आणि नव्यानं निघालेली शेकडो वर्तमानपत्रं अगदी मोकळेपणानं मतं मांडू लागली. त्यातील काही काही लेख असे असत की, ज्यातलं एक अक्षरदेखील यापूर्वी प्रसिद्ध होऊ शकलं नसतं. इतर कम्युनिस्ट देशांतल्या न्यूज–सेन्सॉरशिप मंडळांना ही वार्तापत्रं वाचणं हा एक विस्मयजनक आणि भयचकित करून सोडणारा प्रकार होता. सॉलिडॅरिटीचं पूर्वी गुप्तपणे निघणारं साप्ताहिक सॉलिडॅरॅनॉस्क आता राजरोसपणे लोकांना वाचता येऊ लागलं होतं. त्यात एक लेख वरिष्ठ राजकीय पुढारी आणि शासकीय अधिकारी यांच्या ऐषारामी जीवनावर विदारक प्रकाश टाकणारा होता. दोन महिन्यांपूर्वी असा लेख प्रसिद्ध झाला असता तर सॉलिडॅरिटीच्या नेत्यांना गोळ्या घालून ठार मारण्यात आलं असतं ! त्या लेखाचा सारांश असा :

: प्रजेच्या हिताचं काळजीपूर्वक रक्षण करणाऱ्या नेत्यांचा त्याग प्रजेच्या डोळ्यांत पाणी आणवणारा आहे. सर्वसामान्य माणसाला दैनंदिन गरजेच्या वस्तू मिळविण्यासाठी दररोज तासंतास लांबलचक रांगेत उभं रहावं लागतं. एवढं करून तीन तासांनंतर 'माल संपला' अशी पाटी दिसणारच नाही याची खात्री देता येत नाही. याउलट सरकारी अधिकाऱ्यांच्या घरी वर्षभराचा दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा साठा आगाऊच येऊन पडलेला असतो. या लांबलचक रांगांत आपली भर पडून प्रजेच्या त्रासात जास्ती भर पडू नये असा यामागचा सद्हेतू (?) असावा. नवविवाहित जोडप्यांना दोन खोल्यांच्या फ्लॅटसाठी वीस–वीस वर्षं थांबावं लागतं अन् दहा वर्षांची कमाई त्यासाठी खर्ची घालावी लागते. स्वतःसाठी नोंदणी केलेली घरं मुलामुलींच्या संसाराला नव्या कोऱ्या अवस्थेत हाती येतात. सरकारी अधिकाऱ्यांना मात्र सहा–सहा खोल्यांचे दोन–दोन फ्लॅट्स् बहाल करण्यात आलेले असतात. सुट्टी आरामात घालवण्यासाठी समुद्रकाठी असलेली यांची हॉलिडेहोम्स भांडवलशहांना लाजवतील इतक्या सुरेख रीतीनं सजवण्यात आलेली असतात. ज्यांना शक्य आहे त्यांना वीस महिन्यांचा पगार आगाऊ भरूनदेखील वीस–वीस महिने गाडी मिळू शकत नाही. सरकारी अधिकाऱ्यांना सरकारी गाड्या, सरकारी पेट्रोल भरून हव्या तेव्हा, हव्या तशा मिळतात; पण एवढ्यावर समाधान न मानणाऱ्या अधिकाऱ्यांना खाजगी वापरासाठी पैसे टाकताच गाड्या मिळू शकतात. समतेचा जयघोष करणाऱ्या या कल्याणकारी राज्यात जी विषमता आढळून येते तिचं कौतुक करावं तितकं थोडंच !

या लेखाची प्रत सरकारी अधिकाऱ्यांना दाखवून रशियन राजदूतानं एकच प्रश्न केला, 'हा लेख रशियन हायकमांडच्या नजरेत आला तर मी त्याविषयी काय स्पष्टीकरण देऊ ?' अर्थात याचं स्पष्टीकरण पोलंडचे सरकारी अधिकारीही समाधानकारकरीत्या देऊ शकले नाहीत. कारण...आपल्याला स्पष्टीकरणाची गरज असते, सत्याला नव्हे !

पूर्वी ज्या विषयांची जाहीर चर्चा करणं हा गुन्हा ठरत असे, असे विषय विद्यार्थी, प्राध्यापक आणि वार्ताहर मोकळेपणानं चर्चेसाठी घेऊ लागले. दोन महायुद्धा–दरम्यानचा पोलंडचा इतिहास लोकांना जितका जिव्हाळ्याचा वाटत होता तितकाच तो सरकारी अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या रशियन पाठिराख्यांना त्रासदायक वाटत होता. या विषयावर आता जाहीर परिसंवाद घडवून आणले जाऊ लागले.

कम्युनिस्ट पक्षाचं मुखपत्र मानल्या गेलेल्या पॉलिटिका साप्ताहिकाचा खप ३,५०,००० इतका होता; पण सॉलिडॅरॅनॉस्कचा मुक्त वावर सुरू होताच त्याचा खप कमी होऊन सॉलिडॅरॅनॉस्कचा खप ५ लाखांच्या घरात गेला. याचाच अर्थ पोलिश लोक खोट्या जाहिरातबाजीला कंटाळले होते.

तो विचारतो, 'भरल्या पोटी स्वातंत्र्याचे विचार सुचू शकतात, उपाशी पोटी नाही. म्हणून मी म्हणतो आधी लोकांचे पोटाचे प्रश्न सोडवू या, मग त्यांच्या मनाचा विचार करू या. हे बुद्धिमान विचारवंत स्वतःला समजतात तरी काय ? या घिसाडघाईमुळं मिळालेलं सारंच गमावून बसावं लागेल !'

लेखांक : सातवा

लेखक : श्रीकांत मुंदरगी

## रशियन अस्वलाला वेसण

आकाशवाणीवर सॉलिडॅरिटीच्या नेत्यांसाठी मधूनमधून त्यांच्या कार्यक्रमांसाठी काही वेळ देण्यात येऊ लागला. मात्र टेलिव्हिजनवर सॉलिडॅरिटीच्या कार्यक्रमांना मुळीच वाव देण्यात आला नाही. त्यामुळं संतापून जाऊन काही सदस्यांनी जबरदस्तीनं टेलिव्हिजनच्या स्टुडिओत घुसण्याचा प्रयत्न केला. तेथील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी स्वतः पुढं होऊन हा प्रयत्न हाणून पाडला. याचा परिणाम असा झाला की, १९८१ च्या ऑक्टोबरमध्ये गडॅन्स्क येथे भरलेल्या सॉलिडॅरिटीच्या परिषदेचं चित्रण पोलिश टेलिव्हिजनला करू देण्यात आलं नाही. अखेर या परिषदेचं चित्रण त्यांना ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कार्पोरेशनच्या सिने-विभागाकडून उसनवार घेण्याची पाळी आली.

गडॅन्स्क परिषदेचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे परिषदेच्या निमित्तानं धर्मगुरूंना आकाशवाणीवरून लोकांशी बोलण्याची संधी देण्यात आली. इतक्यावरच ही गोष्ट थांबली नाही तर दर रविवारी धर्मगुरूंचे उपदेश आणि प्रार्थना आकाशवाणीवरून प्रक्षेपित करण्यात येऊ लागल्या. प्रिस्ट आणि ननसना धर्मोपदेशासाठी रुग्णालयं, शाळा, कॉलेजं आणि इतर संस्था खुल्या करण्यात आल्या. पूर्वी लोकांना धर्मापासून दूर नेण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला जात होता; पण सॉलिडॅरिटीच्या यशस्वी चळवळीमुळं धर्मविरोधी सरकारी बंधनं बऱ्याच अंशी शिथिल झाली आणि लोक व धर्म यांच्यात पुन्हा एकदा खुलेपणानं सुसंवाद सुरू झाला.

सॉलिडॅरिटीच्या टोपीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला तो बंडखोर लेखकांना मिळालेल्या संपूर्ण लेखनस्वातंत्र्याचा. पोलंडचा सुप्रसिद्ध कवी झेस्लाव मिलॉस याला नोबेल पारितोषिक देऊन जगानं त्याचा सन्मान केला होता. पोलिश सरकारला त्याचं हे यश सहन झालं नाही. कारण त्याच्या काव्यात जागोजागी व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्‌घोष करण्यात आला होता. सरकारनं त्याचा सन्मान करायचा तर सोडाच; पण त्याच्यावर वेडेवाकडे निर्बंध लादून अवमानित जिणं जगण्याची पाळी आणली. मानखंडना असह्य झाल्यामुळं या विचाऱ्याला अखेर १९५० साली परागंदा व्हावं लागलं ! अज्ञातवासात गेलेला हा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा कवी ८१ च्या जूनमध्ये जेव्हा मायदेशी परतला तेव्हा त्याच्या स्वागतासाठी हजारो पोलिश लोक जमले होते. सरकारनं आपले सांस्कृतिक प्रतिनिधी त्याच्या स्वागताला पाठवून साऱ्यांनाच गोड आश्चर्याचा धक्का दिला !

'झियादी' हे ॲडम मिकायव्हिक्झ यानं १९ व्या शतकात लिहिलेलं नाटक रशियन सत्ताभिलाषेची टवाळी उडविणारं होतं. दुसऱ्या महायुद्धानंतर या नाटकावर सरकारनं अनधिकृतपणे बंदी घातली होती. या नाटकाला पुन्हा एकदा उजाळा देऊन टेलिव्हिजनवर त्याचे प्रयोग करण्यात येऊ लागले. रशियन अस्वलाला वेसण घालून गुदगुल्या करण्यापैकीच हा प्रकार होता.

## हे तर धक्कादायकच !

काझीमियरेझ देजमेक या नॅशनल पोलिश थिएटरच्या प्रमुख दिग्दर्शकाला १९६८ साली त्याच्या सरकारविरोधी धोरणामुळं पदच्युत करण्यात आलं होतं. सरकारविरोधी धोरण एवढ्यासाठीच म्हणायचं की, सरकारची टिमकी वाजविण्यास तो सदैव नाखुश असे. या माणसाची नॅशनल थिएटरच्या प्रमुखपदी पुन्हा एकदा एकमतानं निवड करण्यात आली.

'वर्कर्स ८०' हा लेनिन बोटकारखान्याच्या संपाचा लघुपट आणि आंद्रे वाज्दा याचा गडॅन्स्क येथील घटनांवर आधारित 'मॅन ऑफ आयर्न' ( ज्यात वालेसाची भूमिका स्वतः वालेसानंच केली होती ) हा चित्रपट या दोन्हीवरही पोलिश सेन्सॉरनं प्रदर्शनबंदी घातली होती, ती मागं घेण्यात येऊन सर्व देशभर ते प्रदर्शित करण्यात आले. उत्तम करमणूकप्रधान चित्रपटांना होणार नाही अशी तोबा गर्दी या चित्रपटांना होऊ लागली. गंमतीचा भाग असा की, कम्युनिस्ट जगताला आजवर ठाऊक नसलेला तिकिटांचा काळाबाजार या चित्रपटांसाठी सुरू झाला. खऱ्याखुऱ्या अर्थानं भांडवलशाहीनं कम्युनिझमच्या अंतरंगात प्रवेश केला होता.

नागरिकांना पासपोर्ट देणं पूर्वी सरकारच्या जिवावर येई. अगदी नाइलाज झाल्याशिवाय कुणालाही पासपोर्ट देण्यात येत नसे. विरोधात उभ्या ठाकलेल्या पुढाऱ्यांना तर खड्यासारखं वगळण्यात येत असे. परदेशप्रवास ही केवळ सरकारी अधिकाऱ्यांचीच मोनापली असायची; पण सॉलिडॅरिटीच्या चळवळीमुळं इच्छुक नागरिकांना सहजपणे पासपोर्ट मिळू लागले. लेक वालेसा तर एखाद्या पाश्चिमात्य प्रवाशासारखा जगप्रवास करू लागला. त्यानं जगप्रवासाची सुरुवात



**पोप जॉन पॉल – मी तुमच्या पाठीशी आहे !**

¤

रोमच्या भेटीनं करण्याचं ठरविलं. देशाइतकंच धर्मावर प्रेम असलेला ह्या माणूस आपल्या प्रवासाची सुरुवात अशी न करता तरच नवल !

पोप जॉन पॉलच्या दर्शनासाठी रोमला गेलेल्या वालेसानं पोपना पाहताच त्यांच्यासमोर जमिनीवर गुडघे टेकले आणि त्यांच्या हातातल्या पवित्र अंगठीचं चुंबन घेतलं. हा प्रसंग कम्युनिस्ट देश सोडले तर जगातल्या बहुतेक राष्ट्रांच्या टेलिव्हिजनवर दाखविण्यात आला. या भावनोत्कट दृश्याचं चित्रण पोलिश लोकांना देखील पहायला मिळालं हे त्यांचं सद्भाग्यच ! वर्षानुवर्षं उराशी कवटाळण्यात आलेली कम्युनिझमची तत्त्वप्रणाली पुन्हा एकदा नव्यानं क्रांतीची वाटचाल करू पहात होती आणि धर्मभावनेशी नव्यानं सुसंवाद साधू पहात होती !

पोप सहसा कुणालाही खाजगी भेटीसाठी वेळ देत नाहीत. वालेसाला मात्र त्यांनी खाजगी भेटीसाठी पाचारण केलं. अर्धा तास झालेल्या या भेटीत काय चर्चा झाली हे जरी जगाला समजू शकलं नाही तरी नंतर झालेल्या जाहीर समारंभात इतर कोणत्याही धर्मगुरूपेक्षा जास्त मान असलेल्या या महान धर्मगुरूनं, जगातल्या कोणत्याही कामगार-पुढाऱ्यापेक्षा जास्ती लोकप्रियता लाभलेल्या वालेसाविषयी प्रशंसोद्गार काढले आणि त्याच्या क्रांतिकार्याला सुयश चिंतिलं.

> जगातल्या सर्व कामगारवर्गाच्या सुख-दुःखांचं, आशा-आकांक्षांचं तू प्रतीक बनला आहेस. तू आणि तुझ्या सहकाऱ्यांनी चालविलेल्या या कल्याणकारी कार्याला माझा सदैव पाठिंबाच राहील ! तुमच्यावर ज्या ज्या वेळी संकटं येतील त्या त्या वेळी मी प्रत्यक्ष सहाय्य करू शकलो नाही तरी माझ्या प्रार्थना तुमच्या पाठीशी असतील. कोणत्याही सत्कार्याला परमेश्वराचा नेहमीच आशीर्वाद असतो हे कधीही विसरू नका !'

या भेटीमुळं वालेसाच्या कार्याला नवा जोम आला. पोप पॉल यांच्या शुभेच्छा म्हणजे सॉलिडॅरिटीच्या कार्याला मिळालेली शाबा सकीच होती. धर्मसत्ता आणि लोकसत्ता यांचं हे अपूर्व मीलन सरकारचा मस्तकशूळ उठविण्यास कारणीभूत झालं नसेलच अस नाही.

पोलंडच्या हजारो नागरिकांनी नव्यानं मिळालेल्या या प्रवास स्वातंत्र्याचा मनसोक्त फायदा घेतला. जवळजवळ लाखभर लोक परदेश-प्रवासाला गेले. स्वातंत्र्याचा पूर्ण उपभोग घेत असलेल्य राष्ट्रांना ज्यांनी भेटी दिल्या त्यांना तिथल्या व्यक्तिस्वातंत्र्यानं भारा वून टाकलं. प्रत्येक माणूस आपल्या इच्छेनुसार कसंही वागू शकतं याचीच त्यांना नवलाई वाटत होती. पाश्चिमात्य देशातली समृद्धी आणि सुबत्ता पाहून कित्येकांचे डोळेच फिरले. दैनंदिन गरजेच्या वस्तूंसाठी कुठंही रांगा दिसू नयेत ही एक त्यांच्या दृष्टीनं आश्चर्याचीच गोष्ट होती. मोटारी मिळविण्यासाठी आगाऊ पैसे भरून वाट पाहणं तर सोडाच, उलट मोटरविक्रेते उत्तमोत्तम गाड्या नुसतां फोनवरून कळविताच दाराशी आणून लावतात आणि नंतर पैसे दिले तरी चालतात ही गोष्ट प्रत्यक्ष पाहूनही त्यांना पटेना. लोक कपड्याप्रमाणं गाड्या आणि घरं बदलतात हा तर धक्कादायकच प्रकार होता. परिणाम एवढाच की परदेश-प्रवासास गेलेल्या लक्षावधी लोकांपैकी ३३,००० लोक मायदेशी परतलेच नाहीत !

## काही बंडखोर ठराव

आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे पोलिश इतिहासात घुसडण्यात आलेल्या कम्युनिझमचं महत्त्व वाढविणाऱ्या खोट्या-नाट्या घटना इतिहासाच्या शालेय अभ्यासक्रमातून वगळण्यात आल्या. सॉलिडॅरिटीच्या आग्रहामुळं अक्षरशः हजारो पुस्तकं फेकून देण्यात आली. पोलंडचा खराखुरा इतिहास सांगणाऱ्या नव्या पुस्तकांची छपाई करून घेण्यास सरकारनं संमती दिली. दोन महायुद्धांच्या दरम्यान रशियन साम्राज्यवादाला विरोध करणाऱ्या मार्शल जोसेफ पिल्सुडेस्की या कडव्या देशभक्ताच्या स्मृतींना पुन्हा उजाळा देऊन काही पाठ्यपुस्तकांत त्याच्या देशभक्तीच्या कथा समाविष्ट करण्यात आल्या. पोलंडच्या नव्या पिढीला पोलंडचा सत्यपूर्ण अन् तेजस्वी इतिहास आता ठाऊक होणार होता. झोपी गेलेली पोलंडची अस्मिता आता खऱ्या अर्थानं जागी होणार होती; पण या सर्वांवर कळस चढविला तो गडॅन्स्कच्या बोटकारखान्यासमोर उभारण्यात आलेल्या हुतात्मा स्मारकानं ! या १३८ फूट उंचीच्या गगनचुंबी स्तंभामुळे पोलंडची अस्मिता आकाशाला जणू गवसणी घालण्याचा प्रयत्न करणार होती.

स्वातंत्र्यासाठी सुरू करण्यात आलेला लढा जिंकण्यात काही अंशी सॉलिडॅरिटी यशस्वी झाली होती; पण भाकरीसाठी सुरू झालेला लढा अजूनही कसलंच यश मिळवू शकला नव्हता. मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपभोग उपाशी माणसं घेऊ शकणार नव्हती. भरल्या पोटावरच इतर सर्व गोष्टींचे विचार माणसाला सुचू शकतात.

म्हणून भाकरीचा लढा अयशस्वी झाला तर इतर सर्व यशाची किंमत शून्य ठरणार होती. म्हणूनच देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सुधारणं सर्वांत महत्त्वाचं होतं. नेमकी ही एकच गोष्ट अत्यंत अवघड होती. त्यासाठी सुरुवात कोठून करायची हा प्रश्न सॉलिडॅरिटी आणि सरकारलाही पडला होता. सॉलिडॅरिटीनं सरकारला काही पर्याय सुचविले.

: अकार्यक्षम आणि लाचखाऊ अधिकाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावं.

: कारखाने, खाणी, गिरण्या इत्यादींच्या प्रमुखपदी नेमण्यात आलेल्या लोकांची सरकारविषयीची निष्ठा ध्यानात घेण्यात आली होती. त्यांच्या कामाचा अनुभव जमेस धरण्यात आला नव्हता. अशा पद्धतीला पोलिश भाषेत Nomenklatura ( वांझ कार्यपद्धती ) असं म्हटलं जातं. ती बंद करून पक्ष वा सरकारनिष्ठेपेक्षा कार्यक्षमतेच्या गुणांवर माणसं नेमण्यात यावीत.

: शक्यतो कामगारांनी निवडलेले अधिकारी कारखान्याच्या प्रमुखपदी नेमण्यात यावेत. कारखान्याच्या उत्पादनक्षमतेची काळजी त्यांनी घ्यावी. अपयशाचा जाब त्यांना कामगार-कौन्सिलला द्यावा लागेल. हा प्रयोग अयशस्वी झाला तर त्यावर नवा तोडगा काढण्यात यावा.

याही पुढं जाऊन सॉलिडॅरिटीनं आणखी एक तोडगा सरकारला सुचविला, तो म्हणजे कारखाने, खाणी वा गिरण्या तेथील युनियन्सच्या ताब्यात देण्यात याव्यात. कामगारांच्यावर ही जबाबदारी पडली की ते आपोआपच जास्त जागरूकतेनं उत्पादन वाढवायच्या मागं लागतील आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. वालेसाला हा तोडगा यशस्वी होईलच याची शाश्वती वाटत नव्हती. सेल्फ मॅनेजमेंटची जबाबदारी पेलण्याइतपत अनुभव आमच्या युनियन्सजवळ नाही. आम्ही यात यशस्वी होऊच अशी बिलकूल खात्री नाही. उलट यात अपयश येण्याचाच धोका जास्त आहे; पण हा प्रयोग करून पाहण्यास काहीच हरकत नाही. हे सारं सरकारच्या ताब्यात असूनही त्यांनी काय मोठी प्रगती करून दाखवलीय ? वालेसाच्या या प्रश्नाला सरकारजवळ उत्तर नसलं तरी सॉलिडॅरिटीचा 'सेल्फ मॅनेजमेंटचा' तोडगा सरकारला मुळीच मान्य नव्हता.

सप्टेंबरला सॉलिडॅरिटी काँग्रेससाठी जमलेल्या सभासदांनी आणखी एक पुढचं पाऊल टाकलं. सॉलिडॅरिटीनं सुचविलेली सेल्फ मॅनेजमेंट आणि सध्या चालू असलेली सरकारी मॅनेजमेंट यापैकी आपल्याला कोणती व्यवस्था हवी ते पोलिश जनतेनं सार्वजनिक मतदानानं (Referendum) ठरवावं, असा ठराव पास करून टाकला. सरकारनं हे जर मान्य केलं नाही तर सॉलिडॅरिटी सरकारवर बहिष्कार टाकून सेल्फ मॅनेजमेंटचा कार्यक्रम हाती घेईल, अशीही पुस्ती या ठरावाला जोडण्यात आली.

सॉलिडॅरिटीनं आणखी एक बंडखोर ठराव बैठकीत मंजूर केला, 'पोलिश पार्लमेंटच्या सदस्यांची निवड कम्युनिस्ट पक्षातर्फे न होता ती पोलिश जनतेच्या मुक्त मतदानानं व्हावी.' हा ठराव म्हणजे कम्युनिस्ट पक्षाला उघडउघड आव्हान होतं. कम्युनिझम आणि लोकशाही एकत्र नांदविणं म्हणजे साप आणि मुंगूस एका पिंजऱ्यात ठेवण्याचाच प्रकार होता.

### घटना अशा घडल्या

सरकारच्या कलानं घेऊन मागण्या पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या वालेसाला सॉलिडॅरिटीच्या जहाल मतवाद्यांनी आणखी एक मोठा धक्का दिला तो अनपेक्षितपणे एक तिखट ठराव सभेपुढे आणून. या ठरावानं पोलंडच्या सीमा ओलांडून रशियन साम्राज्यालाच सरळ चिमटा घेण्याचा प्रयत्न केला होता. पूर्वयुरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रं आणि खुद्द सोव्हिएट रशिया येथील कामगारांनी स्वतंत्र आणि स्वावलंबी कामगार युनियन्स प्रस्थापित करण्याचा लढा तातडीनं सुरू करावा, असा हा कम्युनिस्ट सत्ताधिशांच्या नाकाला मिरच्या झोंबविणारा ठराव होता. एखाद्या लोकशाही राष्ट्रात लष्कराला सरकारविरुद्ध चेतविण्यातलाच हा प्रकार होता. मास्कोनं या मागणीचा 'लोकांना सरकारविरुद्ध उघडउघड चिथवणारी प्रक्षोभक आणि निर्लज्ज मागणी' ( openly provocative and impudent) अशा शब्दात तिचा धिक्कार केला. शिवाय पोलंडच्या सरहद्दीवर १ लाख रशियन सैनिकांच्या लष्करी कवायती करून या दमदाटीच्या शब्दाबरोबर बडगाही दाखविला.

वालेसानं सॉलिडॅरिटीच्या जहाल मतवाद्यांना नरमाईचं धोरण स्वीकारण्याचा सल्ला दिला ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये नाही तर माती तोंडात जाते. अति मागायला गेलो तर पदरात पडलेलंही जाईल अन् वर सारा देशच धोक्यात येईल हे त्यानं सहकाऱ्यांना पटविण्याचा प्रयत्न केला; पण त्या वेळी त्याला कोणी जुमानलं नाही. नंतरच्या पंधरवड्यात सरकार आणि सॉलिडॅरिटी यांच्यात समझोता घडवून आणण्यात त्याला यश मिळालं. सरकारनं मान्य केलेली 'सेल्फ मॅनेजमेंट' कार्यपद्धती बरीचशी सरकारला अनुकूल होती. कारखाने, गिरण्या वा खाणी यांचे अधिकारी कामगार युनियनतर्फे निवडले जावेत; परंतु त्याला सरकारचीही मान्यता घेतली जावी. पोलिश पार्लमेंटनं हा कायदा म्हणून



सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी
आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावसं
वाटल्याशिवाय राहणार नाही
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. म. रा. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.



हे विचारवंत स्वतःला समजतात तरी काय ? ¤

मान्य करून घेतला. सॉलिडॅरिटीनंही याला मान्यता देऊन सरकारशी संघर्ष टाळला. याचं बहुतांशी श्रेय वालेसाच्या नरमाईच्या धोरणाला आणि कुशल नेतृत्वाकडं जातं; पण या नरमाईच्या धोरणामुळं वालेसाची लोकप्रियता काहीशी कमी झाली. सॉलिडॅरिटीच्या नेतेपदासाठी झालेल्या निवडणुकीत त्याला तीन जहाल मतवादी उमेदवारांशी लढावं लागलं आणि त्यात त्याला मिळालेल्या यशानं हेच सिद्ध झालं की सॉलिडॅरिटीला वालेसाच्या नेतृत्वावाचून दुसरा पर्याय नाही.

सॉलिडॅरिटीनं सरकारची सर्वच बाबतीत सबुरीनं घ्यावं या वालेसाच्या मताशी अनेक जण सहमत नव्हते. त्यामुळं नेतेपदाच्या निवडणुकीत त्याच्याविरुद्ध उघडउघड प्रचार करण्यात आला. अखेरीस वालेसा नेतेपदी निवडला गेला तो अल्पमताधिक्यानं. या गोष्टीचा वालेसाला विलक्षण राग आला. आपल्या नावाचा दबदबा इतका आहे की, या नावामुळं सरकार सॉलिडॅरिटीला प्रमाणाबाहेर सवलती देत आहे अन् असं असूनही आपली निवड एकमतानं केली जात नाही या गोष्टी त्याला मुळीच आवडल्या नाही.

त्याचा परिणाम असा झाला की, सॉलिडॅरिटी काँग्रेसच्या शेवटच्या समारंभात वालेसा सभागृहात फिरकलाच नाही. त्याऐवजी शेजारच्या बंदिस्त खोलीत बसून टी. व्ही. मॉनिटरवर सभेचं चालू असलेलं कामकाज पहात राहिला. परिषदेच्या शेवटी संमत झालेले ठराव वाचून दाखवून समारोपाचं भाषण करण्याचं काम निवडून आलेल्या नव्या नेत्याकडं असतं. वारंवार बोलावणं पाठवूनही वालेसानं हे समारोपाचं सर्वांत महत्त्वाचं काम करण्यास नकार दिला. यावरून वालेसा किती हेकट मनोवृत्तीचा आहे हे दिसून आलं. याबद्दल त्याचं स्पष्टीकरण वार्ताहरांनी विचारलं असता तो म्हणाला, 'सॉलिडॅरिटीच्या जहालमतवाद्यांना पार्लमेंट आणि सरकार नष्ट करून त्यांची जागा स्वत: घेण्याची इच्छा आहे आणि हे लोक सत्तेवर आले तर त्यांच्यापेक्षा जास्ती हुकुमशाही गाजवतील. ( He charged that some of his radical opponents wanted 'to destroy the Sejm [ parliament ] and government, take their place and become more totalitarian than they are,' )

काही काळ वालेसाला अंतर्गत वादळाला तोंड द्यावं लागलं सॉलिडॅरिटीला सामील झालेले काही विचारवंत वालेसावर टीकेची झोड उठवू लागले. वालेसा सरकारशी वाटाघाटी करताना नको इतकं नरमाईचं धोरण स्वीकारतो असा आरोप त्याच्यावर केला जाऊ लागला. सॉलिडॅरिटीची आर्थिक धोरणं ठरविण्यात सर्वांत महत्त्वाचा सहभाग असणारा अर्थशास्त्रज्ञ स्टीफन कुरोवास्की म्हणतो,

'वालेसा तसा बुद्धिमान नाही. विचारवंतही नाही. सल्लागारांनी जोरदार शब्दांत एखाद्या गोष्टीचं समर्थन केलं की, ती गोष्ट तो चटकन मान्य करतो. त्यामुळं अनेक वेळा चुकीच्या दिशेनं सॉलिडॅरिटी जाते, ती वालेसाच्या मागं असलेल्या लोकप्रियतेच्या वलयामुळं.' माणसाला एकदा मोठेपणां प्राप्त झाला की, त्याचे अवगुणही गुण ठरतात. हिमालयाएवढ्या मोठ्या चुका करणाऱ्या महान लोकप्रिय नेत्यांच्या बाबतीतही अनेक देशात अशाच गोष्टी घडत गेल्या आहेत, हे इतिहासानं पुनःपुन्हा दाखवून दिलं आहे.

आंद्रेज ग्वाझदा हा जहालमतवादी नेता वालेसाचा नेतेपदाच्या निवडणुकीतील प्रमुख प्रतिस्पर्धी अतिकठोर शब्दात वालेसावर हल्ला चढवितो, '......हा मूर्ख माणूसच खरा हुकूमशहा आहे. भल्या मोटच्या मिशा असणारा हा निव्वळ ठोकळा आहे!'

'माझ्याविषयी वाटणारी असूयाच या लोकांना असं बोलायला लावते. नाही तर सांगा, माझ्यामागं धावणारे हे एवढे कोट्यवधी लोक सारे महामूर्ख आहेत का?' मिशीतल्या मिशीत मिस्किलपणे हसत वालेसा आपल्यावरील टीकेला उत्तर देतो.

आपल्यावरील हुकुमशाहीचा आणि नरमाईच्या धोरणाचा आरोप खोडून काढताना तो विचारतो, 'कारखान्यांतले, खाणीतले कामगार म्हणजे राजकारणी मुत्सद्दी आहेत का? ती साधीसुधी, कष्ट करून पोट भरणारी माणसं आहेत. त्यांना अन्न, वस्त्र अन् निवाऱ्याची चिंता आहे. जिथं मी जाईन तिथं ती मला विचारतात की, तुमची सॉलिडॅरिटी अस्तित्वात येण्यापूर्वी आमची परिस्थिती फारशी चांगली नव्हती; पण त्या वेळी निदान आम्हाला रांगा लावून का होईना खायला मिळत होतं, रहायला मिळत होतं; पण आता आम्हाला बोलण्याचं, वागण्याचं स्वातंत्र्य मिळालं असलं तरी त्यानं पोट थोडंच भरतं? या लोकांना मी काय उत्तर देऊ? भरल्या पोटावर स्वातंत्र्याचे विचार सुचू शकतात, उपाशी पोटावर नाही. म्हणून मी म्हणतो, आधी लोकांच्या पोटाचे प्रश्न सोडवू या, मग त्यांच्या मनाचा विचार करू या. हे बुद्धिमान विचारवंत स्वतःला समजतात तरी काय? त्यांना साऱ्याचीच घाई झालीय. या असल्या धिसाडघाईमुळं मिळालेलं सारंच गमावून बसण्याची पाळी येईल!' वालेसाची ही भविष्यवाणी लवकरच खरी ठरणार आहे हे माहीत असतं तर त्याच्या विरोधकांनी त्याला असं मूर्खात काढलं नसतं. नंतरच्या काळात घटना इतक्या वेगानं अशा काही घडत गेल्या की, त्यांचा अर्थ लक्षात यायला बुद्धिमान आणि विचारवंतांनादेखील बराच काळ लागला. मार्शल लॉ लागू झाला ...... तेल गेलं, तूप गेलं आणि हाती धुपाटणं आलं!

( क्रमशः )

अस्लमशेरखानच्या ‘ टू हेल विथ हॉकी ’ या आत्मचरित्राचं मराठी रूपांतर ‘ माणूस’च्या ५ मार्च अंकापासून क्रमशः प्रसिद्ध होत आहे. ५ मार्चपासून सलग चार अंकांत चार भाग प्रसिद्ध झाले. मागील २ एप्रिल अंकात पाचवा भाग काही कारणामुळे देता आला नाही. तो या अंकात...

# ‘ टू हेल विथ हॉकी ’

## इंग्रजी शब्दांकन : मतीनखान
## मराठी रूपांतर : द्वारकानाथ संझगिरी



अस्लम – अंकल सादत आणि विश्वचषकाबरोबर !
दोन्ही मौल्यवान !

कौलालंपूरला आम्ही विश्वचषक हस्तगत केला आणि माझ्याकडे पहाण्याची सर्वांची दृष्टीच बदलली.

कौलालंपूरला जाताना मी तसा कुणीच नव्हतो... मी होतो फक्त एक राखीव खेळाडू ... संघात पाहुण्यासारखा वावर असलेला... ‘घरचा कधीच झालो नव्हतो. अन्यायाचे घाव झेलत पुन्हा पुन्हा मुसंडी मारण्याचा प्रयत्न करणारा एक खेळाडू होतो ... जाताना अगदी विमानातसुद्धा सर्वांचं लक्ष होतं फक्त अजितपालसिंग, गोविंदा आणि अर्थात अशोककुमारवर !

परतताना सर्व बदललं होतं. भूमिका बदलल्या होत्या. सर्व नजरा माझ्यावर खिळल्या होत्या. पूर्वी अडीअडचणीला कुणाकडे मदत मागितली की माझ्याकडे पाठ फिरवली जायची. मला टाळलं जायचं. आज त्या मंडळींना मला कुठे ठेऊ आणि कुठे नको असं झालं होतं. त्यांच्या चेहऱ्यांवरचे भाव बदलले होते. तिरस्काराची जागा स्मितानं घेतली होती. अगदी हवाईसुंदरीची वागणूकही बदलली होती. जाताना मी शिष्ट मुलगा होतो. येताना मी ‘ मदनाचा पुतळा’ झालो होतो.

‘त्याला त्रास देऊ नका, त्याला विश्रांती घेऊ द्या, स्वाक्षऱ्या वगैरे तो नंतर देईल.’ वगैरे ती बाजूच्या प्रवाशांना सांगत होती.

खरंच माझं जग पूर्णपणे बदलून गेलं होतं. मी कुणी तरी मोठा झालो होतो. माझ्या ह्या नव्या ‘ पोझिशन ’बद्दल मला एकाच वेळी हसूही येत होतं आणि धाय मोकलून रडावंसं वाटत होतं. एका फालतु पेनल्टी कॉर्नरच्या गोलनं माझ्या आयुष्यात केव्हढी मोठी क्रांती केली होती !

वयाच्या तेविसाव्या वर्षी असं यश मिळाल्यावर डोक्यात नशा ही चढणारच. बऱ्याच मंडळींचं असं म्हणणं आहे की, मी शिष्ट आहे, उद्धट आहे .. खरंच मी तसा नाहीये. शिष्टपणा किंवा उद्धटपणा हे श्रीमंतांचे गुणधर्म झाले... गरिबांजवळ फक्त स्वाभिमान असतो ... आणि बऱ्याच वेळा जगण्याच्या धडपडीत तो ठेचला जातो.

हे खरंय की मी मितभाषी आहे. कुणीही उगाच जड, दुर्बोध बडबड केली की मी वैतागतो .. एका छोट्या शहरात शिक्षण घेतलेल्या माझ्यासारख्याच्या असली बडबड डोक्यावरून जाते.

मला फारसे मित्र बनवणंही जमत नाही. माझ्या विशिष्ट पार्श्वभूमीमुळं माझ्यात काही न्यूनगंड (Infiriority Complex) निर्माण झाले आहेत. अगदी मोठ्ठाल्या जमावातसुद्धा मी ‘एकटाच’ असतो कदाचित मला माझ्या बरोबरीचे भाऊ नाहीत, वडील लवकर वारले किंवा ज्या परिस्थितीत माझ्या विधवा अम्मानं मला वाढवलं, त्याचा परिणाम असेल किंवा हो, लहानपणी माझ्या आयुष्यातली घडलेली एक घटना त्याला कारणीभूत असेल...

मी मागं तुम्हाला सांगितलंच आहे की, आमच्या भोपाळमध्ये कधीकधी, कधीही संपणार नाही असं वाटावं असा पाऊस पडतो... एकदा असाच पाऊस पडत होता आणि मला बाहेर हॉकी खेळायला मिळत नाही म्हणून माझं डोकं फिरलं होतं. मी माझ्या मोठ्या बहिणीला सांगितलं, ‘ चल, माझ्याबरोबर घरात हॉकी खेळू.’ ती म्हणाली. ‘ चल हट् ! मी आता मोठी झालीय. ह्या वयात हॉकी खेळणं बरं दिसत नाही.’ मी भयंकर संतापलो... आणि संतापाच्या भरात तिला जोरात लाथ हाणली. इतक्या जोरात मारली की तिन

किंकाळी फोडली. तिची किंकाळी ऐकून शेजारच्या खोलीतून वडील धावत आले आणि माझ्या कानाखाली त्यांनी आवाज काढला. ते मला भयंकर लागलं. 'आपल्याला जगात कुणी नाही. आपण एकटे आहोत.' अशी भावना त्या दिवसांपासून माझ्या मनात निर्माण झाली...

## यश डोक्यात गेलंय ?

अगदी लहानपणी सांधेदुखीनं बिछान्यावर मी पडलेलो असताना ही एकटेपणाची भावना मला खायला उठायची. त्या वेळी फक्त आमच्या दूधवालीच्या मुलीशी माझी दोस्ती होती. तिच्या आईबरोबर ती आमच्याकडे यायची आणि आई दूध देऊन निघून गेल्यावरही माझ्याशी गप्पा मारत बसायची. मला तिचा भयंकर लळा लागला होता.

एके दिवशी ती मला म्हणाली, 'तू इतका मोठा खेळाडू होशील की तुला लोक खांद्यावरून मिरवतील!' मी त्याचा भलताच अर्थ घेतला. तिच्या कंबरड्यात एक लाथ हाणावी असं मला वाटलं.

'अग, फक्त मेलेल्यांनाच खांद्यावरून मिरवलं जातं. मी लवकर मरावसं तुला वाटतं काय ?' मी तिला वैतागून विचारलं.

मी बरा झाल्यावर एकदा तिच्या घरावरून येत होतो. तिच्या घराबाहेर गर्दी दिसली. काय झालं म्हणून बघायला गेलो तर ती अंथरुणावर झोपली होती. अजिबात हालचाल करत नव्हती. काही मंडळी तिच्या अंथरुणाभोवती बसून मंत्र म्हणत होती, काही मंडळी रडत होती. काही वेळानं तिला तिरडीवर ठेवलं आणि काही मंडळींच्या खांद्यावरून ती तिरडी स्मशानाकडे निघाली. काय घडलंय हे समजण्याइतका मी मोठा होतो. मला तिचे ते शब्द आठवले आणि रडू कोसळलं ... माझ्या मित्रांना काही कळत नव्हतं की हा रडतोय का ? एका दूधवालीच्या मुलीच्या मृत्यूचं ह्याला का एवढं दुःखं व्हावं ?

विमानात कुणी तरी माझ्या खांद्यावर थाप मारली आणि माझी विचारधारा तुटली. एक छोटी मुलगी माझ्या बाजूला ऑटोग्राफबुक घेऊन उभी होती.

'माझ्या भावाला तुमची स्वाक्षरी हवीय. त्याला बरं नाही. त्यामुळं तो येऊ शकत नाही. तो बघा तिथं बसलाय.' ती म्हणाली आणि मागच्या कुठल्या तरी सीटकडे तिनं बोट दाखवलं. मी वळून त्या मुलाकडे पाहिलं. त्याचा पाय प्लास्टरमध्ये होता.

'त्याला काय व्हावंसं वाटतं क्रिकेटपटू ?'

'नाही. बेसबॉल प्लेयर!' ती म्हणाली. मी ते बुक हातात घेतलं आणि त्यावर लिहिलं–

'डी मॅगीओसारखा तू महान खेळाडू होशील!' त्या मुलीनं वाचलं आणि ती जोरात खिदळली ..

'शट् अप्' मी तिच्यावर खेकसलोच!

'तुला खिदळायला काय झालं ? तो नक्कीच महान खेळाडू होईल!'

माझा चढलेला आवाज ऐकून सर्व माना माझ्या दिशेला वळल्या. त्यातल्या प्रत्येकाला वाटलं असेल की, यश माझ्या भलतंच डोक्यात गेलंय.

मी तसाच उठलो आणि बाथरूमकडे पळालो. त्या दूधवालीच्या मुलीची आठवण येऊन मला रडू कोसळलं होतं.

पुन्हा जागेवर येऊन बसल्यावर, उतरल्यावर कसं 'शाही' स्वागत होईल ह्याचा विचार करत बसलो.. आम्ही विश्वचषक जिंकल्यावर भोपाळमध्ये हंगामा झाला होता. कॉमेंट्री संपल्याबरोबर माझं घर माणसांनी आणि मिठाईनं भरून गेलं होतं. माझी अम्मा एरवी पडदा पाळणारी; पण त्या दिवशी तिनं पडदा झुगारून दिला. त्या दिवशी ती भोपाळमधल्या सर्व तरुणांची अम्मा झाली! अम्माच्या डोळ्यांतून अखंडपणे अश्रू वाहात होते...मुलाला मोठा हॉकीपटू केल्याबद्दल आणि माझ्या वडिलांना दिलेलं वचन पूर्ण केल्याबद्दल अल्लाचे ती सतत आभार मानत होती.

ज्या दिवशी आम्ही जिंकलो, त्या दिवशी विमानातसुद्धा माईकवरून प्रवाशांना ही गोड बातमी सांगण्यात आली.

## शेरोंका शेर अस्लमशेर!

चित्रपटअभिनेता मनोजकुमार त्या वेळी आगगाडीनं प्रवास करत होता. त्याला विमानप्रवासाचं भय वाटतं. कुठल्याशा एका स्टेशनवर गाडी थांबल्यावर त्यानं गार्डला पाच मिनिटं गाडी उशिरा सोडण्याची विनंती केली. का ? तर त्याला अंतिम सामन्यात काय झालंय हे ऐकायचं होतं. निर्णय लागल्यावर मग गाडी सोडण्यात आली. मला हे नंतर खुद्द मनोजकुमारनंच सांगितलं.

आमचं विमान मद्रासला प्रथम उतरलं. तिथं भारतीय हॉकी फेडरेशनचे अध्यक्ष रामस्वामी आमच्या स्वागतासाठी उभे होते. अगदी कस्टमवाल्यांपासून रामस्वामींपर्यंत सर्व मंडळी खुषीत होती. खुषीत नव्हतो फक्त आम्ही! माझा तिथल्या कस्टमवाल्यांचा पूर्वीचा अनुभव वाईट होता आणि ह्या वेळी तर माझ्याकडं प्रचंड सामान होतं! कौलालंपूरला तिथल्या भारतीयांच्या उतू गेलेल्या प्रेमाचा तो परिणाम होता. त्यात पुन्हा वाटेत आम्ही सिंगापूरलाही मुक्काम ठोकला होता. ड्यूटी भरण्यासाठी आमच्या खिशात अजिबात पैसे उरले नव्हते. आम्ही रामस्वामींना तसं सांगितलं आणि रामस्वामींनी मध्यरात्रीही पैसे उभे केले!

रामस्वामींबद्दल आमच्या हॉकी खेळाडूत आदराची भावना होती. आम्हाला ते एखाद्या 'श्रीमंत काका'सारखे वाटत. त्यांनी आमच्यावर प्रेमही भरपूर केलं आणि हातही सैल सोडला! ते कौलालंपूरला आम्हाला चिअर् अप् करण्यासाठी आले होते. तिथं प्रत्येक मॅच जिंकल्यावर खुषीनं पैसे वाटत. विश्वचषक पटकावल्यावर शंभर डॉलर्सच्या नोटांची त्यांनी आमच्यावर खैरात केली होती. असं औदार्य भारतीय हॉकीनं पूर्वी कधीही पाहिलं नव्हतं आणि आजही कुठं दिसत नाही! ह्यापूर्वी प्रत्येक पैशासाठी आम्हाला झगडावं लागत होतं, काबाडकष्ट करायला लागत होते. विश्वचषक जिंकल्यावर आमचे खिसे कसे तट्ट फुगतील हे रामस्वामींनी पाहिलं. प्रदर्शनीय सामने, बक्षिसं, पुरस्कार ह्यांची आमच्यावर सरबत्ती सुरू झाली.

पालम विमानतळावरच दिल्ली ही काय चीज आहे ते कळलं. जवळजवळ प्रत्येक थरातला माणूस तिथं आमच्या स्वागतासाठी आला होता. तिथं चांदणीचौकातला रिक्षावाला होता, पहाडगंजचा मोटरमेकॅनिक होता आणि राजा भालिंदरसिंग, पंजाबचे क्रीडामंत्री उमरावसिंगही होते!

अम्माला आमचा कार्यक्रम कळला असावा. कारण तिनं सादत-

चाचांबरोबर गाडी पकडून सरळ दिल्ली गाठली. विमानतळावर एवढा बंदोबस्त होता की, अम्माला मला भेटणंही मुष्किल झालं. होतं. शेवटी सादतचाचानं सिक्युरिटी ऑफिसरला गाठून तिच्यासाठी पास मिळवला; पण तोपर्यंत काही हॉकीच्या चाहत्यांनी तिला ओळखलं होतं आणि तिला ते आतल्या कक्षेपर्यंत घेऊन आले होते...तिथं बडचा बडचा मंडळींशी तिची ओळख करून देण्यात आली. आम्ही उतरेपर्यंत आकाशवाणीच्या बातमीदारानं तिची मुलाखतही घेऊन टाकली होती. तिथं तिला "अशोककुमारची आईही भेटली दोघांच्याही दृष्टीनं तो ऐतिहासिक क्षण होता. ध्यानचंद आणि अहमद शेरखान ह्या त्यांच्या 'यजमानांनी' बर्लिन ऑलिंपिक्स गाजवलं होतं...आता त्यांची मुलं विश्वचषक घेऊन येत होती...

विमानातून आमचा संघ बाहेर पडायला लागल्यावर कानठळचा बसणारा आवाज झाला. जमलेली हजारो मंडळी धुंद होऊन टाळचा वाजवत होती. विमानातून बाहेर पडणारा मी शेवटचा खेळाडू होतो. मी विमानातून बाहेर पडून शिडी उतरायला लागलो आणि 'शेरोंका शेर अस्लम शेर !' अशा घोषणांनी आसमंत दणाणून गेला. त्या मलेशियात जेव्हा मी तो ऐतिहासिक गोल केला तेव्हा खच्चून भरलेल्या मर्डेका स्टेडियमवर स्मशानशांतता पसरली होती ... हा घोषणांचा आवाज त्या 'शांततेपेक्षाही' मोठा होता...

## इंदिराजींबरोबर....

मी माझ्या मायभूमीवर पाय ठेवायला उत्सुक होतो...पण ते होणे नव्हते...मी जमिनीवर पाय ठेवायच्या आतच वरच्यावर उचलला गेलो. गर्दीच्या प्रेमाचा हा माझा पहिला अनुभव होता. त्या गर्दीतून माझे डोळे अम्माला शोधत होते...ती दिसली... नेहमीप्रमाणे भोपाळी कुडता-पायजमा घातलेली...पण हे दर्शन क्षणभरच झालं. पुन्हा ती गर्दीत हरवली....कुणी तरी माझी डोक्यावरची हॅट पळवली ..मी त्याला परत द्यायला सांगितलं...पण तो तयार झाला नाही. 'एक वेळ मी प्राण देईन; पण हॅट देणार नाही!' त्यानं ठणकावून सांगितलं....

ह्या दिल्लीत मी माझ्या आयुष्याचा काही काळ घालवलाय; पण त्या वेळी मी एकटाच कुठेही भटकायचो ..अर्थहीन अशी ती भटकंती असायची. आज मी एकटा नव्हतो. जिथं जाईन तिथं स्वागताला लोक असायचे. जंगी स्वागत व्हायचं.

आम्ही इंदिरा गांधींच्याही घरी गेलो. तिथं टाइम्सच्या श्रीमाननं माझी इंदिरा गांधींशी ओळख करून दिली.

'इंदिराजी, ह्यांचं नाव अस्लम शेरखान. ह्याने भारतीय हॉकीला कबरीतून बाहेर काढलं !'

मोडक्या-तोडक्या हिंदीत श्रीमान् म्हणाले. इंदिराजींनी हस्तांदोलन केलं आणि हळूच म्हणाल्या, 'यस्, मी त्याची 'नोट' घेतलीय.'

कबरी तर सर्वत्रच होत्या. 'कब्रस्तानात'च मी हॉकी खेळायला सुरुवात केली होती आणि कब्रीतूनच हॉकीला बाहेर काढलं होतं....

पण त्या वेळी कुणाला कल्पना नव्हती की हृदयात एक 'पोकळी' घेऊनच मी वावरतोय.



असाही क्षण येईल असं वाटलंच नव्हतं !
१९७७ साली पंतप्रधानांबरोबर अस्लम.

¤

आम्ही ग्रँड ट्रंक एक्स्प्रेसनं भोपाळला आलो. स्टेशन नुस्तं लोकांनी फुलून गेलं होतं. जवळजवळ सर्वच हॉकीक्लबमधली मंडळी स्वागताला आली होती. संपूर्ण भोपाळभर माझी मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक शफी पठाण ह्या भोपाळमधल्या 'दादानं' आयोजित केली होती. मिरवणुकीच्या वेळी तो माझ्याच शेजारी बसला होता.

संध्याकाळी एक मोठा समारंभ आयोजित करण्यात आला होता...आणि त्यानंतर तर समारंभाची मालिकाच सुरू झाली. ..

रात्री जरा फिरून येतो असं अम्माला सांगून बाहेर पडलो... ज्या रस्त्यावर लहानपणी मी आणि माझ्या वडलांनी 'जॉगिंग' केलं होतं त्या रस्त्यावरून चालायला सुरुवात केली ... इब्राहमपुरावरून हा रस्ता सरळ एखाद्या भाविकासारखा जामामशिदीकडे जातो... त्याच्या विरुद्ध बाजूला रस्ता थेट लक्ष्मी टॉकीजच्या 'कोठचा'कडे जातो...ह्या नाचणारींच्या कोठचा आलांडल्या की आमचं सैफिया कॉलेज येतं...आणि मग पुढं कबरस्तान !

मला मृत्यूची नेहमीच भीती वाटते ... कारण 'त्या' पलीकडे काय असतं हे मला ठाऊक नाही...हिंदू मंडळी मृतांना जाळतात... जिवंतपणी थोडंसं भाजलं तरी सहन होत नाही, हे माहीत असूनही मृतांना जाळतात ! आम्ही मुस्लिम मृताला पुरतो... एक खोल खड्डा करून त्यात प्रेत सोडतो आणि खड्डा मातीनं पुन्हा भरून टाकतो. त्या ठिकाणी थोडासा मातीचा उंचवटा करून कबर तयार करतो... प्रेत पुरल्यावर जमलेली मंडळी तीनदा मूठभर माती त्या कबरीवर टाकतात, त्या मृताच्या आत्म्याला शांती मिळो अशी अल्लाजवळ प्रार्थना करतात आणि अळचा-किडचांच्या ताब्यात त्या मृताला सोडून देतात...

मी त्या कबरस्तानमध्ये शिरलो. मिट्ट अंधार होता. नाही म्हणायला थोडाफार चंद्रप्रकाश झाडाझुडपांतून मार्ग काढायला धडपडत होता. मी वडलांच्या कबरीपाशी येऊन थांबलो. माझ्या वडलांच्या

मृत्यूनंतर तिथं असंख्य मुडदे पुरले असणार हे माहीत असूनही थांबलो ! मी वडलांवर केव्हढं प्रेम करायचो हे त्यांना खरोखरच कधी कळलं नव्हतं. ते कडक शिस्तीचे भोक्ते होते. छडीचा वापर केला नाही तर मुलं बिघडतात ह्यावर त्यांची दृढ निष्ठा होती. ते करडया स्वभावाचे असले तरी मला माहीत होतं ते माझ्यावर प्रेम करतात. अर्थात त्यांच्या शिस्तबद्ध पद्धतीनं ! सणासुदीला ते जेव्हा मला कुशीत घ्यायचे, त्या वेळी मला त्यांना सांगावंसं वाटायचं, 'बाबा, मला तुम्ही आवडता. मी तुमच्यावर प्रेम करतो.' पण त्याची प्रतिक्रिया काय होईल ह्या भीतीन मी कधी तसं बोललोच नाही. माझ्या वडलांना जे आवडत नव्हतं, ते कधी करण्याच्या भानगडीत मी पडलोच नाही.

मी त्यांच्या कबरीपाशी बसलो. 'मला अभिमान वाटतो मी तुमचा मुलगा आहे. बाबा, माझं तुमच्यावर प्रेम आहे...तुमच्यावर प्रेम आहे.'

एवढंच मी बोलू शकत होतो...पुन्हा पुन्हा बोलत होतो. जवळची माती उचलली आणि ती कबरीवर टाकली......

त्या रात्री, त्या कबरीवरील माती माझ्या अश्रूंनी पार ओलीचिंब झाली !

## गोल्ड मेडल प्रोजेक्ट

कौलालंपूरला विश्वचषक जिंकल्यानर भारतीय हॉकीनं पुन्हा शिखर गाठलं होतं; पण पुन्हा एका वर्षात मॉंट्रियलला आम्ही तळ गाठला...मॉंट्रियल ऑलिंपिक्समध्ये भारतीय हॉकी पूर्णपणे गलितगात्र झाली !......

ते वर्ष माझ्या दृष्टीनं मला फार चांगलं होतं...माझ्या गुणवत्तेचा त्या वर्षी भाव भलताच वधारला. मी फक्त 'फुल बॅक' म्हणून नव्हे, तर त्या ऑलिंपिकमध्ये 'विंग–हाफ' आणि चक्क फॉरवर्ड म्हणूनही खेळलो.

आणि त्या वर्षी माझं 'ब्रह्मचर्य'ही मी एका ऑस्ट्रेलियन मुलीला अर्पण केलं.

मॉंट्रियल ऑलिंपिक्सपूर्वी काही दिवस आमचा पॅरिसला ट्रेनिंग-कॅंप होता. हेतू एवढाच मॉंट्रियलच्या वातावरणाचा सराव व्हावा; पण तिथं गोविंदाचं मानेजवळचं हाड मोडलं.

पुढच्या सफरीवर निघण्यापूर्वी आमचा कोच गुरुबक्षसिंग आम्हाला म्हणाला, 'चला, प्रत्येकानं दोन–दोन हॉकी स्टिक्स माझ्याजवळ द्या. आपण एकत्रितपणे विकू या, दाम चांगला येईल !'

गुरुबक्षसिंगला असले उद्योग चांगले जमायचे...समोरच्याला पटवण्याची त्याची कुवत जबरदस्त होती. एखाद्या टक्कल पडलेल्या माणसालाही कंगवे विकायची कुवत त्याच्याकडे होती. काही वर्षांपूर्वी त्याने भारतीय हॉकी फेडरेशनला पटवलं होतं की, राष्ट्रीय संघाबरोबर एकाऐवजी दोन कर्णधार पाठवले तर संघाचं भलं होईल. अनेकांनी ह्या कल्पनेच्या चिंधड्या उडवल्या; पण गुरुबक्षनं अशा काही खटपटी–लटपटी केल्या की, तो पृथ्वीपालसिंगबरोबर 'संयुक्त कर्णधार' म्हणून परदेशी गेला ! पृथ्वीपालही तयार झाला. कारण, स्वार्थापेक्षा हॉकीमध्ये त्याला जास्त रस होता.

परदेशी हॉकी-स्टिक्स विकणं हा काही नवीन उद्योग नाही. बरेच खेळाडू हा उद्योग पूर्वीपासून करत आले आहेत. कारण त्यामुळं परदेशी शॉपिंगसाठी बराच पैसा उपलब्ध होतो; पण एकत्र जमवून हॉकी-स्टिक्स विकायला मात्र माझा विरोध होता. ऑलिंपिक्स व्हिलेजमध्ये उलट चांगला भाव मला मिळेल ह्याची मला खात्री होती. गुरुबक्षच्या कल्पनेला मात्र मी विरोध केला नाही...उगाच त्यानं खुन्नस ठेवला तर संघातून माझी उचलबांगडी होण्याची भीती वाटत होती. परत आमच्या संघाचा मॅनेजर होता आर. एस. भोळा ! म्हणजे आमच्या गुरुबक्षच्या हातातलं बाहुलंच ! त्यामुळं मी आपल्या दोन हॉकी-स्टिक्स गुरुबक्षच्या हातात निमूटपणे सोपवल्या.

टोरोंटोला आम्ही पोहोचलो आणि संघाच्या हॉकीवरच्या निष्ठेचं पितळ उघडं पडलं......

आदल्या वर्षी मलेशियाला विश्वचषक जिंकल्यामुळ टोरोंटोमधल्या भारतीय नागरिकांनी आम्हाला सर्व सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा विडा उचलला होता. एक महत्त्वाकांक्षी 'गोल्ड मेडल' प्रोजेक्ट त्यांनी सुरू केलं होतं. हजारो डॉलर्स त्यांनी जमवले होते. आमच्या सरावासाठी एक मैदान उपलब्ध करून देण्यात आलं होतं. टोरोंटोमध्ये स्पर्धेतले इतर संघ आल्यावर एक छोटीशी प्री–ऑलिंपिक्स स्पर्धाही त्यांनी आयोजित केली होती. त्यात पुढं काही भानगडी उत्पन्न झाल्या...आपली शक्तिस्थानं आणि कमकुवत दुवे एकमेकांना कळतील म्हणून भारत आणि पाकिस्ताननं एकमेकांविरुद्ध खेळायला नकार दिला ..यजमान हॉकी असोसिएशन एवढं भडकलं की, त्यांनी कोर्टाकडे धाव घेतली . शेवटी भारत आणि पाकिस्तान ह्या दोन्ही संघांनी एका कॉमन संघाशी सामना खेळणं कबूल केलं आणि तंटा मिटला.

## आनंदी आनंद !

ह्या सर्व भानगडी चालू असताना मी अंथरुणाला खिळलेलो होतो. सुरुवातीला माझ्या रोगाचं निदानच झालं नाही. फ्लू आहे समजून औषधउपाय झाले. मी काही बरा होईना. म्हटलं, बहुतेक आता माघारी पाठवणार ! मात्र आमच्या मॅनेजरनं ठाम भूमिका घेतली. तेव्हढ्यात रोगाचं निदानही झालं. मला मलेरिया झाला होता आणि मला माघारी पाठवणार नाहीत हे कळल्याबरोबर माझी तब्येतही झपाट्यानं सुधारली.

मी बरा व्हायला आणि खेळाडूंनी मॅनेजरविरुद्ध बंड उभारायला एकच गाठ पडली. बंडाचं कारण ? छे ! छे ! एखाद्या खेळाडूवर अन्याय किंवा तत्त्वासाठी वगैरे नाही. हा झगडा 'लक्ष्मी' साठी होता. मी कबूल करतो की, परदेशी गेल्यावर फॉरेनकरन्सी आम्हाला जेव्हढी मिळेल तेव्हढी हवीच असते. मग मगाशी सांगितलंच की, टोरॅंटोला तिथे स्थायिक झालेल्या भारतीयांनी आमच्यासाठी गोल्ड-मेडल प्रोजेक्ट उभं केलं होतं. त्यांनी जमवलेले पैसे त्यांना खेळाडूंत समसमान वाटायचे होते; पण आमच्या मॅनेजरनं भलतीच शक्कल काढली. तो म्हणाला की, ह्या पैशातून आपण एक व्हिडिओ टेपरेकॉर्डर आणि काही तत्सम वस्तू विकत घेऊ. त्याची उद्या

भारतीय हॉकीला मदत होईल.

कुणीही हा उपदेश ऐकायच्या मूडमध्ये नव्हते. मॅनेजरचा निषेध करणारं एक पत्र तयार करण्यात आलं आणि त्यावर सर्व खेळाडूंनी सह्या केल्या. पुढची गंमत म्हणजे हे पत्र खालिद अन्सारीनं स्पोर्टस् वीकमधे छापलं. लगेचच भडका उडाला. काही वर्तमानपत्रांत त्याबद्दल संपादकीयंही लिहिली गेली. उद्या जर कुणाला 'भारतीय हॉकीला अवकळा का आली?' वगैरे विषयावर रिसर्च करायचा असेल, तर त्याला ह्या पत्राचा उल्लेख टाळता येणार नाही.

त्यामुळं आम्ही 'ऑलिंपिक्स'ला पोहचलो तेव्हा संघाचं वातावरण भलतंच टेन्स होतं. त्यात आमची सुरुवातीला गाठ पडणार होती अर्जेंटिनाशी! १९७५ साली मलेशियात अर्जेंटिनाविरुद्ध हरलो होतो· तो पराभव आम्हाला आजही भेडसावत होता; पण अजितसिंगनं पहिल्या मिनिटाला गोल केला आणि वातावरण साफ बदललं. पुढं आणखीन तीन गोल आम्ही चढवले आणि पराभवाचं उट्टं आम्ही काढलं.

त्या दिवशी व्हिलेजमध्ये परत जाताना आमचा मूड भलताच चांगला होता. 'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे' वगैरे प्रकार! आमच्या बसचं मोट्ठं 'डचूक बॉक्स' झालं होतं. प्रत्येकजण घसा साफ करून घेत होता. त्या आनंदात दुसऱ्या दिवशी आम्हाला हॉलंडशी खेळायचंय हेच आम्ही विसरून गेलो. त्याची आठवण झाली दुसऱ्या दिवशी त्यांनी आम्हाला हरवल्यावर!

अर्जेंटिनाविरुद्ध खेळताना इनसाईड-लेफ्ट चांदसिंगचा पाय दुखावला होता. डॉक्टरनं त्याला सल्ला दिला की, तुला झेपत असेल तरच खेळ! पण सुरजीत म्हणाला, 'काही नाही. जमेल त्याला! लगेच अशोक म्हणाला, 'त्याला जर नाही जमलं तर राइट फ्लॅन्कवर फुलबॅक बलदेवसिंगला आणू या. फिलिप्स इनसाईड राइटला खेळेल आणि अस्लम इनसाईड लेफ्टला खेळेल!'

हे सर्वच मला विचित्र वाटलं. त्या जागेसाठी जर सय्यदअलीला निवडलं होतं तर त्याला का खेळवलं नाही? त्याला तंबूत बसवून इतरांच्या जागा बदलण्यात काय अर्थ होता? पण मी काही बोललो नाही. कारण माझं मत कुणीच विचारलं नव्हतं.

## राणी कुठं दिसत नाही?

सुरजितचे काय किंवा माझे काय पेनल्टी-कॉर्नर्स, त्या डच गोलकीपरला चकवून जाऊ शकले नाहीत. मी तर काही वेळा चेंडू भलतीकडेच मारला. पॉल लिट्जननं मात्र ४७ व्या आणि ४८ व्या मिनिटाला पेनल्टी-कॉर्नरचे दोन सणसणीत गोल हाणले. खरं सांगतो त्याच्यापुढं पेनल्टी-कॉर्नरवरून 'गोल' चढवण्यात आम्ही नवखे वाटत होतो.

आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियानं तर आमची साफ वाट लावून टाकली. गोलांची त्यांनी बरसात केली. येता जाता गोल मारत होते. अर्धा डझन गोल्सखाली भारतीय हॉकी त्या दिवशी त्या ॲस्ट्रोटर्फवर गाडली गेली.

ऑस्ट्रेलियानं दुसरा गोल मारला आणि माझी तंबूत रवानगी झाली. का? कारण काहीच नाही! एकाला तंबूत पाठवायचं होतं तर गोलकीपर अशोक दिवाणला पाठवायचं होतं. त्याला बिलकुल



**मोठ्यांच्या गोटात अस्लम—
अश्विनीकुमार आणि राजा भालिंदरसिंगबरोबर**

¤

'पहारा' देणं जमत नव्हतं. पतियाळा कॅंपमध्ये क्रिकेट खेळताना त्याच्या थोबाडावर चेंडू बसला होता. त्याचे दातही पडले होते. त्या धक्क्यातून तो पुरता बाहेर आला नव्हता. त्याच्याऐवजी 'चेत्री'ला खेळवलं असतं तर .. पण नाही, त्याला हात चोळत तंबूतच बसवलं.

सुप्रसिद्ध हॉकीपंच ग्यानसिंगनं नंतर त्याच्या पुस्तकात लिहिलं होतं, 'Baldevsing, Who replaced Aslam Sher Khan, and Surjit were made to look very small by the Australians.'

सुवर्णपदकांच्या शर्यतीतून आम्ही जवळजवळ बाहेर पडलो होतो. तेव्हढ्यात अर्जेंटिनानं आम्हाला हात दिला. त्यांनी ऑस्ट्रेलियाला ३–२ नी हरवलं आणि आमच्या आशा थोडयाशा पल्लवित केल्या.

पुन्हा एकदा आनंदोत्सव सुरू झाला; पण मागच्या चुकांचा काही अभ्यास झाला नाही. पुन्हा आमचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना झाला. मला खेळवण्यात आलं नाही. ह्या वेळी राणी एलिझाबेथ त्याला कारणीभूत असावी! तिनं एक एच् एम्. एस्. ब्रिटानियावर छोटासा समारंभ आयोजित केला होता. त्या समारंभाला फक्त निवडक खेळाडूंनाच बोलावण्यात आलं होतं. आमच्यातल्या फक्त अजितपालसिंग आणि मलाच निमंत्रण होतं. साहजिकच इतरांच्या पोटात दुखायला लागलं. वगळलं जाण्याचं दुःख काय असतं, (जे मी बऱ्याच वेळा सोसलंय.) हे राणीनं माझ्या साथिदारांना शिकवलं.

तो शुक्रवारचा दिवस होता. तारीख २३ जुलै. आजही मला आठवतेय. ब्रिटिश राष्ट्रगीत वाजत होतं आणि ब्रिटानियावर मी पाऊल ठेवलं. एका गुलाबी पेहरावातल्या सुंदर तरुणीनं माझ्याशी हस्तांदोलन केलं. तिचे हात उघडे नव्हते. तिने हातमोजे घातले होते. मी आत गेलो आणि राणीला शोधायला लागलो; पण राणी कुठंही दिसेना. राणीला पहायला मी भलताच उत्सुक होतो. शेवटी एका अमेरिकन ॲथलिटला मी विचारलं,

'राणी कुठे दिसत नाही.'

त्यानं माझ्याकडे एक विचित्र कटाक्ष टाकला आणि म्हणाला,

' मगाशी हस्तांदोलन कुणाशी केलंस ?' तुला काय वाटलं ती तुझी 'मॉम' होती !'

त्या गर्दीत फिरत असताना एका उंच, देखण्या पण डोक्यावरची कौल उडालेल्या माणसाभोवती गर्दी दिसली. मी तिथे गेलो. तो माझ्याकडे पाहून हसला आणि म्हणाला,

'तुमचा मित्र फेटा घालत नाही ?'

'नाही ! का ?'

'अच्छा, म्हणजे फक्त लंडनमधेच मोटारसायकल्स चालवतानाच घालावं लागतं म्हणायचं !'

तो असं का म्हणाला मला कळलं नाही. नंतर कळलं तो ड्यूक ऑफ एडिंबरो होता.

## फुलबॅक ते फॉरवर्ड

दुसऱ्या दिवशी मैदानात मला काही उतरायला मिळालं नाही. राणीला भेटून आलो होतो ना ! मला माझी नेहमीची जागा दाखविण्यात आली... तंबू !

आम्ही हरलो ! चांगला खेळ करून हरलो. पुन्हा एकदा पेनल्टी-कॉर्नर्सनी दगा दिला !

भारतीय हॉकीची उरली-सुरली इज्जत लुटली गेली होती.

आम्ही का हरलो ? अनेक कारणं होती.

पतियाळा आणि नंतर पॅरिसमधल्या प्रशिक्षणानं आम्हाला ऑलिंपिक्सपूर्वीच दमवून टाकलं होतं. आमचा शारीरिक शिक्षक (Physical anstrictor) जगमोहन हा खरं तर ॲथलेटिक्सचा शिक्षक; पण त्याला आमच्यावर लादण्यात आलं होतं. ती व्हिडीओ टेपरेकॉर्डरची भानगडही पराभवाला जबाबदार आहेच. आमचा कोचही रंगेल माणूस होता. तो खेळाडूंना ब्लू फिल्म पहायला घेऊन जायचा.

हरल्यावर कुणी तरी सुचवलं की, पुढं खेळणं नको, ऑलिंपिक्समधून बाहेर पडू या ! नशीब, तसं झालं नाही. आम्ही आमची 'पात्रता' ही गमावून बसलो असतो.

एका संध्याकाळी मी नेहमीप्रमाणे निराश होऊन नशिबाला दोष देत विलेजमध्ये फिरत होतो. इतक्यात एक मुलगी आली आणि म्हणाली,

'मी तुझ्याबरोबर फिरू शकते का ?'

मी खांदे उडवले आणि पुढं चालायला लागलो. तीही बरोबर चालायला लागली.

'काय सुंदर सन्सेट आहे नाही ? तुला सनसेटस् आवडतात ?' तिनं विचारलं.

'माझा दिवसच सूर्यास्तानंतर सुरू होतो !' मी

'मग तू मुस्लिम असला पाहिजेस. त्यांचा दिवस सूर्यास्तानंतर सुरू होतो किंवा निराश झालेला माणूस तरी...'

'मी मुस्लिम आहे !' मी कबूल केलं.

'मुस्लिम कॅलेंडर चंद्रकलेप्रमाणे तयार केलेलं असतं. तुला चंद्र आवडत असेल ना ?'

'नाही, तो लांब आहे आणि खोटा आहे.'

ती हसली आणि म्हणाली, 'म्हणजे तुला एकंदरीत खऱ्या गोष्टी आवडतात. उदाहरणार्थ मी.'

'मला काहीच आवडत नाही. हा चंद्र, ही पृथ्वी आणि तू सुद्धा ! मी तिला कटवायचा प्रयत्न केला.

'का नाही ?' ती मुलगी आता माझ्या मस्तकात जात होती.

'कारण हे जग सर्व खोटं आहे. बकवास आहे. माझ्याकडे बघ ! आयुष्यभर मी हॉकी खेळतोय. गेल्या वर्षी माझ्या देशाला केवढा मोठ विजय मी मिळवून दिला आणि आज मला संघात स्थान नाही !'

तिनं माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाली, 'तुला काही तरी ह्य जगातलं आवडावं ह्याचा प्रयत्न केलायस ? हे आयुष्य ? मी ? दुसऱ्याच कुणाचं काही ऐकलंयस, का फक्त स्वत:चेच विचार ऐकलेस? ऐक, माझ्याकडे बघ, मला स्पर्श कर, माझा आस्वाद घे. का सपूर्ण आयुष्यभर स्वत:चीच कीव करत बसणार आहेस ?'

मला राग आवरता आला नाही. मी तिच्या अंगावर ओरडलो 'Fuck off just fuck the hell out of here.'

ती क्षणभर स्तब्ध झाली आणि नंतर माझ्यावर खेकसली, 'यू आर अ सिसी, स्वत:ची कीव करण्यातच तुला आनंद वाटतो. तू कोण आहेस, काय आहेस, हे ॲक्सेप्ट करण्याचे गट्स् तुझ्यात नाहीत.'

मला तिला धडा शिकवायचा होता. माझे 'गट्स्' दाखवायचे होते. मी तिला घट्ट मिठी मारली आणि ओरडलो, 'आय विल मेक् यू स्क्रीम' माझा श्वासोच्छ्वास जोरात होत होता. रक्त तापून उसळत होतं... कानशिलं तापली रागाने नव्हे, स्त्रीस्पर्शाचा तो पहिला अनुभव होता. सेक्स आणि स्पोर्टस कधीही हातात हात घालून जात नाही हे माझ्या वडलांचं तत्त्व मी साफ विसरून गेलो होतो.

पण क्षणभरच ! नंतर मला माझीच शरम वाटली.

'आय ॲम सॉरी !' मी म्हटलं, 'पण तू आता इथून जा, मला शांतता हवीय !'

'नाही, मी जाणार नाही. तू भलताच टेन्स झालायस, थकलायस, तुझी कुणी तरी काळजी घ्यायला हवी.' ती म्हणाली.

त्या रात्री मी तिला माझी 'काळजी' घेऊ दिली.

दुसऱ्या दिवशी मला जर्मनीविरुद्ध 'विंग-हाफ' म्हणून खेळवण्यात आलं. काही वर्षांपूर्वी स्टेट्समनच्या मोहलजीनं लिहिलं होतं की, माझा कल आक्रमणाकडे असल्यामुळं 'विंगहाफ' म्हणून मी यशस्वी होऊ शकेन... मोहलजीचे विचार उमगायला निवडसमितीला बरीच वर्षं लागली.

मलेशियाविरुद्ध मला चक्क फॉरवर्ड म्हणून खेळवण्यात आलं आणि मी दोन फील्ड गोल्स केले.

गेल्या वर्षी विश्वचषकस्पर्धेत मी फुलबॅक म्हणून खेळलो होतो. पण गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डनेही हा रेकॉर्ड ठेवला नाही की एका वर्षात मी फुलबॅकवरून विंग-हाफ आणि विंग-हाफवरून फॉरवर्ड झालो होतो.

आता पुढे मला 'गोलकीपर' म्हणून खेळवलं नाही म्हणजे मिळवलं !

(क्रमशः)

# आमचा मार्ग प्रबोधनाचा राहील...डीएस्‌फोर : पृष्ठ ९ वरून

'छे ! छे !! निवडणुका, निदर्शने, घेराव यांपैकी कोणताही मार्ग आम्ही हाताळणार नाही. जनजागृती, प्रबोधन हाच आमचा मार्ग असेल !'

'आपल्या संघटनेने वर्षभरात काही कार्यक्रम हाताळले असतीलच ना ?'

'आम्ही दिल्लीतल्या निवडणुका लढविल्या !'

'ते कसे काय ? आपण तर म्हणता निवडणुका लढविणार नाही, घोषणा करणार नाही. मग या निवडणुका आपण कशा काय लढविल्या ? शिवाय मला पिंपरीत तसेच पुण्यातदेखील पुणे कराराच्या निषेधाच्या घोषणा भिंतीवर लिहिलेल्या पाहायला मिळाल्या. तेव्हा हे कसे काय ? बरे, आपल्या DS4 चे दिल्लीत काय झाले ?'

'दिल्लीत आमचा पराभव झाला. अर्थात निवडणुका वगैरे आमचे कार्यक्रम अपवादात्मक राहतील.'

'आर्थिक सवलतींच्या बाबतीत DS4 चे धोरण काय राहील ?'

'धर्मांतराचा प्रश्न आता कालबाह्य झाला आहे. हिंदूचा बौद्ध झाल्याने प्रश्न सुटलेले नाहीत, हा आजवरचा अनुभव आहे. देशात ८५ टक्के दलित ते बहुसंख्य आहेत आणि पिळवणूक करणारे फक्त पंधरा टक्के आहेत. ते अल्पसंख्यांक आहेत.'

'आता दलित पंच्याऐंशी टक्के असल्याचे आपण सांगितलेत. ते पंच्याऐंशी टक्के म्हणजे पूर्वाश्रमीचे अस्पृश्य का ? त्यांची संख्या एवढी कशी असेल ?'

'हे पहा काळे, आम्ही जात, धर्म मानीत नाही. दलित याचा अर्थ आर्थिकदृष्ट्या कमकुवत असा होतो. तोच आम्हाला मान्य आहे.'

'पण तुमच्या ॲनॅलिसिसमध्ये पिळवणूक करणारा वर्ग ब्राह्मण-वर्ग म्हटला आहे. सगळे ब्राह्मण त्यात येणारच ना ?'

'तसे नव्हे, कृतीने जो जातीयवादी आहे तो.'

या ठिकाणी प्रत्येक ब्राह्मण पंच्याऐंशी टक्क्यात घालायचा का पंधरा टक्क्यात घुसडायचा हे कसे ठरविणार ? माझ्या डोक्यात सहजच विचार आला. या डॉक्टरांनी एखादी अशी एक्सरेसारखी मशीन तर शोधून काढली नाही ना ? ब्राह्मण समोर धरायचा, मशीनमध्ये कोंबायचा. तो जातीय असेल तो बाजूला फेकायचा !

...ठीक आहे डॉक्टर, पुढे बोला—

'तर हे सर्व ब्राह्मण, भांडवलदार, जमीनदार, सांस्कृतिक, आर्थिक सत्तेद्वारे व नोकरशाहीच्या बळावर पिळवणूक करतात व आलटून पालटून सातत्याने त्यांचे हे काम चाललेले आहे.'

'ते कसे काय ?

'ब्राह्मणवर्ग— बुद्धिजीवी वर्ग आहे. हा वर्ग कष्ट न करता नेहमी जीवन सुखी ठेवण्यासाठी जमीनदार-भांडवलदारांची मदत घेत आला आहे. (१) राजकीय सत्ता (२) शासकीय सत्ता (३) भांडवलदारी वर्चस्व (४) जमीनदारी (५) सांस्कृतिक वर्चस्व. या पाच साधनाद्वारे त्यांनी पिळवणुकीची साखळी निर्माण केली आहे.'

डॉक्टर रंगारी यांच्या या बोलण्यानंतर मला आठवण झाली ती माझ्या गावाकडील 'सुगंधा' या दलित स्त्रीची. भोळी—भाबडी ही साठ—सत्तर वर्षांची वृद्धा दररोज आमच्या घरी यायची. सुगंधाला आमच्या घराविषयी अपार प्रेम ! आम्हा भावंडांनाही सुगंधाने चांगलाच लळा लावलेला होता. एक दिवस सकाळीच सुगंधा घरी आली तो आमच्या घरात माझ्या मोठ्या भावाच्या लग्नाची बोलणी चाललेली. सुगंधाला हे माहीत झाल्यानंतर ती आल्या पावली परत गेली.तिने गावातील भैरवनाथाच्या देवळात जाऊन नवस केला.'देवा, माझा मधू गरीब आहे. त्याचं लग्न जमू दे. मी तुझी खणा-नारळाने ओटी भरेन !' ही हकीकत माझ्या आई—वडिलांना जेव्हा समजली तेव्हा तिचे प्रेम बघून त्यांच्या डोळ्यात पाणी आले. अशी ही सुगंधा आमच्या कुटुंबाचा एक घटकच बनली होती. सुगंधाचे निधन ऐन दिवाळीतच झाले. त्या वेळी आमच्या घरातले कोणीही तीन दिवस अन्नाला शिवले नाही. असे हे आमचे पिढयानपिढयांचे निर्व्याज प्रेम आणि डॉक्टर रंगारींच्या ॲनालिसिसमध्ये हे सर्व पिळवणुकीचे तंत्र होते ! काय म्हणावे याला ?

'बरे, आपले सवलतींविषयी मत काय ?'

'सवलती किंवा मदत या टॉनिकसारख्या असतात. कमजोर घटकाला तंदुरुस्तीसाठी, तो नॉर्मल परिस्थितीत इतरांच्या पातळीत यावा म्हणून टॉनिक द्यावे लागते; पण नेहमीकरता टॉनिकवर जगता येणार नाही. सवलती बंद केल्याशिवाय प्रगती नाही. सवलतींमुळे दलित समाज लुळापांगळा होत जाईल. १ कोटी दलितांपैकी फक्त वीस लाख लोकांना सवलती मिळतात. बाकीच्या ८० लाख लोकांना सवलतींचा फायदा मिळू शकला नाही. हा फायदा फक्त दीड टक्का आहे. त्याचे कारण तिन्ही वर्गांची अपवित्र युती हेच होय. मुळात बहुसंख्य दलित असताना अल्पसंख्यांक श्रीमंतांकडे हात पसरण्याचे कारणच काय ? मागण्या या कमजोरवर्गाने मागायच्या असतात.'

'आपल्या DS4 च्या कामाचे स्वरूप कसे राहील ?'

'जाणीव, जागृतीवृत्ती निर्माण करणे हेच आमचे मुख्य काम. आम्ही सर्वच ब्राह्मण जातीयवादी समजत नाही. ज्यांची वृत्ती जातीयवादी ते जातीयवादी. महात्मा ज्योतीबा फुले हे समतावादी, डॉ.आंबेडकर क्रांतिकारक विचारांचे तर गांधीजींचे विचार सुधारणावादी. परंपरेची चौकट कायम ठेवून सुधारणा सुचविणारे होते. आमचा आघात मुळावर राहील. जेथून गटारगंगा वाहते ते तोंड बंद करणे हे आमचे काम राहील आणि कोणत्याही क्रांतिकारी चळवळीचे ध्येय तेच असते.'

'बरे ! मराठवाडा नामांतराविषयी आपले मत काय ?'

'नामांतराचा प्रश्न भावनिक आहे. बाबासाहेबांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला मिळाल्याने दलितांच्या स्थितीत काहीच फरक पडत नाही, तसे नाव न दिल्यानेही काही फारसे नुकसान होणार नाही.



नेहमी आघाडीवर असलेल्या...माताजी

¤

हा प्रश्न निर्माण केला तो समाजवाद्यांनी.'

समाजवादी मंडळींवर आपल्या दलित मंडळीचा भलताच राग दिसतो आहे, हं.'

'काळे, ते मुळीच चूक नाही. प्रश्न निर्माण केला तो समाजवाद्यांनी आणि या प्रश्नांचे घोंगडं भिजत टाकलं तेही समाजवाद्यांनी. माझा या समाजवाद्यांना असा सवाल आहे की, नामांतर होत नाही हे लक्षात आल्यानंतर ते मंत्रिमंडळाच्या बाहेर का पडले नाहीत? समाजवादी राजिनामा देऊन मंत्रिमंडळाबाहेर पडले असते तर निदान त्यांचे दलितांविषयीचे प्रेम तरी दिसून आले असते. विशेष म्हणजे, नामांतराला विरोध करणारेही समाजवादीच होते. समाजवादी हेदेखील सुधारणावादी आहेत. क्रांतिकारी चळवळीची धार बोथट करणे हे सुधारणावादी लोकांचे काम असते आणि ही समाजवादी मंडळी ते इमानेइतबारे करीत आली आहे.'

'पण DS4 आपले कार्य करणार तरी कसे? कारण सत्याग्रही-मार्गाचे तर आपल्याला वावडे. तेव्हा आपण काम कसे करणार?'

'आम्ही हे सर्व मतपरिवर्तनाने करणार. आमचा मार्ग प्रबोधनाचा राहील. आमच्यापुढे मुख्य प्रश्न आहे तो सर्वांना एकत्रित आणण्याचा. कारण दलित चळवळीत विघटन होत चाललेले आहे. सध्या तरी एकत्र येण्याच्या मन:स्थितीत कोणीही नाही. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या तो बंड करून उठेल.' असे बाबासाहेब म्हणत असत. आमचा मार्ग प्रबोधनाचा असेल!'

पुढे एक-दोन प्रश्न विचारायचे होते; पण रक्तबंबाळ झालेली एक महिला दवाखान्यात आली. डॉक्टर उठून गेले. टाके घालावे लागतील असे सांगून त्यांनी टाके घालण्याची तयारी सुरू केली. बाईला नवऱ्याने मारले होते. बाईबरोबरची व्यक्ती तिच्या नवऱ्याला शिवीगाळ करीत होती. विशेष म्हणजे जखमी बाई नवऱ्याला दोष द्यायला तयार नव्हती. चुकून झाले असेच ती म्हणत होती. डॉ. रंगारींच्या, 'मग तुझा नवरा बरोबर का आला नाही? या प्रश्नाला उत्तर न देता ती गप्प बसली.

चहा आला. पान खाणे वगैरे सर्व कार्यक्रम आटोपले. डॉक्टरांकडील पेशंट वाढले; पण कामात व्यत्यय नको म्हणून मीच बाहेर पडलो बाहेर पडत असताना मला दलित मुक्तिसेनेच्या पंढरी आवाडचे शब्द आठवले. त्याला मी विचारले होते, 'अरे, हे DS4 हे काय प्रकरण आहे?' 'काही नाही काळेसाहेब, हे DS4 वाले आमच्या दलितातले 'भट' आहेत. पोथ्या वाचणे आणि प्रवचन करणे हेच यांचे काम आणि जन्मभर ते तेच करीत बसणार!' पंढरीच्या उत्तरावर आम्ही सगळेच जण खळाळून हसलो होतो.

ते काहीही असो, DS4 चे विचार मार्क्सवादावर आधारित आहेत हे स्पष्टच आहे. डीएसफोरला सर्व दलित संघटनांचा कडाडून विरोध आहे. हे बाबासाहेबांचे अनुयायी नसून मार्क्सचे अनुयायी आहेत अशी टीका इतर संघटनांकडून होते. ज्या पुणे कराराने दलितांना हक्क मिळवून दिले, ज्या करारामुळे एक माणूस म्हणून जगण्याची संधी बाबासाहेबांनी दलितांना मिळवून दिली, त्या कराराला डीएसफोरने कडाडून विरोध केला आहे. हे डीएसफोरचे अंतरंग स्पष्ट होण्याच्या दृष्टीने पुरेसे आहे. त्यांच्या कामात अतिशय गुप्तता पाळली जाते असे अनेकांनी स्पष्ट केले.

## मुक्तिसेना...माताजी

सध्या नामांतराच्या चळवळीतून 'दलितस्तान'ची मागणी पुढे आली आहे. दलित मुक्तिसेनेच्या वतीने ही मागणी केली जात आहे. दलित मुक्तिसेनेचे प्रवर्तक आहेत प्रा. जोगेंद्र कवाडे. ऑक्टोबर १९८१ ला ही सेना अस्तित्वात आली. उद्घाटक होते बिहारचे राम विलास पास्वान. सध्या तरी दलित मुक्तिसेना 'मराठवाडा विद्यापीठ नामांतर' या एका प्रश्नाभोवती केंद्रित झाली आहे. संघटनेचे बाह्य स्वरूप लष्करी पद्धतीसारखे करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. म्हणजे संघटनेत जसे अध्यक्ष-उपाध्यक्ष आपला नेहमीचा क्रम असतो, तसा इथे 'कमांडोज' 'कॅप्टन' 'कर्नल' अशी रचना आहे. दलित मुक्तिसेनेच्या जाहीरनाम्यात म्हणजे त्यांच्या हस्तलिखितात. प्रा. जोगेंद्र कवाडे यांचा हुद्दा 'कमांडर इन चीफ' असा पाहायला मिळाला. दलित मुक्तिसेनेच्या शाखेला 'छावणी' म्हटले जाते. दलित मुक्तिसेनेचे कार्यकर्ते निदर्शने, घेरावो करायला निघतात त्या वेळी डोक्याला कफन बांधून निघतात. या कफनावर 'जय भीम' असे लिहिलेले असते.

'कफन' हम तो जानते हैं मगर ये तो कफन लगताही नहीं. यह कोई अलग तरीका है?' मी दलित मुक्तिसेनेच्या माताजींना हा प्रश्न विचारला.

'अरे भाई, 'कफन' तो अलग होता है. मगर हमारे लिये यही कफन है- सरपे बांधे कफन, हम तो कातील को ढूंढते हैं!'

'माताजी' हे दलित मुक्तिसेनेतले एक बडे प्रस्थ. वय वर्षे साठ. संपूर्ण नाव श्रीमती सीताराणी भारद्वाज. सध्या त्या पिंपरी-चिंचवड दलित सेनेच्या संघटक आहेत. मूळ गाव उत्तर प्रदेशातले बुलंद शहर. माताजींचे पती सदर्न कमांडमध्ये चीफ अकौंटंट. माताजी पतीच्या नोकरीच्या निमिताने तीस वर्षांपूर्वी पिंपरीत आल्या. त्या आता जवळजवळ स्थाईक झाल्या आहेत. माताजी या ब्राह्मण. संपूर्ण कुटुंब कर्मठ ब्राह्मण. आयुष्याची साठ वर्षे कर्मठ ब्राह्मण्य आचरणाऱ्या या

महिलेने जात–पात–धर्माची बंधने ठोकरून जीवनाच्या उत्तरकाळात दलितचळवळीत उडी घेतली आहे.

'माताजी, आपको कितने बेटे–बेटियाँ ?'

'अरे भाई, मैं तो बडी बालबच्चेवाली औरत हूँ ! – चार बेटे और दो बिटियाँ, सब बेटे–बिटियाँ बालबच्चेवाले हैं. बडा बेटा टेल्को में पर्चेस-ऑफिसर है, दूसरा पेन्सिलीन कारखानेमे, तीसरा रेल्वेमें और चौथा वार्यारिंग काम करता हैं. मेरी बडी बेटी सौ. कृष्णा दयानंद शर्मा बडी पढी–लिखी है, अभी वो पुना के वाडिया कॉलेज में प्रोफेसर है. सबसे छोटी बेटी कुमुद जगमोहन बागनायक यह भी टेल्को में सर्व्हिस करती है.' उल्लेखनीय.

विशेष बाब म्हणजे माताजींची धाकटी कन्या, सध्याची सौ. कुमद जगमोहन बागनायक, हिच्या आंतरजातीय विवाहाची घटना. कुमुदने घरच्या लोकांची संमती न घेता एका दलित तरुणाबरोबर रजिस्टर विवाह केला. दोघेही टेल्कोत. तिथेच परिचय आणि परिचयाचे रूपांतर प्रेमविवाहात. माताजींना ही हकीकत समजली तेव्हा त्यांनी तीन–चार रिक्शांतून दहा–पंधरा दलित–कार्यकर्ते दोघांनाही आणण्यासाठी पाठविले. पोरं उत्साही. त्यांना ते घेऊन आले. कुमुद दारात दिसताच माताजी कडाडल्या –

'अरे वो पागल ! तुम्हे कोई अकल है या नही ? पहिले क्यों नही बोली ? पहिले बोलती तो कितनी धुमधामसे शादी बना देती. खैर, दो दिन आप दोनो इधरही रुको!'

माताजींनी सर्व दलित पोरं गोळा केली. दारात मंडप घातला, बँड लावला, मोठ्या धुमधडाक्याने पोटच्या पोरीवर अक्षदा टाकल्या. चार–पांच हजार लोकांना जेवायला घातले. स्वत:साठी बांधलेला फ्लॅट मुलीला भेट दिला. लोक म्हणतील पोटच्या कन्येसाठी हे सर्व केले. आई–वडिलांच्या संमतीने विवाह करणारे आणि परस्पर लग्न करणारे, ही दोन्हीही पोटचीच अपत्ये असतात; पण सामाजिक बंधनाच्या चुकीच्या कल्पना ठोकरून लावण्याचे धैर्य मी मी म्हणणारे दाखवीत नाहीत. ते एका महिलेने आयुष्याच्या उत्तरार्धात दाखविले हे निश्चितच कौतुकास्पद आहे !


सध्या माताजी दलित–चळवळीत आघाडीवर आहेत. पंधरा ते वीस वेळा तुरुंगात जाऊन आलेल्या आहेत. लाठ्या खाल्ल्या आहेत. लाठीचार्ज सुरू झाला की, दुर्गा–भवानीसारख्या माताजी पुढे सरकतात. त्यांना आवरताना मुक्तिसेनेतील तरुणांच्या नाकी नऊ येतात. काही बातम्यांची कटिंग्ज पाहायला मिळाली. पिंपरी–चिंचवड दलित चळवळीच्या संदर्भात प्रत्येक ठिकाणी माताजींचा उल्लेख येतो. 'पिंपरी-चिंचवड दलित मुक्तिसेनेचा मंत्र्यांना घेराव. या प्रकरणी एका महिलेसह पन्नास तरुणांना अटक' – बातमीचा हा मथळा ठरलेला. तरुणांच्या संख्येत चढउतार होतो; पण माताजींचा उल्लेख कायम असतो !

माताजींच्या घरीच दलित मुक्तिसेनेतील बाकीच्या कार्यकर्त्यांची ओळख झाली. पंढरी आवाड हा २६ वर्षांचा तरुण. शिक्षण अकरावी. सध्या पूर्णवेळ दलित मुक्तिसेनेचे काम करतो.

'आवाड, तुमचे उपजीविकेचे साधन काय ?'

'माझी पत्नी नोकरी करते.'

'मुले–बाळे ?'



पंढरीनाथ आवाड


□

'हो. आहेत ना ! दोन मुले व एक मुलगी !'

आवाडसारखी योजना जवळपास सर्वच दलित संघटनातील कार्यकर्त्यांनी केल्याचे नजरेस आले. नवरा दलित चळवळीत असेल तर बायको कमवीत असते. बायको काम करीत असेल तर नवरा नोकरी करतो आणि दोन्ही चळवळीत असतील तर मुलगा नोकरी करतो. प्रत्येक कुटुंबातला कोणी ना कोणी पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून दलित चळवळीत अग्रभागी असतोच. हे सर्व अगदी कामाची वाटणी करून दिल्याप्रमाणे बिनबोभाट चालू असते. पंढरी आवाड आतापर्यंत ८ ते १० वेळा तुरुंगात जाऊन आलेला आहे. त्याचा बहुतेक वेळ तुरुंगातच जातो. घरचे सर्व पत्नी बघते. खरोखरच या लढाऊ वृत्तीचे कौतुक करण्यासारखे आहे. दलितांची ही पोरं पाहिली की, सदैव युद्धमान राहिलेला व्हिएटनाम समाज आठवतो. पंढरी आवाड कमांडो आहे.

पंढरी आवाडचा सहकारी आहे किरण रणखांबे. शिक्षण नॉन-मॅट्रिक. अविवाहित. पूर्णवेळ कार्यकर्ता. किरणचे वडील नोकरी करतात. किरणचे वडील दलित मुक्तिसंघटनेच्या विचाराशी सहमत नाहीत; पण त्यांचा किरणने काम करण्यास कोणताही विरोध नाही. किरणचे वडील बरेच समंजस आणि मनमोकळे वाटले. प्रा. जोगेंद्र आवाडे यांच्या शनिवारवाड्यापुढे २२ मार्च रोजी झालेल्या भाषणाची टेप ऐकली. भाषणातील प्रक्षोभाचा भाग सोडला तर कवाडेंनी मांडलेले विचार, युक्तिवाद काहीच चुकीचे नाहीत. त्यांची दलितस्तानची मागणी दलितांना होणाऱ्या प्रखर विरोधातून पुढे आली आहे, हे विसरता येत नाही. शेवटी कोणतेही विघटन वारंवार होणाऱ्या विरोधातूनच निर्माण होते. बांगला देश, इस्रायल ही त्याची उत्तम उदाहरणे. आपल्याला स्वतंत्र व्हायचे आहे अशी या चळवळींची सुरुवात कधीच नव्हती. सततच्या संघर्षातून विघटणेच्या निर्णयाला पोचलेले हे देश आहेत. तेव्हा नामांतराचा प्रश्न निकालात निघणे हा दलितांच्याच नव्हे तर समाजाच्या आणि देशाच्या हिताचा आहे.'

नामांतराच्या मागणीसाठी १४ एप्रिलला संसदेवर मोर्चा जाणार



किरण रणखांबे

¤

आहे. त्यासाठी जोरदार तयारी चालू आहे. माताजी, पंढरी आवाड, किरण रणखांबे आणि त्यांचे दोनशे सहकारी पिंपरीतून जाणार आहेत. 'चलो आग्रासे देहली !' असे या लाँगमार्चचे नाव आहे. या मोर्चाचे नेतृत्व स्वत: प्राध्यापक जोगेंद्र कवाडे हे करणार आहेत.

संध्याकाळची वेळ झाली होती. बऱ्याच गप्पा, विनोद, चर्चा या कार्यक्रमानंतर चहापाणी झाले. मोर्चानिमित्त सर्वांना शुभेच्छा देऊन लॉजवर परतलो !

## धर्मजागृती........समाजसुधारणा

रिपब्लिकन पक्षाचे नेते मसुरे यांच्या घरी बसलो असताना दत्तात्रय केरु तांबे यांची ओळख झाली. तांबे देवगड तालुक्यातल्या नांदगावचे राहणारे. सध्या देवगड सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे. हाफकिन इन्स्टिटयूटमध्ये उत्पादन-सहाय्यक म्हणून काम करतात. पाली भाषेचे पंडित आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये बौद्धमहासभेचे काम पाहतात. अ. भा. बौद्धमहासभेच्या पिंपरी-चिंचवड भागाचे जनरल सेक्रेटरी म्हणून काम पाहणाऱ्या या तरुणाने १०-१२ वर्षांपासून बौद्धधर्म-प्रचाराची धुरा खांद्यावर घेतलेली आहे. मसुरे यांनी परिचय करून दिल्यानंतर त्यांना विचारले-

'तांबे, आपण धार्मिक काम करता म्हणजे नेमके काय करता ?'

'धर्मसंमेलने आयोजित करणे, दैनंदिन प्रार्थना कशी करायची ते सांगणे, विवाह वगैरेचे पौरोहित्य करणे. आम्हाला बौद्धाचार्य म्हणतात.

'त्यासाठी आपण काही दक्षिणा वगैरे घेता का ?'

'नाही ! दक्षिणा वगैरे काही नाही. अशा काही धार्मिक कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाल्यास आम्ही त्या ठिकाणी स्वत:च्या खर्चाने जातो-येतो. दक्षिणा वगैरे आमच्यात निषिद्ध मानले जाते. प्रवासखर्च वगैरे कोणी दिल्यास ठीक, नाही तर स्वत:च करायचा.'

मला माझ्या गावातील एका गरीब हिंदू स्त्रीची आठवण झाली. ७२ चा भयानक दुष्काळ. दोन मुले असलेल्या या बाईचा नवरा आजारी पडला. बाईनं होतं नव्हतं ते विकून टाकलं; पण त्याचा



एस्. बी. ओव्हळ

¤

उपयोग झाला नाही. नवरा गेला. अंत्यविधी वगैरे पार पडला. तेरावा दिवस उजाडला. बाई हवालदिल झाली. जीवनात तीस-पस्तीस वर्षं साथ केलेल्या नवऱ्याचा दिवस व्यवस्थित करता येईना हे बाईचं दु:ख. घरात फक्त दोन पोती ज्वारी होती. मोठ्या कष्टानं तिनं सर्व जमवलं; पण गावातला ब्राह्मण काही तयार होईना. त्याला हवे होते दोनशे रुपये! कशासाठी, तर मंत्रयुक्त विधीसाठी ! बाईने पदर पसरला; पण त्या भटाच्या हृदयाला काही पाझर फुटला नाही. शेवटी बाईनं आपल्या पिलांची तोंडं बंद करून दोन पोती ज्वारी त्या ब्राह्मणाच्या हवाली केली तेव्हा कुठे तो विधीसाठी तयार झाला ! सुसंस्कृत म्हणून सर्वत्र मिरवणारा आणि दोनशे रुपयांसाठी एका मजूरस्त्रीच्या पिलांच्या तोंडातला घास काढून घेणारा भ्रष्ट ब्राह्मण कोणीकडे व स्वत:च्या खर्चानं गोरगरिबांची पौरोहित्ये करणारा हा दलित पुरोहित कोणीकडे ?

'बरे तांबेजी, आपल्याकडे हुंडा वगैरे ?'

'छे ! छे !! आमच्याकडे हुंडा वगैरे निषिद्ध आहे. आमच्याकडे जवळजवळ शंभर टक्के हुंडाबंदी अंमलात आली आहे. दलित कुटुंब असो वा श्रीमंत असो, हुंडा देणे-घेणे दोन्ही निषिद्ध मानले जाते. त्याचप्रमाणे, बालविवाह, विजोड विवाह, वृद्धविवाह हे आम्ही निषिद्ध मानतो. आमच्याकडे आंतरजातीय व सामुदायिक विवाहाला प्राधान्य दिले जाते. कमीत कमी खर्चात विवाह करावा, हा आमच्या बौद्ध आचारसंहितेतील एक भाग आहे.'

श्री. तांबे यांनी सामाजिक समस्या, विवाहपद्धती आणि अन्य बरीच माहिती सांगितली. शाळा-कॉलेजमध्ये असताना बौद्धधर्माविषयी बरेच वाचन केले होते; पण ते सर्व मार्कांवर डोळा ठेवून. खरा बुद्धधर्म समजावून सांगितला तो तांबे यांनीच. ऊठसूट बौद्धधर्मावर टीका करणाऱ्या कितीजणांना बौद्धधर्म समजला आहे ?

एस. बी. ओव्हळ हे चाळीस-पंचेचाळीसच्या दरम्यानचे रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते. 'अॅटलास कॉप को 'मध्ये नोकरीला. मनाने आणि वर्तनाने अतिशय स्वच्छ असलेला हा माणूस अॅटलास कंपनी, पिंपरी गाव, तसेच सेवा सहकारी बँकेच्या वर्तुळात आदराचा विषय आहे. ओव्हळ यांना कोणतेही व्यसन नाही. अगदी चहा-सुपारीदेखील त्यांना वर्ज्य आहे. हा पिंपरीच्या सेवा विकास सहकारी बँकेतील एकमेव महाराष्ट्रियन माणूस ! ते या बँकेचे संचालक आहेत. सिंधी समाजाचे वर्चस्व असलेल्या बँकेत सर्वांशी भांडून ते महाराष्ट्रियन माणसांची कामं करून घेत असतात. कंपनीच्या विमानानं त्यांनी सर्व भारताचा प्रवास केला आहे. हे सर्व असताना स्वत:चे

स्थान विसरून रिपब्लिकन पक्षाच्या कामासाठी रात्रंदिवस झटणारे ओव्हळ दलितांतील फाटाफुटीने अतिशय व्यथित झालेले आहेत. 'त्यामुळं आमचा कामाचा उत्साह पार मावळून गेला आहे' या शब्दात त्यांनी स्वतःची व्यथा बोलून दाखवली.

दोन–चार दिवसांच्या भटकंतीत दलितचळवळीतील महत्त्वाची भूमिका जाणवली ती दलितस्त्रियांची. पुरुष किंवा तरुण यांच्याएवढे मतभेद स्त्रियांमध्ये नाहीत. सामंजस्य, सहकार्य याचं दर्शन घडलं. पिंपरीत प्रत्येक वॉर्डात महिलामंडळ आहे व या महिलामंडळात १०० ते १५० दलितस्त्रिया आहेत. आज पिंपरीत प्रत्येक घराघरातून जो पूर्ण वेळ कार्यकर्ता आढळतो त्याचे सर्व श्रेय स्त्रियांकडे जाते. सर्व महिलामंडळात मिळून सुमारे दीड ते दोन हजार स्त्रिया होत्या.

महिलामंडळाच्या वतीने बालवाड्या, प्रौढ शिक्षणवर्ग चालविले जातात. कोणत्याही आंदोलनात सहभागी न झालेली एकही स्त्री शोधून सापडणार नाही! सध्या या सर्व दलितमहिलांचे नेतृत्व आहे सौ मंदाकिनी रोकडे यांच्याकडे. पिंपरी–चिंचवडमध्ये पोलीस कोणाचेही मोर्चे निघाले तर विशेष चिंता करीत नाहीत; पण पिंपरीतील दलितमहिलांचा मोर्चा निघाला की, एस. आर. पी. देखील सावध असतात असे खुद्द एका पोलीसअधिकाऱ्यानेच सांगितले. वर्षोनवर्षाचे दारिद्र्य, अन्याय, अत्याचार याला टक्कर देत, समाजाची हेटाळणी सहन करीत उभ्या ठाकणाऱ्या या महिलांचे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे, यात शंका नाही.

परत दलित पॅन्थरच्या डिलक्ससमोरील अड्ड्यावर गेलो. पिंपरी-चिंचवड दलित पँथरचा अध्यक्ष तुकाराम सूर्यवंशी आणि त्याच्या सर्व सहकाऱ्यांची भेट झाली. नुकतेच ते सर्व पोलिसांचा पाहुणचार घेऊन परतले होते.

'या काळेसाहेब, आम्हाला वाटलं तुम्ही आता वाट पाहून परत जाणार! ...सूर्यवंशी.

'जातो कुठे? तुम्ही सर्व 'सरकारी दुल्हे' सासुरवाडीहून परतल्यानंतर स्वागताला कोणी नको? म्हणून थांबलो.'– मी. सर्वजण खळाळून हसले.

परत चहा–पाणी–धूम्रपान आणि जोडीला गप्पा सुरू झाल्या.

सूर्यवंशी हा पंचविशीच्या आत–बाहेरचा तरुण. दोन–तीन वर्षांपासून दलित पँथरचे काम करीत आहे. त्याच्या खांद्याला खांदा भिडवून दिलीप उबाळे, चंद्रकांत चव्हाण, माणिक पालके हे तरुण काम करतात. हे सर्व दलित पँथर–नामदेव ढसाळ गटाचे कार्यकर्ते. सध्या पँथरमध्ये दोन गट आहेत. सुरुवातीला ढाले–ढसाळ हे दोन गट अस्तित्वात आले. ढसाळचा गट अजून अस्तित्वात आहे; पण ढाले गट संपला. सध्या राजा ढाले बौद्ध महासभेचे काम पाहतात असे ऐकले. शिवाय ते मुंबईत 'मास मुव्हमेंट' नावाची संघटनाही चालवतात. दलित पँथरचा ढाले गट आता 'भारतीय दलित पँथर' या नावाने ओळखला जातो. रामदास आठवले, अरुण कांबळे आणि गंगाधर गाढे हे या गटाचे पुढारी.

'सूर्यवंशी, चळवळीव्यतिरिक्त तुम्ही दुसरे काही करीत नाही का?'...माझा प्रश्न.

'करतो ना. या ठिकाणाहून जवळच 'राहूल व्यायाम शाळा' नावाची तालीम आम्ही चालवितो. तसेच यापूर्वी 'दलित पँथर मेडिकल सेंटर' चालवीत होतो. भूमिहीन आंदोलन, सामाजिक नाटकं वगैरे आमचे कार्यक्रम चाललेलेच असतात.'



सौ मंदाकिनी रोकडे

¤

'एखादा सामाजिक प्रश्न उभा राहिला तर ही तुमची फाटाफूट त्रासदायक ठरत नाही का?'

'ठरते ना! पण करणार काय? अशा वेळी आम्ही माघार घेऊन सामाजिक प्रश्न म्हणून तो हाताळतो. कारण मुख्य मतभेद निर्माण होतात ते नेतृत्व कोणी करावे यावरून. सामाजिक प्रश्नाच्या बाबतीत आम्ही सर्व गटांना सहकार्य करायला तयार असतो.'

'सर्वांना एकत्र करण्याचे दलित पँथरचे ध्येय होते ना?'

'होय होते; पण पँथरच फुटली. फूट कार्यकर्त्यांत नाही. फाटाफुटी करतात ते नेते. त्यात इतर पक्षही भर घालतात. आमचे सर्वच दलितनेते कोणाच्या ना कोणाच्या कच्छपी लागलेले आहेत. आम्हा कार्यकर्त्यांना ही फाटाफूट मान्य नाही; पण करावे काय ते सांगा!'

'नामांतराबाबतचा आपला काय विचार आहे?'

'आम्हाला नामांतर हवे; पण समजुतीने. त्यासाठी देश वगैरे सोडणे हे आम्हाला मान्य नाही. नामांतर झाल्याने दलितांच्या परिस्थितीत काहीच फरक पडणार नाही. तेव्हा सामोपचाराने घेण्याचा आमचा विचार आहे. इतर महत्त्वाचे जे प्रश्न आहेत ते आम्ही हाताळणार आहोत.'

'पण दलित मुक्तिसेनावाल्यांना तर 'दलितस्थान' हवे आहे ना! त्याचे काय?'

'त्यांना हवे आहे. आम्हाला नको! आम्ही भारतीय म्हणून जन्मलो, भारतीय म्हणूनच मरणार! पिंपरी–चिंचवडमध्ये आम्ही सर्वजण संघटित आहोत म्हणून कसल्याही घोषणा केल्या तर कसे चालेल? आमच्या अविचारी वागण्याचे परिणाम खेडोपाडी दलित बांधवांवर काय होतील याचा विचार करायलाच हवा. शहरात जे घडते त्याची प्रतिक्रिया खेडोपाडी उमटत असते. स्वतःच्याच पायावर दगड पाडून घेणारी कोणतीही कृती आम्ही करणार नाही!'

¤

एकंदर पिंपरी–चिंचवडच्या भेटीत सर्वच तरुण ध्येयवादी वाटले. लढाऊ वाटले. या तरुणांना चहा–सिगारेटशिवाय अन्य कोणतीही व्यसनं दिसून आली नाहीत. सर्वच गटातील कार्यकर्त्यांमध्ये समाजवादी मंडळींबद्दल राग जसा दिसून आला तसा पं. नेहरू, म. गांधी, शिवाजीमहाराज यांच्याविषयी आदर जाणवला. प्रा. कवाडे यांच्या टेपवर ऐकलेल्या (दि. २२ शनिवारवाड्यापुढे झालेल्या) भाषणात प्रक्षोभ आहे, राग आहे, संताप आहे; पण शिवाजीमहाराज, गांधी, नेहरू या महापुरुषांविषयी कुठेही अनादराचा सूर नाही. कवाडे त्यांच्याविषयी विनम्रतेने बोलले आहेत यात शंकाच नाही. तीच गोष्ट रिपब्लिकन पार्टीच्या, तसेच दलित पँथरच्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत जाणवली. काही दिवसांपूर्वी श्री. प्रभाकर मसुरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेला सर्वपक्षीय 'हंडा मोर्चा' पं. नेहरूंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मार्गी लागला होता. दलितांच्या संकुचित वृत्तीचा अजून तरी कुठे पुरावा नाही. हे सर्व पाहिल्यानंतर दलित कार्यकर्त्यांच्या बाबतीत किती गैरसमज इतर समाजांच्या मनात आहेत हे चटकन जाणवते.

दरवेळी होणाऱ्या निदर्शने, मोर्चातील नुकसानीचे खापर मात्र या दलित कार्यकर्त्यांवर फोडले जाते, याबद्दल बोलताना सर्वांनी पोलीस कसे डावपेच लढवितात हे सांगितले. पोलिसांच्या दडपशाहीबद्दल दलितेतर लोकांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. याबद्दल एका पँथरचे उद्गार बोलके आहेत. तो म्हणाला,

'साहेब, पूर्वी समाजाने आम्हाला बहिष्कृत केले होते. ते आम्हाला चोर, लुटारू, गुन्हेगार ठरवून समाजात मिसळू देत नव्हते. आता समाजाने आमचा स्वीकार केला तर पोलिसांनी आम्हाला गुन्हेगार ठरविले आहे. कुठे काही घडले की, प्रथम अटक दलितांना. त्यासाठी आम्ही दंगल करायचीही गरज नाही आज या पिंपरीतील सुमारे दोन हजार दलित कार्यकर्ते पोलिसांच्या ब्लॅकलिस्टमध्ये आहेत आणि कुठे काही घडले की, पोलीस त्यांना उचलतात. शेवटी कोणताही समाज क्रियेच्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त करतोच ना?'

¤

वेळ बराच झालेला होता. सर्वांचा निरोप घेतला. पुण्याला जाणाऱ्या बसमध्ये जाऊन बसलो बस निघाली. खिडकीतून दिसणारी एकेक झोपडी मागे पडत होती. झोपडीबाहेर नुकतेच तुरुंगातून सुटलेले तरुण गटागटाने गप्पा मारीत बसलेले दिसत होते. निर्विकार चेहरे पुढील संघर्षाचा वेध घेत होते.

☐

---

ह्या ना त्या निमित्ताने

फिरोझ रानडे

# बदललेले तेंडुलकर आणि आपला श्याम

'बघा मी आधीच म्हटलं नव्हतं? झालं की नाही त्याप्रमाणे?" राधाने हातातले कोणते तरी साप्ताहिक श्यामच्या पुढ्यात टाकून म्हटले.

राधाच काय पण जगातल्या बहुतेक बायकांनी सगळ्या गोष्टी 'आधीच' म्हणून ठेवलेल्या असतात. राधाने तर इंदिरा गांधी हरणार आहे, त्यानंतर जनता सरकार येणार आहे, त्याचा दोन-अडीच वर्षांत बोजवारा उडणार आहे व त्यानंतर परत इंदिराजी पंतप्रधान होणार आहेत वगैरे 'आधीच' सांगून ठेवले होते. थोडक्यात म्हणजे १८५७ सालचे बंड वा सावरकरवादी म्हणतात त्याप्रमाणे १८५७ सालचे स्वातंत्र्य-युद्ध सोडून राधाने सगळ्या बाबतीत 'आधीच' सांगून ठेवले होते.

राधाचे 'आधीच' म्हणून ठेवणे फक्त राष्ट्रीय प्रश्नाबाबत होते असे नव्हे. ते आंतरराष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय गोष्टी बाबतही असे. आंतरराष्ट्रीय म्हणजे रेगन आणि आता आन्द्रेपोव्ह वगैरे बाबतीत हे स्पष्टच आहे.

आंतरराष्ट्रीय म्हणजे शेजार-पाजारच्या गावापासून म्हणजे फ्लॅटमधून होणाऱ्या गोष्टी. चवथ्या मजल्यावरच्या भागवतांची नवी काम करणारी बाई आठ दिवसांच्या वर रहाणार नाही हे राधाने 'आधीच' सांगितले होते. त्या 'वरच्या' कुलकर्ण्यांच्या मुलीचे व 'खालच्या' कामतांच्या भावाचे जमणार हे राधाने त्या बिचाऱ्यांच्या मनात तसले विचारही येण्याचे 'आधीच' बोलून ठेवले होते आणि समाधानाची गोष्ट म्हणजे तिचे म्हणणे फळाला आले होते.

आज कोणत्या विषयावर 'आधीच' सांगितलेले खरे ठरले असावे ह्याचा श्यामला अंदाज करता येईना; पण अंदाज करता आला नाही म्हणून ॲक्टिंग करता येत नाही असे थोडेच आहे?

चेहऱ्यावर योग्य प्रमाणात आनंद आणून श्याम म्हणाला, 'अरे वा! काय म्हटलं होतस बरं तू?'

'मी आधीच म्हटलं नव्हतं तेंडुलकर बदलताहेत म्हणून. तुमच्या तर कधी लक्षातच आले नाही.'

श्यामने राधाकडे चमकून पाहिले. राधाचे आतापर्यंतचे 'आधीच' म्हणणे इंदिराजी, जनतापक्ष, रेगन, आन्द्रोपोव्ह, भागवतांची कामाची बाई, वरची कुलकर्णी-मुलगी, खालचा कामत-भाऊ येथपर्यंतच होते ते श्याम समजू शकत होता; पण आता राधाने तेंडुलकरांच्या बदलबद्दलही 'आधीच' बोलून ठेवले असावे हे बघून त्याला धक्काच बसला व त्यामुळेच त्याचे चमकून पहाणे.

श्यामसारख्या सरकारी नोकराला फक्त साहेबात झालेला फरक जाणवतो. प्रत्यक्ष राधात पडलेला फरक जेथे त्याला जाणवला नाही तेथे तेंडुलकरात पडलेला फरक त्याला काय जाणवणार? कपाळ!

त्यातून तेंडुलकरांच्या फुलणाऱ्या वयात जर श्याम महाराष्ट्रात असता तर गोष्ट वेगळी. दिल्लीत त्याने हिंदी 'घाशीराम कोतवाल' पाहिला होता आणि एकदा सुट्टीवर आला होता त्या वेळी 'सखाराम बाइंडर' पाहण्याचा योग आला होता.

पूर्वी शितावरून भाताची परीक्षा करता येत असे; पण ह्या दोन शितांवरून तेंडुलकरांची परीक्षा कशी होणार ?

मी काय सांगत होते कधीपासून ? पण आपली बायको म्हणजे मूर्ख अशीच तुमची समजूत. तिच्या बोलण्याला काय महत्त्व द्यावयाचे ? आता हे वाचा !'

आता एवढे कडक बोलल्यावर राधाला तेथे थांबणे शक्यच नव्हते. तेव्हा ती तेथून निघून गेली.

श्यामने ते तेंडूलकरांमध्ये घडलेला बदल दाखवणारे साप्ताहिक उचलले व चाळू लागला. 'गुंतवून ठेवणारे तेंडुलकरांचे नवे नायक !' ह्या मथळ्याखाली मुंबईच्या कोणा विदुषीने त्यांच्या 'कन्यादान' ह्या नाटकाचे मोठे रसीले परीक्षण केले होते.

—'...असत्यमेव जयते हे बोधवाक्य ठेवून लिहिणाऱ्या तेंडुलकरांचे हे नाटक त्यांच्या ह्या मर्यादेपासून पुष्कळ प्रमाणात मुक्त आहे म्हणून ते आकर्षून घेते . तेंडुलकरांमधले हे बदल स्वागतार्ह आहेत. अनेक बाह्य आणि आंतरिक दडपणांनी बंदिस्त झालेली त्यांची प्रतिभा मुक्त होऊ पहात आहे असे ह्यातून दिसते '

आतापर्यंत आपली प्रतिभा काही कारणाने बंदिस्त होती हे स्वत: तेंडुलकर मान्य करतील का ? असा श्यामला प्रश्न पडला; पण तो प्रश्न तेंडुलकरांचा आहे आपला नाही असा विचार करून तो त्याने सोडवला व बाकीच्या लेखाबाबत तो विचार करू लागला; पण त्याच्या डोक्यात काही प्रकाश पडेना. कारण त्याने मुळी मजकूर, खुद्द नाटक म्हणजे 'कन्यादान' पाहिलेच नव्हते.

नाटके पाहाण्यात श्याम-राधाची फार टाळाटाळ होत असे. त्याची कारणे दोन. एक तर ते मुंबईच्या अशा भागात रहात होते की जेथून गडकरी, मंगेशकर, शिवाजी, रवींद्र वगैरे मंडळी अतिशय दूर व गैरसोयीची होती. त्यातल्या त्यात भालेरावच सोयीचे होते.

टाळाटाळ होण्याचे दुसरे कारण म्हणजे कोणती नाटके पहावीत ह्याबाबत राधाबरोबर होणारा श्यामचा मतभेद. आपण आता २५–२६ वर्षांनी महाराष्ट्रात आलो आहोत तर ह्या बदललेल्या संस्कृतीची मुळापासून ओळख करून घ्यावी असे श्यामचे मत.

एखाद्या गोष्टीची मुळापासून सुरुवात करावयाची म्हणजे जसं इंग्रजी शिकताना A, B, C, D पासून सुरुवात करतात त्याप्रमाणे मराठीत ज्या नाटकांना 'A' certificates मिळाली आहेत, म्हणजे बुवा, मादी, मॅडम, राडा, लिलाव भोग–सम्राट ह्या नाटकांपासून सुरुवात करावी.

ह्या विचारसरणीच्या मागे श्यामची विकृत मनोवृत्ती आहे असे राधा म्हणे. त्यावर श्यामचे उत्तर असे की, तेंडुलकरांची नाटके कोठल्या तरी विकृत मनोवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात तशी ही नाटके पण कोठल्या तरी विकृतपणाचे प्रतिनिधित्व करतातच की ! मग ती का न पहावी ?

पण राधाला ते जाम पटत नसे. त्यामुळे श्यामला A, B, C, D नाटके सोडून S, T, U, V नाटके पहावी लागत.

राधा परत येताच श्याम सावरून बसला व म्हणाला, 'हे 'कन्यादान' पाहिले पाहिजे एकदा !' येथे 'पाहिले पाहिजे एकदा' हा सर्वसामान्य मराठी वाक्प्रचार आहे त्या अर्थी श्यामने म्हणले होते.. तेंडुलकरांचीच काय पण आजकालची बहुतेक नाटके फक्त 'एकदा पाहाण्याची असतात असे त्याला म्हणावयाचे नव्हते व त्याला तसे म्हणावयाचे नव्हते म्हणून राधालाही त्याचे काही वाटले नाही. शिवाय ती आपल्या 'ह्यात'च होती.

'आता कसे आलात वठणीवर ? आजपर्यंत चाल-ढकल करत होतात नाही ?'

'चाल-ढकल करत नव्हतो पण तूच सांग शिवाजी, छबिलदास, गडकरी कोणी तरी आपल्याला सोयीची आहेत का ? सुदैवाने ह्या रविवारीच भालेरावला आहे म्हणून म्हटलं.'

'तुम्ही कबूल करू नका; पण मी म्हटले होते की, तेंडुलकरात बदल पडत चालला आहे तर त्या वेळी तुम्हाला त्याचे काही वाटले नव्हते; पण आता मुंबईच्या कोणा बाईने तेच म्हणताच कसे लगेच तयार झाले नाटक पहायला ?"

श्यामकडे ह्यावर उत्तर नव्हते व असते तरी ते ह्या वेळी देणे योग्य नाही एवढे तारतम्य त्याला होते.

¤




नाटक संपले आणि श्री. नाथ. देवळालीकर म्हणजेच आपले डॉक्टर लागू जितके सुन्न होऊन बसले त्याच्यापेक्षा आपला श्याम जास्त सुन्न होऊन गेला. नाथ देवळालीकर आपल्या मुलीवर काय हा प्रसंग आला म्हणून सुन्न झाले होते तर नाथ देवळालीकरांवर काय हा प्रसंग गुदरला म्हणून श्याम सुन्न होऊन बसला होता !

घरात इतके लोकशाही वातावरण ठेवणाऱ्या, अश्या तऱ्हेचा विवाह हा प्रयोग आहे व तो आपण यशस्वी केला पाहिजे म्हणणाऱ्या, अरुण आठवले ह्या दलित जावयाला मन:पूर्वक समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या, तो ज्योतीलाच मारतो म्हणून चिडणाऱ्या, कौतुक–सभेला जाण्याचे नाकारून पण मुलीच्या भवितव्याकडे बघून कोणीही बाप पड खाईल तशी पड खाणाऱ्या नाथ देवळालीकराला तेंडुलकरांनी चक्क 'गुरुजींसारखा छक्का' ठरवावे ना? व तेही अगदी सानेगुरुजींच्या फोटो समोर नेऊन. म्हणजे 'गुरुजी' कोण ह्याबद्दल प्रेक्षकांच्या मनात संदेह राहू नये ह्या हेतूने.

सानेगुरुजींसारख्या निर्मळ मनाच्या माणसाला त्यांच्या मृत्यूनंतर चाळीस वर्षांनी 'छक्का' म्हणून हिणवण्यात तेंडुलकरांना काय 'पुरुषार्थ' वाटला असेल बुवा ?

बरे, अगदी तेंडुलकरांच्या मतेसुद्धा सानेगुरुजींनंतर उदाहरण देण्यासारखे 'छक्के' काय कमी झाले ? संयुक्त-महाराष्ट्रलढ्याचे वेळी महाराष्ट्रात छक्क्यांची झाडेच्या झाडे लागली होती, हे त्या काळात आचार्य अत्रेंबरोबर काम करणारे तेंडुलकर इतक्यात विसरले ? गुरुजींचे शिष्यच, एस. एम. वगैरे मंडळी त्याला अपवाद होती.

आणि आणिबाणीच्या वेळी सगळा भारत 'छक्का' झाला होता हे तर तेंडुलकर विसरले नाहीत ना ? एक मोठा ग्रुप फोटो काढता येईल इतके 'छक्के' त्या वेळी फक्त महाराष्ट्रातच होते, मग सानेगुरुजींचाच फोटो का ?

मध्यमवर्गाच्या म्हणजे ब्राह्मणवर्गाच्या जशा काही परंपरा असतात, चाली–रीती असतात, अगदी शिव्या–गाळी करण्याचे, छळण्याचे प्रकार असतात त्याच्यापेक्षा वेगळे झाले रे झाले की ते हवालदिल होतात.

अगदी ब्राह्मणी कुटुंबातल्या, टेल्कोमध्ये इंजिनियर असणारा पुण्याचा तरुण प्रथम बायकोच्या तोंडात बोळे कोंबतो, मग बत्त्याने तिचे पाय मोडून काढतो व मग तिच्यावर रॉकेल टाकून पेटवतो व आईबरोबर बाहेर निघून जातो. त्या वेळी त्याच्यावर झालेल्या संस्काराबद्दल,त्याच्याजातीबद्दल कोणी काही बोलत नाही.

आणि तेच येथे एक दलित दारू पिऊन ज्योती ह्या ब्राह्मण मुलीला मारतो–म्हणजे जिवानिशी नाही–नुसता मारतो व हुंड्यापांड्याकरता नाही, नशेत वा चिडीने मारतो तर ह्यांचा जीव किती कासावीस होतो !

श्यामने लहानपणी 'भक्त प्रल्हाद' हे नाटक पाहिले होते. त्यातला हिरण्यकश्यपु का कोण रंगभूमीवर आला रे आला की आजूबाजूच्या आया–बाया 'आला मेला राक्षस !' वगैरे चीत्कार काढत. तेंडुलकरांचा अरुण आठवले हा दलित स्टेजवर आला रे आला की कोणी 'हिरण्यकश्यपु' आला आहे ह्या अर्थी आजूबाजूच्या 'आई ग !' करत.

अशा ह्या 'हिरण्यकश्यपू'शी नामदेव कालेलकरांची शिकली–सवरलेली मुलगी लग्न करायला तयार का होते व इतका छळ होत असता परत परत त्याचेकडे का जाते ? हे तेंडुलकरांनी मुद्दामच दाखवले नाही. कारण तसे करायचे म्हणजे त्या दलितात काही तरी गुण आहेत हे दाखवावे लागले असते.

आणि कोणात काही गुण दाखवणे हे तेंडुलकरांच्या स्वभावातच नाही, त्याला ते तरी काय करणार ?

असे अनेक विचार श्यामच्या मनात येत होते; पण राधाच्या, 'काय कसे वाटले नाटक ? मी आणि त्या लेखिका बाई म्हणतात तसा स्वागतार्ह बदल आहे की नाही ?' ह्या प्रश्नाने तो चिंतनातून बाहेर आला.

'बदल वगैरे काही नाही; पण आता 'खरे' तेंडुलकर दिसू लागले आहेत. ह्या नाटकात दलितांवर रोख आहे म्हणून आपण त्याला 'स्वागतार्ह' वगैरे म्हणतो आहोत इतकेच.'

ह्यांचं नेहमी काही तरी वेगळंच असतं ह्या अर्थी राधानं मान वेळावली व 'बाहेर' दरवाज्याच्या दिशेनं जाऊ लागली.

□


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

राजहंसचे आगामी प्रकाशन

महात्मा आणि माणूस

लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे

लवकरच प्रसिद्ध होत आहे !

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

## सणकीत

# दररोजचीच रंगपंचमी

तसं आता माझं वय बघता, 'फिरून वळून बघता'च्या चालीवर माझ्या बालपणाकडे पहाणं म्हणजे अकाली प्रौढ झाल्यासारखंच वाटेल.
पण काही गोष्टी कुणालाही आपल्या बालपणात घेऊन जातात.
होळी आणि तिच्या जोडीने येणारी धुळवडही अशीच बालपणात घेऊन जाणारी.
आयुष्यभर विविध रंगांची धुळवड करून शेवटी माणूस शांत होतो तेव्हा त्याच्या निर्जीव डोळ्यांसमोरसुद्धा त्या रंगाच्या पल्याडचं त्याचं बालपण त्याला स्पष्ट होत असेल.
तर अशी ही होळी आणि धुळवड.
सर्व शक्तीनिशी दाबलेल्या पिचकारीतून समोरचा माणूस क्रमशः रंगत जातोय.
याचा त्या पिचकारीसारखाच ओसंडून जाणारा आनंद केवळ 'त्या' वयातच मिळू शकतो.
आणि त्यामुळेच आठ-बारा आण्यांच्या पिचकारीसाठी रडून रडून केलेला आकांत, हात-पाय झाडून डोक्यावर घेतलेलं घर हे सगळं आता 'बालिशपणाचे' वाटते याचं कारणही तेच आहे.
काळ, वेळ इ. ना महत्त्व येण्याचं कारणही तेच.
नंतरच्या एकूण प्रवासातच आयुष्याचे बरेच रंग फिके पडत जातात. त्यामुळे अशा उत्स्फूर्त, निरागस धुळवडीतून, रंगपंचमीतून आपण 'चिखलफेकी' कडे वळतो.
अगोदरच्या काळात कसं बिनठरवलेलं, पुढच्याचा, मागच्याचा विचार न करता आपण रंग टाकत असतो. त्या रंगाला आपण आणखी कुठला 'रंग' देत नाही.
'त्याची कोरी गंजी किंवा शर्ट' रंगवायचा. बस्स एवढीच अंतिम व केवळ इच्छा असते.
अगदी आत्ताच्या राजकारणी भाषेत सांगायचं तर माणूस सोडायचा नाही.
सगळ्यांना बरोबर घेऊन जायचं, आपण रंगलेले, भिजलेले आणि दुसरा पाण्यातल्या बगळ्यासारखा कोरडा म्हणजे हे काहीतरीच पुढे असं रहात नाही.
धुळवडीसाठी होळीची-शिमग्याची वाट पहावी लागत नाही.
किंवा अगदी बोंब मारायसाठी शिमग्याची वाट पहायची गरज वाटत नाही.
पंचांग, तारीख यांच्या चौकटीतून बाहेर पडून केव्हाही शिमगा, धुळवड करता येते.
काही लोकांचा तर तो स्थायीभावच बनतो.
अशा लोकांना काही सांगा ते लगेच म्हणणार हूं, त्यात काय नवीन ! यात अजून हे नाही, ते नाही. हे हवं होतं.. इ. इ.
अर्थसंकल्पावरल्या 'प्रतिक्रिया' या सदरात मोडतात. त्या इतक्या मोनोटोनस असतात की उद्या कधी मी अर्थमंत्री झालो तर 'अर्थसंकल्प' सादर करण्याअगोदर त्यावर काय प्रतिक्रिया येतील त्याच आधी सादर करेन! त्यानंतर आरोप प्रत्यारोपांची रंगपंचमी ठरलेली. त्यातले रंग ठरलेले. काही जुनेच; पण पिचकाऱ्या नव्या. बाकी सारे तेच.

असाच आणखी एक शिमगा बेकारांचा त्यातून मग आजची शिक्षणपद्धती...
भ्रष्टाचार इ. इ. शिवाय 'आदर्श' नाहीत ही पिचकारी तर इतकी पॉवरफुल आहे की, तिच्यातून उडालेला रंग वरच्या वर्गापासून पार खालच्या तळातल्या लोकांपर्यंत पोचतो.
राजकारणात, समाजकारणात, शिक्षणात, व्यवसायात कुठेच आदर्श सापडत नाहीत...
प्रत्येक भाग सुटा केलेला जीवनापासून.
गरज पडली तरच वापरायचा, म्हणजे 'वरून दबाव' आणायचा असेल तर राजकारण्यांना भेटायचं. आपल्यावर अन्याय होतोय असं वाटलं की, लगेच समाजकारणवाल्यांना काखोटीला मारून बोंब मारायची...
एरव्ही 'महागाई', 'लुटतायत' अशा तक्रारी करायच्या आणि स्वतः व्यावसायिक झाल्यावर 'मार्केट'च तसं तर आम्ही काय करणार ? असं पोटावर हात फिरवत किंवा कानात काडी कोरत थंडपणे सांगायचं...
एकूण एका ठराविक काळात बोंब मारायची नंतर कुठला तरी एकच रंग आयुष्याला शेंदरासारखा थापून टाकायचा. आपण साचेबंद झालो की दुसरी पिढी येतेच बोंब मारत कुठेत आदर्श ? कुठेत ?
आता आणखी एका प्रकाराकडे वळू या.
हा प्रकार गृहस्थाश्रमाचा.
इथे जरा उलटा प्रकार असतो.
इथे आधी रंगपंचमी असते नंतर शिमगा !
आधीच्या रंगात, प्रस्थापित रंगाशिवाय आणखी काही रंग असतात.
उदा. गहिरे रंग, प्रणयाचे रंग इ.
आयुष्याच्या या एकाच टप्प्यात माणूस इतके प्रचंड रंग बघत असावा......
अल्ली हळद पिण्याचे दिवस हेच. गुलाबी म्हणजे नक्की काय हे सुद्धा या काळातच कळतं.
प्रेमातल्या आंधळेपणाचा काळा आणि प्रेमात जीव देण्याचा 'सहज' रंगही इथलाच पुढे हा 'गुलाबी' रंग १० पैशाच्या खायच्या कापसासारखा केव्हा पटकन उडतो ते कळतच नाही......बधिर झालेलं 'प्रेमीयुगुल' भानावर येतं ते पोराच्या 'टयँहँ' ने आणि त्या चिमुरड्याच्या लंगोटाची गाठ मारताना प्रकरण किती कठीण आहे हेही समजत जातं आणि मग रेशनकार्ड, गॅसची टंचाई, रविवारची मंडई, झोपेतून उठून दुधाची लाइन पकडा......
आजारपण, औषधं, लग्नकार्याकरताचे प्रवास, अहेर इ. चढत्या भाजणीचा जो शिमगा सुरू होतो तो कुठलीच 'रंगपंचमी' शमवू शकत नाही. कारण 'रंग' असे शिल्लक राहिलेलेच नसतात. सगळं कसं एकी एक. दुरकी दोन.
एवढं सगळं असलं तरी, सारं तेच तेच असलं तरी, करतो आहोत त्यात 'नवं' काही नसलं, तरी न केल्यानं काही बिघडणार नसलं तरीही माणसं ते करत राहतात.
पितळेच्या, चांदीच्या पिचकाऱ्यांच्या जागी प्लास्टिक आलं असेल, गुलालाच्या ठिकाणी ऑइल पेन्ट, सिल्व्हर रंग आला असेल; पण 'रंगपंचमी' लोक खेळतायत.
रंगपंचमी—रंगांची । शब्दांची । चित्रांची
रंगपंचमी—भाषणांची । आश्वासनांची । नियोजनांची
रंगपंचमी—बेरंगी आयुष्याचीही.
काहीही होवो लोक ते करणारच ! चार-दोन वर्षांपूर्वी मी पाहिलेल्या एका दृश्याने आणि ते दृश्य पाहून मी नोंदलेल्या माझ्या डायरीतल्या ओळीही कदाचित हेच सांगतील.
प्रसंग असा—मुंबईच्या लोकलने प्रवास करताना घाटकोपर रेल्वेस्टेशनबाहेरची 'वेश्यावस्ती' नजरेस पडते. ह्या वर्षीच्या रंगपंचमीस मला ती वस्ती नजरेस पडली. सगळ्या वेश्या 'गोकुळ'च्या आनंदात रंगपंचमी खेळत होत्या. तेव्हा मी माझ्या डायरीत नोंद केली होती—

'आयुष्याची होळी तर तेव्हाच झाली
जेव्हा माजघरातून माडीवर आले
आता उरलेलं आयुष्य
रंगपंचमीतच !'

—संजय पवार

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW—28


# माणुसकीचा झरा —

राष्ट्रीयीकरणानंतर गरीब आणि दीन–दुबळ्यांसाठी बँकांची दारे उघडी झाली. महाराष्ट्र बँकेत तर ती पूर्वीही उघडीच होती. पण गेल्या १३ वर्षांत खेड्यापाड्यात शाखा उघडून विकासाचे प्रयत्न करीत असलेली बँक समर्थ स्थानिक नेतृत्वाचीही वाट बघत असते.

विकासाच्या दिशेने नेणारे असे एखादे समर्थ नेतृत्व श्री. अण्णा हजाऱ्यांसारख्या व्यक्तीकडून राळेगणशिंदीसारख्या एखाद्या गावाला लाभले तर त्या गावाचा विकास बँक व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने कसा होतो, हे "माणूस"च्या वाचकांना आता वेगळे सांगायला नको.

महाबँकेने अशी ४०० गावे आपल्या ग्रामसुधार योजनेखाली संपूर्ण विकासासाठी घेतली आहेत व त्यांना आजपर्यंत ५ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्यही केले आहे. या आर्थिक सहाय्यात अंतर्भूत आहेत – नवीन विहिरी, विहिरींचे नूतनीकरण, पंपसेट, दुग्धव्यवसाय, ट्रॅक्टर्स, बायोगॅस प्लॅण्ट, कुक्कुटपालन, पीक कर्जे, जमीन सुधारणा इ. इ.

**दारिद्र्याकडून समृद्धीकडे जाणारा हा मार्ग म्हणजेच**
**महाबँकेची ग्रामसुधार योजना**

## बँक ऑफ महाराष्ट्र

**[ भारत सरकारचा उपक्रम ]**



मुख्य कचेरी : "लोकमंगल" १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५